म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे.

विषय

दा. क. ११९८८

IRBK-0111988

...वनालय, ठाणे
...
१८८८

...र्क माला : पुष्प चौथे

# ...नयशील विद्वानांच्या कथा

लेखक

श्री. ह. भा. वाघोलीकर, एम्. ए., बी. टी.
अध्यापक, राजा धनराज गिरजी
हायस्कूल, पुणे २

प्रस्तावना

श्री ग. य. दीक्षित, बी. एस्‌सी. (ऑनर्स) एम्. एड्.
...्याध्यापक, नू. म. वि.
प्रशाला, पुणे २

IRBK-0111988

मूल्य : दोन रुपये व पन्नास पैसे

... वाचनालय, शाखा
अ. क्र. ११९८८ . वि ...
क्रमांक ... नोंद दि ...

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ...... नों. दि ...
वि. ......

# प्रस्तावना

शास्त्र विषयाच्या अभ्यासूला साहित्याच्या प्रांगणात आणण्याचा प्रयत्न श्री. न. शं. कुलकर्णी यांनी, मला प्रस्तावना लिहिण्यास सांगून केला आहे, असे म्हटले तर चूक होणार नाही. विज्ञानाला साहित्य, कला, धर्म इत्यादींचे वावडे नसावे असे मानणाऱ्यांपैकी मी एक असल्याने मीही या मोहाला बळी पडलो आहे. प्रस्तावना लिहिण्यास मी संमती दिली त्याला दुसरेही एक कारण आहे. बालमनावर चांगले संस्कार व्हावेत ही इच्छा, हेच ते दुसरे कारण. '**शीलसंवर्धक मालेतील पुस्तके**' या हेतूने लिहिली जात असल्यामुळे त्यातील एका पुष्पाला प्रस्तावना देण्याचा योग येत आहे तर नकार का द्या, असे मनात येऊन प्रस्तावना लिहिण्याचे हे धाडस मी करीत आहे.

स्वतःच्या अनुभवाने किंवा दुसऱ्याच्या अनुकरणाने आपण कितीतरी गोष्टी शिकतो. अनुभवापेक्षाही अनुकरणाचा भाग शिक्षणात फार मोठा असतो. अनुकरण कळत वा नकळत होत असते. एखाद्या दिव्य, भव्य, आश्चर्यकारक किंवा सुंदर गोष्टीचे दर्शन झाले की तसे करावे, वागावे किंवा दिसावे असे वाटते. कित्येक वेळा हे संस्कार इतके सहज

नि सूक्ष्म असतात की आपण अनुकरण करीत आहोत याची जाणीवही आपणांस नसते. तेव्हा अनुकरण करण्याजोग्या सुंदर, दिव्य गोष्टींचे नुसते दर्शन घडविणे हेसुद्धा फार मोठे सामाजिक कार्य आहे. दिव्य ज्योतीवर झेप घेणाऱ्या पतंगाप्रमाणे आपोआप बालमने त्यांना घडणाऱ्या वा घडलेल्या उज्ज्वलतेकडे खेचली जातात, तेजोरूप होऊन जावे ही त्यांचीही कळत नकळत इच्छा असतेच.

म्हणून समाज-जीवन सुखी व समृद्ध करणाऱ्या तेजस्वी गुणांचे दर्शन घडविणे हे फार मोठे कार्य आहे. खरे बोलणे, प्रामाणिकपणाने वागणे, तन्मय होऊन एखादे काम मन लावून करणे, नम्रता इत्यादी गुणांची पूजा विद्यार्थ्यांनी करावयास हवी. गुण-पूजनाचा परिणाम गुणांच्या जोपासनेत झाल्याशिवाय राहणार नाही. या दृष्टीने थोर व्यक्तींची चरित्रे म्हणजे अनेक गुणरत्नांची खाणच समजली पाहिजे. परंतु चरित्रांचा अभ्यास हा केवळ ऐतिहासिक दृष्टिकोणातून झाला तर कशाचे निरीक्षण करावयाचे आहे याचा बालमनाला नीटसा उलगडा होणार नाही. या दृष्टीने एखादा गुण केन्द्रिभूत ठेवून काही व्यक्तींच्या जीवनाचे निरीक्षण करण्याची संधी बालमनाला मिळाली तर त्यापासून योग्य तो बोध होऊन मनावर त्यांचे ठसे कायम राहतील. मानवी जीवनाचे अनुभव स्थल-काल भिन्नतेने जरी वेगवेगळे वाटले तरी ते गुणावगुणांच्या निश्चित अशा कप्प्यात विभागता येतात. अशा एकेक गुणाच्या कप्प्यातील अनुभव एकत्र मांडून त्या त्या गुणांच्या अनेक छटांचे दर्शन निश्चितच हेतुपूर्ण आणि उद्‌बोधक होते, हे '**शीलसंवर्धक मालेने**' स्पष्ट झाले आहे व होणार आहे.

अनेक चरित्रे वाचली म्हणजे वाचणारा जाणता झाला असे म्हणता येणार नाही. चरित्रातून 'चारित्र्य' निवडून घ्यावे लागते. ते तितके सोपे नाही. त्या दृष्टीने चरित्र-लेखनापेक्षा चारित्र्य-लेखन या कल्पनेला कमालीचे महत्त्व आहे; कारण चरित्र कधीही अनुकरणीय नसते, अनुकरणीय असते ते चारित्र्य !

आपल्या विषयात पारंगत असणाऱ्या विद्वानाला अहंकाराची बाधा होण्याची शक्यता असते. कधी विद्वत्तेला प्रदर्शनाची हौस वाटते तर

कधी विद्वत्ता हट्टी, अत्याग्रही होऊ शकते; आणि यामुळेच विद्वान माणूस पुष्कळ वेळा इतरांपासून दूर जातो आणि असे जर घडले नाही तरच तो सर्वांच्या आदरास पात्र होतो. विद्वान माणूस वरील प्रवृत्ती-पासून दूर राहिला तर आपल्याला दर्शन होते ते विनयशील विद्वानाचे ! म्हणूनच म्हटले आहे : विद्या विनयेन शोभते !

विद्वान माणूस भविष्यकालात दूरवर झेप घेऊ शकतो. काय घडणार आहे व काय घडावयास हवे हे तो अचूकपणे हेरतो व या दोहोंमध्ये मोठी पोकळी निर्माण होणार असेल तर ती भरून काढण्याची योजना करतो. हे साध्य होण्यासाठी तो विनयशीलतेमुळे आग्रह न धरता ज्ञानच फक्त प्रगट करतो. कारण ज्ञानाला आग्रह धरण्याचे कारण नसते. सदैव हित अपेक्षिणारा शहाणा माणूस ते निश्चित स्वीकारतो. आणि ते हित मूर्खांने न स्वीकारले तर त्याचा परिणाम त्यास भोगावा लागतो. तेव्हा दूरगामी परिणाम विनयशीलपणे सांगणे एवढेच काम विद्वान करतो. प्रस्तुत पुस्तकात ही गोष्ट आपणांस विदुराच्या उदाहरणावरून दिसते. ज्ञानाचा आग्रह न ठेवणे म्हणजे विनयशीलता !

एकनाथमहाराजांना समतेचे तत्त्व समजले. अंत्यजाचे पोर नि तहानेलेले गाढव यांतही त्यांना परमात्मा दिसला. एका हरिजन-स्त्रीच्या कोवळ्या मुलाला त्यांनी कवटाळले, तसेच तहानेने व्याकुळ झालेल्या गाढवाला त्यांनी पाणी पाजले. सोवळ्या-ओवळ्याचा भेद त्यांनी मानला नाही. या ठिकाणी विनयशीलता समतेचे रूप घेऊन आली आहे; कारण अहंकाराला समता मानवणारी नसते.

‘देशातील यांत्रिक सामर्थ्य वाढविल्याखेरीज स्वदेशीचे व्रत योग्य रीतीने पाळले जाणार नाही;’ असे न्या. रानडे यांनी औद्योगिक परिषदेत सांगितले. परंतु यामुळे परिषदेत फूट पडण्याची चिन्हे दिसू लागताच त्यांनी आपली भूमिका सोडली. यात तत्त्वच्युती नव्हती, तर पोकळी भरून काढण्याचाच तो प्रयत्न होता. आड येणाऱ्या टेकाडांना टाळण्यासाठीं नदी कधी कधी वळण घेते पण ती पुढेच जाते. घेतलेले धळण म्हणजे माघार नव्हे. ही विनयशीलता लोकरंजनाच्या रूपानेच प्रगट झाली आहे.

आचार्य प्रफुल्लचंद्र यांच्या जीवनात सत्याचा शोध घेण्याची तळमळ, देशबांधवांविषयीचा जिव्हाळा व त्याला साजेसा साधेपणा दिसतो. साधेपणा विनयशीलतेचेच दुसरे रूप आहे.

" ह्या लहान मुलांच्या संमेलनाला बहुतेक माझी आकृती पाहून बोलावले असेल " किंवा " माझ्यासारख्या एका छोट्या माणसाला कोणाचेही शत्रुत्व पत्करणे हे कसे काय परवडेल ? " असे शास्त्रीजींनी विनोदाने म्हटले आहे. विद्वत्ता विनयशीलतेने विनोदाचे रूप घेऊन अवतरू शकते हे येथे दिसते. पण शास्त्रीजींनी शत्रूचे आक्रमण होताच खंबीर धोरण स्वीकारले. विनयशीलता म्हणजे नुसते वाकणे नव्हे ! म्हातारी माणसे अंगात जोम नसल्याने वाकतात नि जीवनरसाने रसरसलेले वृक्ष फलभाराने वाकतात. विनयशीलता म्हणजे दुर्बलता नव्हे. जीवनाच्या भव्योदात्त दर्शनाने क्षुद्रतेकडे केलेले दुर्लक्ष म्हणजे विनयशीलता.

विनयशीलतेच्या विविध छटांचे दर्शन या पुस्तकांतील व्यक्ति-चित्रणांतून श्री. ह. भा. वाघोलीकर यांनी घडविले आहे. मी काही छटांचा निर्देश वर केला आहे; परंतु वाचकांना त्याचे दर्शन पानोपानी होणार आहे. श्री. ह. भा. वाघोलीकर यांची भाषा सोपी आहे. तसेच काही ठिकाणी अपरिचित शब्दांचा उपयोग करून त्यांचा परिचय मुलांना सहज करून देण्यात श्री. ह. भा. वाघोलीकर बरेच यशस्वी झाले आहेत; त्यामुळे ज्या हेतूने हे पुस्तक लिहिले आहे तो हेतू निश्चित साध्य झाला आहे, असे मी मोठ्या आनंदाने नमूद करतो.

प्रकाशक श्री. न. शं. कुलकर्णी यांना एकच विनंती करावीशी वाटते ती म्हणजे अशी पुस्तके जास्तीत जास्त प्रकाशित करावीत व त्या द्वारे मुलांची मने घडविण्याचे कार्य करावे. त्यांच्या या प्रयत्नास मी सुयश चिंतितो.

या पुस्तकाच्या वाचनाने विनयशीलतेच्या विविध छटांचे दर्शन मला झाले. याबद्दल लेखक व प्रकाशक यांचे आभार मानून ही प्रस्तावना मी पुरी करतो.

घर क्रमांक १०६० शुक्रवार पेठ, पुरंदरे कॉलनी, पुणे २. दिनांक : ३ डिसेंबर १९६७ — ग. य. दीक्षित

अनु. ... नोंद दि. ...

# लेखकाचे निवेदन

' विनयशील विद्वानांच्या कथा ' हे शीलसंवर्धकमालेचे चौथे पुष्प बालमित्रांच्या हाती देण्यात मला मोठा आनंद होत आहे. थोरांचे जीवन उत्सुकतेने पाहून त्यांचे गुण अंगी आणण्याचा लहानांनी प्रयत्न करावा या हेतूने ह्या कथा लिहिल्या आहेत. माझ्या ' निःस्पृहांच्या कथा ', ' शीलवतींच्या कथा ' आणि सत्यनिष्ठांच्या कथा ' बाल वाचकांना आवडल्या त्याप्रमाणेच ह्या ' विनयशील विद्वानांच्या कथा ' त्यांना आवडतील असा मला विश्वास वाटतो.

ज्ञान हे निःसंशय श्रेष्ठ आहे. म्हणून तर आपण म्हणतो, ' विद्वान् सर्वत्र पूज्यते। ' समाजाच्या किंवा राष्ट्राच्या विकासाला जे उपयुक्त ठरते तेच खरे श्रेष्ठ ज्ञान. विद्वत्तेला विनयशीलतेची जोड असल्याखेरीज असे श्रेष्ठ ज्ञान संभवतच नाही. अशा श्रेष्ठ ज्ञानाची उपासना मुलांनी करावी म्हणून ' महामंत्री विदुर ', ' धर्मात्मा एकनाथ ', ' न्यायमूर्ती रानडे ', ' आचार्य प्रफुल्लचंद्र ' आणि ' प्रधानमंत्री शास्त्रीजी ' ह्या विनयशील विद्वानांच्या जीवन-कथा मी सांगितल्या आहेत.

कुरूकुलाचा नाश थांबविण्याचा प्रयत्न करणे हे विदुराचे जीवनकार्य होते. नाथांनी भागवत धर्म स्वतः आचरिला आणि अज्ञ लोकांना तो शिकविला. उद्योग, राजकारण आणि समाज-कारण ह्या सर्व क्षेत्रांत अव्वल दर्जाची कामगिरी करून थंड गोळा होऊन पडलेला महाराष्ट्र चैतन्यमय करण्याचे महान् कार्य न्यायमूर्ती रानडे यांनी केले. केवढी प्रचण्ड विद्वत्ता ! पण अहंतेची दृष्ट त्यांच्या त्या विद्वत्तेला कधीच लागली नाही. ' मास्टर ऑफ् नायट्रेट्स् ' असा सर्व जगानं ज्यांचा गौरव केला त्या आचार्य प्रफुल्लचंद्रांनी आपल्या देशबांधवांसाठी भिक्षेची झोळी हाती घेतली होती. भारताचा तेजस्वी बाणा ज्यांनी साऱ्या जगाच्या

निदर्शनास आणला ते शास्त्रीजी, लोकांनी ' अजातशत्रू ' म्हणून गौरव केला तर विनम्रभावाने म्हणाले, ' मी इतका लहान, माझ्याशी शत्रुत्व कोण करणार ? '

**' अत्युच्ची पदी थोरही बिघडतो हा बोल नाही खरा ।'**

असे आपल्या अलौकिक जीवनाने ह्या थोर पुरुषांनी दाखविले आहे; माझ्या बालमित्रांनी हाच आदर्श डोळ्यांपुढे ठेवावा, हीच इच्छा.

ही जीवनचित्रे रंगविताना अनेक चरित्रग्रंथांतील रंग मी उचलले आहेत. त्याशिवाय ह्या कथा सांगताच आल्या नसत्या. त्या ग्रंथांचे ऋण मान्य करावयास हवे.

काही विशेष तळमळीने ज्यांनी ही ' शीलसंवर्धक माले 'ची कल्पना माझ्यापुढे मांडली, माझ्याकडून ह्या कथा लिहून घेतल्या आणि त्यांना हे आकर्षक स्वरूप प्राप्त करून दिले ते माझे प्रकाशक मित्र श्री. न. शं. कुलकर्णी यांचे आभार मानावे तेवढे थोडेच आहेत.


माझ्या व प्रकाशकांच्या विनंतीला मान देऊन नूतन मराठी विद्यालय प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. ग. य. दीक्षित यांनी वेळात वेळ काढून मार्मिक प्रस्तावना लिहून देऊन म्हा उपकृत केले आहे. त्यांच्याविषयी कृतज्ञता व्यक्त करून हे निवेदन मी संपवितो.

**वेणुनिवास**, २३०/६ शुक्रवार पेठ, पुणे २. दिनांक : ७-१२-१९६७


लेखक
**ह. भा. वाघोलीकर**

क था नु क्र म


* महामंत्री विदुर ... १– ३२
* धर्मात्मा एकनाथ ... ३३– ५६
* न्यायमूर्ती रानडे ... ५७– ७८
* आचार्य प्रफुल्लचंद्र ... ७९– ९६
* प्रधानमंत्री शास्त्रीजी ... ९७–११६




पुष्प चौथे · विद्या विनयेन शोभते।



श्रीकृष्ण विदुराघरच्या कण्या गोड करून घेतात.

# महामंत्री विदुर



हस्तिनापुरामध्ये आज सकाळपासूनच एक आगळे गांभीर्य पसरले होते सगळीकडे. प्रत्येकाचे मन प्रसंगाचे स्वरूप जाणत होते, आणि तरीही अधिक जाणण्याविषयी ते उत्कंठित होते. आणि म्हणून राजपथावर ठायी ठायी पौरजनांचे थवे थबकत होते, जरा वेळ काही कुजबुजत होते आणि हळूहळू पुढे सरकत होते. सर्वांचे ध्येय एकच. हस्तिनापुरातील कुरुवंशाचा भव्य प्रासाद !

आज त्या विशाल प्रासादामध्येदेखील असेच काही अपरिचित गंभीर वातावरण पसरले होते. काहीशी घाई, काहीशी खिन्नता ने संमिश्र स्वरूप होते त्या वातावरणाचे. घाई अशासाठी की, तराष्ट्र हस्तिनापुराचा अभिषिक्त सम्राट होत होता त्या शुभ-नी. आणि खिन्नता अशासाठी की, अभिषिक्त सम्राट पंडू आज

भावाच्या हातात राज्यसूत्रे देऊन, तीर्थयात्रेला निघाला होता. अंध राजा धृतराष्ट्र सिंहासनावर बसला होता. त्याची पत्नी साध्वी गांधारी त्याच्या शेजारी बसली होती. पतीला दृष्टिसुख नाही म्हणून आपलाही त्या सुखावर हक्क नाही असे मानून बुद्धिपुरस्सर अंधत्व स्वीकारले होते तिने. राजाचे स्वाभाविक अंधत्व तर राणीचे स्वीकृत अंधत्व. हस्तिनापुराच्या या अंध सम्राटाला दीप्तिमान मार्गदर्शनाची निश्चितच जरुरी होती. हे मार्गदर्शन कसे मिळणार ? हा प्रश्न तिथे जमलेल्या साऱ्याच विचारवंतांच्या मनामध्ये घोळत होता. आणि त्या प्रश्नाचेच उत्तर देण्यासाठी तीर्थयात्रेचे प्रस्थान ठेवलेला पंडू म्हणाला,

"धृतराष्ट्रा, तुझा महामंत्री म्हणून हा विदुर सर्व राज्यव्यवस्था पाहील. तो धर्मज्ञ आहे. राजनीति-निपुण आहे. प्रत्येक बाबतीत त्याच्या सूचनेनुसार वागलास तर कधीही तुझं पाऊल चुकीचं पडणार नाही."

"विदुर महामंत्री ? दासीपुत्र महामंत्री ?" भोवतालच्या कुजबुजीतून हे आश्चर्योद्गार पंडूच्या कानावर आले. संतप्त पंडू सर्वांना उद्देशून म्हणाला, "दासीपुत्र नव्हे. विदुर आमचा भाऊ आहे. आम्ही वयाने वडील आहोत. तो ज्ञानवृद्ध आहे. धर्मज्ञ-नव्हे मूर्तिमंत धर्मच आहे तो. तुम्हांला माहीत नाही. विदुर म्हणजे शापित यमधर्म आहे...माण्डव्य ऋषी घोर तप करीत होते. काही तस्कर राजकोश लुटून पळून चालले होते. त्यांच्यामागे त्यांना पकडण्यासाठी धावणारे राजसैनिक माण्डव्य ऋषींच्या आश्रमापाशी आले, तेव्हा त्यांना ध्यानस्थ माण्डव्य ऋषी आढळले. त्यांनी ऋषींना तस्करांविषयी विचारले. पण समाधीसुखात रंगलेले ऋषी काहीच बोलले नाहीत. राजसेवक रागावले. त्यांनी ऋषींचा आश्रम बघितला.

आश्रमामध्ये चोरांनी टाकलेले द्रव्य त्यांना आढळले. राजसेवकांनी ऋषींना पकडून राजापुढे नेले. चोरांनाही पकडण्यात आले. चोरांबरोबर ऋषींनाही सुळावर चढविण्याची आज्ञा राजाने दिली. सुळावर चढविलेले चोर तात्काळ मरण पावले. माण्डव्य ऋषी मरण पावले नाहीत. आपण मोठी चूक केली असे आता राजाला वाटले. माण्डव्य ऋषींना सुळावरून खाली उतरविण्यात आले. तेव्हा संतप्त माण्डव्य ऋषी तडक स्वर्गामध्ये धर्मालाच ह्या गोष्टीचा जाब विचारण्यासाठी गेले. 'चिमण्यांना दर्भ टोचल्याचे हे फळ आहे,' असे धर्माने सांगितले. त्यावर 'अजाणता केलेले पाप हे पाप नाही. अशा साध्या गोष्टीसाठी माझ्या नशिबी सुळावर चढण्याची शिक्षा लिहून ठेवणाऱ्या धर्माने अधर्म केला आहे' असे म्हणून 'तुला हे स्थान सोडून पृथ्वीवर मनुष्य होऊन राहावे लागेल.' असा शाप माण्डव्य ऋषींनी धर्माला दिला. तो हा शापित धर्म, आजपासून कुरुकुळाचा महामंत्री आहे."

विरोधी कुजबूज केव्हाच विरली. माना खाली लवल्या. त्या अभिवादनाचा स्वीकार करून आणि सर्वांचा निरोप घेऊन पंडू राजमार्गाकडून तीर्थक्षेत्राच्या मार्गाकडे वळला. त्याला निरोप देऊन राजा धृतराष्ट्र आपल्या अभ्यासिकेकडे जाण्यासाठी निघाला, तो महामंत्री विदुराचाच हात धरून! ह्यानंतर प्रत्येक बाबतीत राजा धृतराष्ट्र महामंत्री विदुराचा सल्ला घेत असे. कधी कधी स्पष्टवक्तेपणाने विदुर धृतराष्ट्राला अप्रिय असाही सल्ला देत असे. दु:खसंतापाने धृतराष्ट्र खिन्नही होत असे. पण विदुराने सांगितलेली गोष्ट अप्रिय असली तरी सत्य आहे, हिताची आहे, हे त्याला पटे आणि मग तो पुन्हा त्याची मनधरणी करीत असे. कार्याकार्य–विवेकाविषयीची त्याची पात्रता पाहून भीष्मासारखा दूरदर्शी सर्व-

श्रेष्ठ कर्तापुरुष त्याचा विचार घेत असे, हे त्याने बघितलेले होते. व्यास महर्षींनी केलेली विदुरप्रशस्ती त्याच्या स्मरणात होती. महर्षी म्हणाले होते,

"विदुराच्या रूपाने साक्षात धर्मच पृथ्वीवर आलेला असून तो राज्यशास्त्रज्ञ व कामक्रोध यांनी पूर्णपणे विवर्जित आहे. तो सर्व बुद्धिमंतांत अत्यंत श्रेष्ठ असून धर्मात्मा म्हणून प्रसिद्ध होईल. धर्म व राज्यशास्त्र यांत कुशल, लोभ व क्रोध यांनी विवर्जित, दीर्घदर्शी, विकारावर पूर्णपणे विजय मिळविलेला व कौरवांचे कल्याण साधण्यात सदैव गढलेला असा विदुर आहे. त्रैलोक्यांत विदुरासारखा नित्य धर्मानुसारच वागणारा व धर्माचे संपूर्ण रहस्य जाणणारा असा कोणीही नसेल."

व्यासवाणीचे महत्त्व धृतराष्ट्र जाणत होता आणि आता अनुभवीतही होता. प्रत्येक महत्त्वपूर्ण प्रसंगाच्या वेळी विरुद्ध मत देऊनही धृतराष्ट्र त्याला मानीत होता. ह्याला कारण त्याची प्रगाढ बुद्धिमत्ता. कौरवराज्यकुलाचे कल्याण हा विदुराच्या चिंतनाचा एकमेव विषय होता. ही गोष्ट कौरवेश्वर जाणत होता. आणि म्हणूनच त्याचे विदुरावर आत्यंतिक प्रेम होते.

"अप्रिय परि पथ्य असे वक्ता श्रोताहि दुर्लभ स्पष्ट ।
बहु सुलभ प्रियवदते वाढविती, चुकविती न ते कष्ट ॥"

ही विदुराची भूमिका धृतराष्ट्राला पटत असे, नाही असे नाही. पण मोहाचा पडदा जोवर बाजूला होत नसे तोवर विदुराच्या स्पष्टवक्तेपणाचा धृतराष्ट्राला रागच येत असे. आणि विदुराच्या ह्या अप्रियकथनाची मजल पार पुत्रत्यागाचा सल्ला देण्यापर्यंत गेली होती. धृतराष्ट्राचा प्रथम पुत्र दुर्योधन ह्याच्या जन्माच्या वेळी

काही अशुभसूचक गोष्टी घडल्या. तेव्हा त्याचा परित्याग करण्याचा परखड सल्ला विदुराने धृतराष्ट्राला दिला.

विदुर म्हणाला, " हा पुत्र सर्व कुळाचा नाश करणारा आहे. याचा परित्याग करावा. विश्व व कुळ यांच्या रक्षणासाठी एका व्यक्तीचा परित्याग करणे आवश्यक असले तर अवश्य केला पाहिजे. कुळासाठी व्यक्तीचा, गावासाठी कुळाचा, जनपदासाठी गावाचा व आत्मानंदासाठी पृथ्वीचाही त्याग करावा असे शास्त्र आहे."

पण पुत्रमोहाने अंध झालेल्या अंध धृतराष्ट्राला ही विदुरनीती मानवली नाही. सर्वनाशाचे बीज विदुराच्या सांगण्याप्रमाणे नष्ट करण्याऐवजी त्याने त्याची जोपासना केली. विषवृक्ष हळूहळू अंकुरित होऊ लागला. त्याच्या डहाळयांनी, फांद्यांनी कौरवकुल–मंदिराला तडे जाऊ लागले. कौरव-पांडवांच्या वैरभावाचे प्रदर्शन ही नित्याची गोष्ट होऊन बसली. कौरवकुलाच्या शान्तिसमृद्धीचा रात्रंदिन ध्यास लागलेल्या महामंत्री विदुराचे अंत:करण अस्वस्थ होत असे हे सर्व प्रकार पाहून.

अशाच अस्वस्थ मन:स्थितीत असताना, एका राजसेवकाने पांडवमाता कुंती हिने बोलाविले असल्याचा निरोप सांगितला. त्या संदेशानुसार विदुर कुंतीच्या भेटीला गेला. कुंतीच्या अश्रुभरल्या नयनांनीच त्याचे स्वागत केले ! शोकाचा आवेग ओसरेपर्यंत आसनावर शांत बसण्याखेरीज दुसरा मार्ग नव्हता. शोक थांबला अणि मग त्याने वाणीला वाट मोकळी करून दिली.

शांतचित्त झालेली कुंती म्हणाली, " भावजी, माझा भीम कुठं नाहीसा झाला, काही कळत नाही. मन चिंती ते वैरी चिंतीत नाही म्हणतात. वेडं मन कसं आक्रंदून उठत आहे. माझ्या भीमाच्या जिवाला काही बरं वाईट तर झालं नाही ना ? "

तिचे सांत्वन करण्याच्या हेतूने विदुर म्हणाला, " असा अभद्र विचार कशाला मनात आणायचा वहिनी ? मन आक्रंदन करून उठत असले तरी त्याला आवर घातला पाहिजे."

" पण महामंत्री, मन उगीच आक्रंदत नाही." शोकसंतप्त कुंती म्हणाली, " हे गांधारीपुत्र माझ्या सर्वच पुत्रांचा द्वेश करतात. पण माझा बलशाली भीम त्यांच्या डोळ्यात अधिक सलतो. शांतवृत्ती धर्माप्रमाणे तो कोणाची गय करीत नाही. सामर्थ्याच्या जोरावर तो सर्व दुष्टांची खोड जिरवतो आणि म्हणून त्याला सर्व पाण्यात पाहतात."

" खरं आहे वहिनी ! पण म्हणून वेडया मनाला वाटणारी भीती खरी ठरविण्यापर्यंत त्यांची मजल गेली असेल, असे कसे म्हणता येईल ? आणि म्हणूही नाही तसं." विदुराचे हे सावधानतेचे विचार कुंतीला मानवले नाहीत आणि ती म्हणाली,

" विदुरभावजी, पुरुषांच्या अंतःकरणाचे हे कठोरपण आम्हा बायकांना नाही साधत...काल राजवाडयात द्यूतागारामध्ये मेजवानी होती. माझ्या भोळ्या भीमाला त्यांनी बोलावलं होतं. त्यानंतर माझा भीम मला दिसला नाही. तुम्ही काही म्हणा भावजी, पण माझं मन मला सांगतं, माझ्या भीमाला या दुष्टांनी विष– "

विदुराने तिचे बोलणे पुरते होऊ दिले नाही. तिला थोडयाशा निष्ठुरपणाने तो म्हणाला, " हां ! हां ! तुमच्या मनाच्या ह्या वेडया कल्पना तुमच्यापाशीच ठेवा. ज्या गोष्टी केवळ तर्काच्या ठिसूळ पायावर आधारलेल्या असतात त्या व्यवहारी जगात झटकन कोसळून पडतात आणि आपलाच नाश करतात. वहिनी, तुम्ही म्हणता हे खरे असेलही. पण तसे उघड म्हणायला आधार नाही, पुरावा नाही. आणि असला तरी आपण उगाच हाकाटी करून

तरी काय उपयोग ? समर्थाच्या विरुद्ध असमर्थांची तक्रार कोण ऐकून घेतो ! '

" मग काय मी काही बोलू नका म्हणता ? " कुंती म्हणाली.

" हो ! इतर पुत्रांच्यासाठी...तुम्ही तुमच्या मनातील संशय माझ्यापाशी बोलून दाखवलात...आता तो संशय अगदी विसरून-जा. कोणापाशी बोलू नका...कोणाविषयी तुमच्या मनात काही संशय नाही असे चेहऱ्यावर दाखवा. म्हणजे निदान आणखी काही कारस्थाने रचली जाणार नाहीत. तुम्ही अगदी निश्चिंत राहा. काही काळजी करू नका. 'पांडव दीर्घायुषी आहेत' ही महर्षी व्यासांची भविष्यवाणी कधी असत्य ठरणार नाही. भीम लवकरच तुमच्या दर्शनाला येईल." असे कुंतीचे सांत्वन करून विदुर तिच्या मंदिरा-तून बाहेर पडला.

दारातून विदुराने बाहेर पाऊल टाकले तोच –

" विदुरकाका, भीम तुम्हांला अभिवादन करतो आहे." असे म्हणून भीमाने खाली वाकून विदुराला नमस्कार केला. त्याला पाहून आश्चर्यचकित झालेल्या विदुराने त्याला आशीर्वाद देऊन विचारले,

" अरे भीमा, होतास तरी कुठे ? "

" पाण्यात पोहून आलो पुष्कळसा." भीम सांगत होता.

" पाण्यात साप चावले कडकडून. पण त्यांचं विष अंगात भिणण्या-ऐवजी त्यांनी जणू अंगातलं विष काढून घेतल्याप्रमाणे कसं मोकळं मोकळं वाटतय." दूरवर कोठेतरी विचारग्रस्त मुद्रेने पाहात आणि सुटकेचा एक दीर्घ उसासा टाकीत विदुर म्हणाला,

" कधी कधी सापांनाही लाज वाटावी अशी दुष्टता आढळते आणि मग सापसुद्धा माणसांना लाजविणारा चांगुलपणा दाखवितात.

भीमा, घरात जाऊन कुंतीमातेला भेट, तुझ्या चिंतेनं तिचा जीव अगदी उडून गेला आहे आणि भीमा, जरा दांडगाई बेतानं करीत जा."

"दांडगाई बेतानं कशी करायची ? ते नाही जमणार बुवा आपल्याला...जातो मी काका आईकडे." असे म्हणत भीम उड्या मारीतच मंदिरात गेला. त्याच्या त्या पाठमोऱ्या समर्थ प्रसन्नतेकडे पाहात आणि तितक्याच प्रसन्नतेनं हंसत विदुर मार्गस्थ झाला.

नित्यक्रमाप्रमाणे महामंत्री विदुर हस्तिनापुराचा सम्राट धृतराष्ट्र ह्याच्या भेटीला सकाळीच चालला होता. सम्राटाच्या प्रासादात प्रवेश करताच दुर्योधन आणि त्याचा परममित्र कर्ण ही जोडी बाहेर येताना त्याला दिसली. विदुराला पाहताच मोकळेपणाने गप्पा ठोकीत चाललेले ते दोघेही जरासे चपापले. भीतीने त्यांच्या मुखावरची प्रसन्नता पळवून लावली आणि उघड्या पडलेल्या एकाकी चिंतेने त्यांच्या मनातले कपटी विचार विदुराच्या चाणाक्ष बुद्धीला भीत भीत सांगितले.

"काका, अभिवादन !" असे म्हणून दोघांनी विदुराला लवून नमस्कार केला.

"सर्वांचे कल्याण होवो. देव तुम्हांला सुबुद्धी देवो." विदुराने त्यांना आशीर्वाद दिला आणि आपले उत्तरीय सावरीत प्रासादात प्रवेश केला.

विदुराला पाहताच धृतराष्ट्राच्या सिंहासनाजवळ उभ्या असलेल्या दासीने विदुराला खाली वाकून नमस्कार केला आणि ती धृतराष्ट्राला म्हणाली,

"महामंत्री आले आहेत."

"या महामंत्री !" गोंधळल्या मनाने झटकन उभे राहून राजा धृतराष्ट्राने विदुराला कसे तरी उत्थापन दिले आणि पुन्हा तो आपले उत्तरीय सावरीत सिंहासनावर वसला. जणू त्या घाबरलेल्या हृदयाला त्या गर्भरेशमी वस्त्राच्या आड दडविण्याचा तो प्रयत्न करीत होता.

विदुराच्या निष्कलंक चारित्र्यामुळे आणि त्याच्या न्यायप्रीतीमुळे विदुराविषयी धृतराष्ट्राच्या मनाला एक प्रकारचा धाक वाटत असे. दुर्योधन, शकुनी, कर्ण अशांच्या सहवासात असल्यानंतर त्याचे स्वभावतःच कपटी आणि पाताळयंत्री असलेले मन जास्तच गतिमान होत असे आणि कपटाचे डाव टाकीत असे. पण विदुर जवळपास नाही तोवर ह्या सर्व गोष्टी. विदुराच्या सावलीलासुद्धा त्याच्या मनाची ही दुष्टता राहात नसे. आत्ताच येऊन गेलेले दुर्योधन, कर्ण हेसुद्धा त्याला म्हणाले होते, "विदुरकाका नसतील ह्या अंदाजाने आम्ही आत्ता आपल्या भेटीला आलो होतो. कारण त्यांच्या समोर आमचे विचार आम्ही आपणांस सांगूच शकत नाही.. आणि आम्हांला आश्चर्य वाटतं की त्यांच्या देखत आपण पांडवांची, आमच्या शत्रूंची एवढी प्रशंसा का करता ?" आणि मग तो त्यांना म्हणाला होता, "जे तुमच्या अंतःकरणात आहे तेच माझ्या अंतः-करणात आहे; मी विदुरासमोर माझ्या चेहऱ्यावरून देखील माझ्या अंतःकरणातील भाव प्रकट करू इच्छीत नाही. विदुर दुसऱ्याचे विचार ओळखण्यात इतका कुशल आहे की, माझ्या हावभावांनी आणि माझ्या तोंडातून निसटलेल्या एखाद्या सामान्य शब्दानेदेखील तो माझा अभिप्राय ओळखील अशी मला भीती वाटते...आणि म्हणून मी नेहमी त्याच्या तोंडावर पांडवांचे गुणगान करतो." आणखी काही गोष्टींवर त्यांचा संवाद झाला होता आणि मग

त्याचा निरोप घेऊन ते दोघे प्रासादाबाहेर पडले होते. काही क्षणाच अवधी लोटला असेल नसेल तो महामंत्री विदुर आल्याचे दासी सांगितले. चोराने राजद्रव्यावर लोभी दृष्टिक्षेप टाकावा आणि कोशाधिकारी मंदिरात यावा म्हणजे चोराची जी गडबडघाई तीच स्थिति, हस्तिनापुराचा कोशाधिकारी महामंत्री विदुर आल्या वृत्त दासीने सांगताच धृतराष्ट्राच्या मनाची झाली. आणि म्हणू त्याने आपल्या घाबरलेल्या हृदयाला पुष्कळ लपविण्याचा प्रयत्न केला. पण त्या हृदयालाच न कळत त्या हृदयातल्या भावना हां हां म्हणता त्याच्या चेहऱ्यावर दिसू लागल्या. आणि त्या ओळखूनच महामंत्री विदुर म्हणाला,

"महाराज, आज विषण्णचित्त दिसतात !"

"छे ! छे ! काही कारण नाही विषण्णचित्त असण्याचं. दोन चार दिवसांपूर्वी होती तशी काहीशी स्थिती." धृतराष्ट म्हणाला.

"ती का ?" विदुराने विचारले.

'आपला भीम कुठे नाहीसा झाला, असं कुणीसं प्रासादात म्हटलं होतं.. मन अगदी अस्वस्थ झालं होतं... पण परवा भीम सुखरूप असल्याचे गांधारीने सांगितले. फार बरं वाटलं मनाला." असे म्हणून एक दीर्घ सुस्कारा टाकला धृतराष्ट्राने. दासी त्याला वारा घालीत होती तरी त्याच्या कपाळावर चमकणारे घर्मबिंदू विदुराच्या चाणाक्ष नजरेतून निसटले नाहीत.

"महाराजांची चिंता, व्यथा जाणतो मी." आपल्या मनामध्ये काय आले, हे धृतराष्ट्राच्या लक्षात अजिबात येऊ न देता विदुर म्हणाला, "पोटच्या मुलापेक्षाही दुसऱ्याची जबाबदारीची ठेव सांभाळणे जरा कठीणच....पण देव काही उणं पडू देत नाही

हाराज. कारण तो सत्याचा वाली असतो ना. तरी वेड्या जिवाला हावत नाही. चिंतेने तो अगदी वेडापिसा होतो...कुंतीवहिनींची ओलवाणी स्थिती झाली होती दोन दिवस !"

"सांगितलं मला गांधारीनं." धृतराष्ट्र जरासा उत्साहाने बोलत ता, "दुर्योधनही मघाशी हेच सांगत होता. आणि कुंतीवहिनींना आणि मुलांना थोडासा विसावा मिळावा म्हणून आत्ताच आम्ही ठरविलं–"

"आम्ही म्हणजे आपण आणि दुर्योधनानं–? " मधेच विदुराने विचारलं.

"हो !–आणि कर्णाचंही तसंच मत पडलं." धृतराष्ट्र म्हणाला.

"सुरेख, म्हणजे अधिकस्य अधिकं फलम्, पण काय ठरलं काय महाराज ? " विदुराने विचारले, तेव्हा धृतराष्ट्राने सांगितले, "कुंतीने आणि धर्म, भीम वगैरे मुलांनी चार दिवस वारणावतास राहायला जावं असं ठरविलं आहे, पुरोचन सारी व्यवस्था पाहणार आहे."

विदुर थोडा वेळ काहीच बोलला नाही. तो बोलत नाही असे पाहून धृतराष्ट्र पुन्हा म्हणाला, "का, बोलत का नाही महामंत्री ? कशी काय वाटते कल्पना ? "

"उत्तमच ! दोन दिवसांवर यात्रा आहे वारणावताची–महायात्रेची पर्वणीच साधते आहे पांडवांना. बरं निघतो मी महाराज." असे म्हणून विदुर निघाला.

"इतक्या घाईने कुठे ? " धृतराष्ट्राने विचारले.

"पांडव महायात्रेचे प्रस्थान ठेवणार......मला आवश्यकच आहे जाणे...बरं चलतो मी." असे म्हणून विदुर प्रासादाबाहेर पडला.

दुसऱ्याच दिवशी पांडव पुरोचनासमवेत वारणावतास गेले. पुरोचनाने पांडवांच्यासाठी नवीन भव्य प्रासाद बांधला होता वारणावतास. सर्व सुखसाधनांनी सुसज्ज अशा त्या भव्य प्रासादात सर्व काही होते, फक्त सुख नव्हते, असा अनुभव युधिष्ठिराला येत होता. वारणावताला निघतानाच विदुराने त्याला काही सावधगिरीची सूचना दिली होती. तो अगदी अस्वस्थ होता. त्याने आपल्या मनातील तळमळ फक्त कुंतीमातेजवळ बोलून दाखविली होती. तो म्हणाला, "घरापासून अग्नीचे भय आहे. पण काळजी करण्याचे कारण नाही. बाहेर पडता येईल. बभ्रा न करता गुप्तपणे संकटातून पार पडले पाहिजे."

विदुराने सांगितल्याप्रमाणे एक कुशल खनिक युधिष्ठिराला येऊन भेटला. त्याने थोडक्या वेळामध्ये काही बोभाटा होऊ न देता, त्या प्रासादापासून दूर रानापर्यंत एक भुयार खणले. या भुयाराच्या तोंडावर एक कपाट ठेवले होते. प्रासादाबाहेर पुरोचनाचे सैनिक पहारा करीत होते. त्यांना काहीसुद्धा कल्पना आली नाही. भुयार पूर्ण झाले. पांडव कुंतीसह भुयारातून बाहेर पडले आणि गंगातिरावर आले. तिथे नाव तयारच होती. त्या नावेतून ते गुप्तपणे पलीकडच्या अरण्यात गेले. ते गुप्तच राहिले काही दिवस. अर्जुनाने मत्स्यवेध करून द्रौपदीस्वयंवरामध्ये दौपदी जिंकली, तेव्हा ते प्रगट झाले आणि पांडव अद्याप जिवंत आहेत, हे कौरवांना कळले. नाही तर ते समजत होते पांडव लाक्षागृहात जळून मेले.

"महाराज, पांडव लाक्षागृहात जळून मेले नाहीत. ते जिवंत आहेत." महामंत्री धृतराष्ट्राला सांगत होता, "लाक्षागृहात ज्यांची प्रेते सापडली ते दुसरेच कोणी तरी होते. पार्थाने मत्स्यवेधाचा पण जिकला आणि साऱ्या विश्वाला जाहीर करून सांगितले, की पांडव

जिवंत आहेत. माशाचे पाण्यात पडलेले प्रतिबिंब पाहून धनंजयाने माशाचा वध केला आणि पांडवांना पाण्यात पाहणाऱ्यांचा नक्षा उतरविला. आता व्यर्थ त्यांच्याविषयी द्वेषबुद्धी न बाळगता त्यांना मानाने हस्तिनापुरास बोलावून आणावे."

"मानखंडना पत्करून ?" द्वेषाने जळफळणाऱ्या दुर्योधनाने विचारले. पुष्कळ बोलावयाचे त्याच्या मनात होते. पण विदुरासमोर अन्याय्य धोरण स्वीकारणे किंवा विरुद्ध बोलणे ही गोष्ट त्याला कधीच शक्य झाली नाही. पांडवांना नष्ट करण्याचे जे कौरव-प्रयत्न चाललेले होते त्यामुळे सर्व कुळाचा नाश ओढवणार, हे विदुर स्पष्टपणे जाणत होता. म्हणूनच त्याचा विरोध सत्याच्या, न्यायाच्या आणि ज्ञानाच्या भरभक्कम पायावर उभा आहे, हे दुर्योधन जाणत होता. आणि म्हणूनच त्याच्या अंतःकरणात द्वेषाग्नी नुसता धुमसत होता. त्याला स्पष्टस्वरूप प्राप्त होऊ शकत नव्हते.

त्याची ही मनःस्थिती जाणून विदुर शांतपणे म्हणाला, "दुर्योधना, आपल्या माणसांना आपल्या घरात आणण्यात मानखंडना कसली ?" त्यावर दुर्योधन काहीच म्हणाला नाही. तेव्हा धृतराष्ट्राकडे वळून विदुर पुन्हा म्हणाला,

"महाराज, पांडवांच्याविषयी स्नेहभाव दर्शविला तर आपल्या कुळातील सर्व लोकांच्या जीविताविषयीच स्नेहभाव दर्शविल्यासारखे होणार आहे. आपल्याच पराक्रमाचे तेज त्यांच्या व आपल्या ऐक्याने वाढणार आहे. आणि हा शहाणपणाचा मार्ग आहे म्हणून मला असं वाटतं, की पांडवांना सन्मानाने बोलावून आणावं आणि त्यांच्या न्याय्य वाटणीचं राज्य त्यांच्या स्वाधीन करावं. ह्या कुरुवंशाच्या सिंहासनाचा नाश होऊ नये असा विचार व्यक्त करणे, हे महामंत्री

ह्या नात्याने मी माझे कर्तव्य समजतो. कौरव आणि पांडव एकमेकांचे व्हावेत आणि त्यांच्या सामर्थ्याच्या पुण्याईवर कुरूंचे राज्य दीर्घायुषी व्हावे. शंभर विरुद्ध पाच उभे राहून सर्व नाश होऊ नये."

"बरोबर आहे तुमचा विचार महामंत्री. त्याप्रमाणे जरूर व्यवस्था करा." असे म्हणून धृतराष्ट्राने विदुराला निरोप दिला.

इन्द्रप्रस्थाला पाण्डवांची नवी राजधानी झाली. पाण्डवांच्या पराक्रमसूर्याचे तेज दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत होते. धर्माने राजसूय यज्ञ केला. यज्ञाचा अश्व आणि त्याच्यासह पाण्डवांची कीर्ती सर्व विश्वसंचार करून आली. पाण्डवांचे भाग्यतेज मत्सरी दृष्टीला सहन झाले नाही. शकुनीने कपटी डाव खेळायला आरंभ केला. दुर्योधनाला गळाला लावून धृतराष्ट्राची चंचलबुद्धी त्याने आकर्षित केली. हस्तिनापुरामध्ये द्यूताचा डाव मांडण्याचे कारस्थान खेळले गेले. युधिष्ठिराला द्यूताचे निमंत्रण करण्यासाठी विदुराला पाठविण्याचे धृतराष्ट्राने ठरविले.

विदुराने धृतराष्ट्राला ह्या गोष्टीपासून परावृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न केला. विनाशाच्या प्रत्येक क्षणाला राजसत्तेला सावध करण्याचे व्रतच त्याने अंगिकारले होते.

"महाराज, हा द्यूताचा-सर्वनाशाचा खेळ आपण मांडू नका. विदुराने अती नम्रतेने धृतराष्ट्राला विनवणी केली. पण त्या अंध सम्राटाने ती विनवणी मानली नाही. तो उलट हसून म्हणाला, "महामंत्री हे युद्ध थोडेच आहे सर्वनाश व्हावयाला ? वैभवशाली राजसत्तेला साजेशी ही राजमान्य क्रीडा आहे. स्वपराक्रमाने इंद्रतुल्य विलासवैभव संपादन करणाऱ्या इन्द्रप्रस्थाच्या नृपोत्तमाला हस्तिनापुराच्या राजराजेश्वराचे हे प्रेमाचे आवाहन आहे."

" ही जीवघेणी क्रीडा आहे महाराज. ह्यामध्ये विनाश आणि फक्त विनाशच मला दिसत आहे, विलासाचा आणि वैभवाचाही." विदुर खिन्न मनाने बोलत होता, " विलासवैभव...महाराज, ह्या विलासाची अशी रीत आहे की, तो स्वत: क्षणजीवी आहे. आणि स्वत:च्या नाशाबरोबर तो आपल्या जोडीदाराचा, वैभवाचाही नाश ओढवून आणतो."

" काव्यातला हा करुण रस उत्तम रंगवलास विदुरा, " हसून धृतराष्ट्र म्हणाला."

" रस रंगवावा लागत नाही–रंगतो महाराज. आणि ह्या कुरूंच्या राज्यात कारुण्याच्या काळ्या गडद छटा लवकरच रंगणार असं मनाला वाटू लागलं आहे." थोडा वेळ थांबून विदुर पुन्हा म्हणाला, " महाराज, हा द्यूताचा डाव तुम्ही मांडू नका. यामुळे साऱ्या संसाराचाच डाव उधळला जाईल की काय अशी मनाला भीती वाटते. भावी विनाशाची बीजे ह्यामध्ये लपलेली आहेत. यामुळे सर्व कुळाचा नाश होईल. पाण्डव व कौरव यांच्यामध्ये संघर्ष उत्पन्न होईल आणि त्या संघर्षात सर्वनाश होईल, हे निश्चित."

" महामंत्र्यांना सर्वांच्या नाशापेक्षा पाण्डवांच्या नाशाची भीती अधिक वाटते आणि म्हणून त्यांचे पक्षपाती मन हा द्यूताचा पट मांडायला तयार होत नाही, असं मलां वाटतं." शकुनीमामा आपली दाढी खाजवीत आणि आपल्या भाच्याकडे जरा जास्तच तिरकस नजरेने पाहात म्हणाले.

" मामांनी हा असा अपशकुन करायला नको होता मधेच." आपला संताप मुखावर न दाखवता विदुर म्हणाला, " ह्यात पक्षपात कसला ? ज्या सिंहासनाचा मी महामंत्री–त्या सिंहासनाचा नाश

होऊ नये यासाठी सतत प्रयत्नशील राहणे हे माझे जीवन-ध्येय आहे. द्यूत हे व्यसन आहे. व्यसन म्हणजे संकट. ह्या संकटाच्या आघाताने कुलाचा नाश होऊ नये असं वाटतं. पण महाराज, आपण म्हणतच असाल तर–"

"होय विदुरा, तू युधिष्ठिराला द्यूताचं निमंत्रण द्यावं, असं मला वाटतं." हे धृतराष्ट्राचे शब्द ऐकल्यावर, "जशी महाराजांची इच्छा. असे म्हणून खिन्नमनाने विदुर प्रासादाबाहेर पडला.

इन्द्रप्रस्थामध्ये महामंत्र्याला साजेसे विदुराचे यथायोग्य स्वागत झाले. कुशल प्रश्नोत्तरे झाली. आपल्या पराक्रमाचे कौतुक करणाऱ्या वडीलधाऱ्या माणसाला पाहून पराक्रमी तरुणांना मनस्वी आनंद होतो. हे आनंदसुख विदुराच्या आगमनाने पाण्डवांना झाले. कुंतीला देखील मोठी धन्यता वाटली. पण सगळ्यांचा ह्या प्रेमळ स्वागताचा स्वीकार विदुराला मात्र मोकळ्या मनाने घेता येईना. आपण गडबडीत असून हस्तिनापुराला परत लवकर जाण्याची घाई आहे, असे सर्वांना सांगून त्याने एकांतात युधिष्ठिराची गाठ घेतली आणि त्याच्यापुढे त्याने आपले मन मोकळे केले.

तो म्हणाला, "युधिष्ठिरा, महाराज धृतराष्ट्रांच्या वतीने मी तुला द्यूत खेळण्याचे निमंत्रण द्यावयास आलो आहे. द्यूत खेळण्यासाठी तू हस्तिनापुरास यावेस अशी महाराजांची इच्छा आहे."

"मला ती मान्य आहे. हा मी अनुग्रह समजतो." युधिष्ठिर आनंदाने म्हणाला.

"नाही युधिष्ठिरा, ही अवकृपा आहे." विदुर म्हणाला, "काळाची पावले भलतीकडेच पडू लागलेली मला दिसत आहेत. द्यूत हे अनर्थाचे मूळ आहे. शिकाऱ्यांच्या वाद्यांच्या नादाने नादावलेला वनराज आपणहून, त्याला पकडण्यासाठी पसरलेल्या जाळ्याकडे

जातो तशी तुझी स्थिती होऊ देऊ नकोस. हे क्रीडेचे आवाहन कदाचित मृत्यूचे आव्हान ठरेल."

"आणि ते स्वीकारणं ह्याच क्षत्रियाचा धर्म आहे." धर्म म्हणाला.

"नाही धर्मा, हे रणाचे, पराक्रमाचे आव्हान नाही." विदुर बोलत होता, "हे कपटाचे आवाहन आहे. इथे मानाचा मृत्यू नाही. अपमानाचं जीवन आहे. पट्टीचा द्यूतप्रवीण, कपटी गांधारराज शकुनी पाण्डवांच्या भाग्याचे फासे उलटे फिरवायला अगदी उतावीळ होऊन बसला आहे. तसेच विविंशती, राजा चित्रसेन, सत्यव्रत, पुरूमित्र व विजय असे द्यूतक्रीडेत प्रवीण असलेले राजे महाराजे तिथे जमलेले आहेत. ह्या सर्व गोष्टी लक्षात घे आणि–"

त्याचे बोलणे अर्ध्यावरच तोडून धर्मराज उतावीळपणे म्हणाला, "मी निमंत्रणाचा स्वीकार केला आहे, विदुरकाका. अशा पट्टीच्या कुशल, प्रवीण क्रीडापटूंशी खेळण्याची संधी, नाही तरी कधी मिळणार मला ?...शिवाय धृतराष्ट्र महाराजांच्या आज्ञेचा मी भंग करू शकत नाही. पिता पुत्राचे नेहमी कल्याणच चिंतील. महामंत्री, सम्राटांना सांगा, मी निमंत्रणाचा स्वीकार केला आहे."

"तुझी इच्छा. इन्द्रप्रस्थाच्या सम्राटाचं स्वागत करायला आणि अभीष्ट चिंतिण्याला हस्तिनापुराचा महामंत्री तिथं निश्चितच उपस्थित असेल." ह्या शब्दांनी विदुराने युधिष्ठिराचा निरोप घेतला आणि हस्तिनापुराला जाण्यासाठी रथामध्ये प्रवेश केला.

हस्तिनापुराच्या भव्य प्रासादामध्ये शकुनीने द्यूताचा पट मांडला. पांडवांची, अशुभयोग दर्शविणारी कुंडलीच जणू काही त्याने मांडली. धर्माने फासा टाकला. दैवाने तो उलटविला. आणि पांडवांचा संसारपट उधळला गेला.

आज पांडव देशोधडीस लागणार पण उद्या सर्व कुळाचाच नाश होणार, हे पाहणारा दीर्घदर्शी महामंत्री विदुर ओरडून धृतराष्ट्राला म्हणाला, " महाराज, हे कपटद्यूत थांबवा. शकुनीचे द्यूतकौशल्य आम्हांला पूर्णपणे परिचित आहे. द्यूतातील कपटविद्या त्याला पूर्णपणे अवगत आहे. शकुनीला परत जाऊ द्या. पांडवांशी युद्ध ओढवून घेणे हितावह नाही."

'विनाशकाले विपरीत बुद्धिः।' कोणालाच विदुराकडे बघण्याचीही सुबुद्धी होईना. रथ, वाजी, गज सर्व पाण्डववैभव कौरवसत्तेच्या अधीन झाले. धर्मराजाने आपले आणि आपल्या बंधूंचे स्वातंत्र्यही अखेर पणाला लावून गमावले. पांडव दास झाले. शेवटी द्रौपदीला त्यांनी दासी ठरविले. दासी द्रौपदीला दरबारात ओढीत आणायची आज्ञा दुर्योधनाने दुःशासनाला केली. दुःशासनाने केस धरून ओढीत आणलेली द्रौपदी पाहून सर्व वयोवृद्धांच्या, तपोवृद्धांच्या माना शरमेने खाली वाकल्या. पण एक मान संतापातिशयाने थरथरत धृतराष्ट्राकडे वळली. अधःपतनाच्या प्रत्येक पावलाच्या वेळेस सम्राटाचा तोल सावरण्याचा सतत प्रयत्न करणारा महामंत्री विदुर होता तो! विदुर म्हणाला, " महाराज, सर्वनाश करण्यास उद्युक्त झालेल्या ह्या दुर्योधनाला आवरा...मरणाऱ्या माणसाला औषध आवडत नाही त्याप्रमाणे आपणांस माझे बोलणे आवडणार नाही. तरी पण माझे कर्तव्य म्हणून आपणांस मी जे कल्याणकारक आहे ते सांगतो. या पाप्याच्या बंधनाने विनाश टळेल. याला बंधनात टाका. तशी आज्ञा द्या मला."

हे विदुराचे शब्द ऐकताच रागाने, अन्यायाचे थैमान घालणारा दुर्योधन म्हणाला, " महामंत्री, तुम्हीच चालते व्हा इथून. आम्हांला आमच्या शत्रूची बाजू घेणाऱ्या अशा मंत्र्याची बिलकूल जरूर नाही."

दुर्योधनाचे हे उद्धट शब्द ऐकून विदुर ताडकन उठला आणि राणीवशात जाऊन गांधारीला बाहेर घेऊन आला. आणि तिला म्हणाला, "पतिव्रते गांधारी, तुझ्या सुनेची ही विटंबना थांबव."

गांधारी रागाने म्हणाली, "दुःशासना, हात आवर...महाराज, ह्या साध्वीची ही विटंबना आत्ताच्या आत्ता थांबवा."

गांधीरीच्या शब्दांत एवढे सामर्थ्य होते, की दुष्टांचे हात सामर्थ्यहीन होऊन लुळे पडले. धृतराष्ट्राच्या आज्ञेनुसार पांडव वनवासाला गेले.

पांडव वनवासास गेल्यानंतर विषण्णचित्त झालेला विदुरदेखील धर्माकडे गेला. धृतराष्ट्राला नंतर पश्चात्ताप झाला. विदुराचे व्यक्तिमत्व फार मोठे होते. केव्हा संधी करावा आणि केव्हा व कसे युद्ध करावे याबाबतीतील राजनीतीचे विदुराचे ज्ञान सुसूक्ष्म होते. यामुळे त्याच्या सहकार्यामुळे पांडवांचा उत्कर्ष होईल अशी भीती धृतराष्ट्राला वाटत होती. म्हणून, "तू माझ्या धर्मज्ञ बंधूला घेऊन ये ताबडतोब. तो बुद्धिमान आहे. कपटी नाही." असे सांगून त्याने संजयाला विदुराला परत आणण्यासाठी पाठविले. संजय काम्यक वनात गेला व युधिष्ठिराला आणि विदुराला भेटला. पांडवांचा निरोप घेऊन चलण्याविषयी त्याने धृतराष्ट्राच्या वतीने विदुराला विनंती केली. विदुर संजयाबरोबर परत आलेला पाहताच धृतराष्ट्राला अत्यानंद झाला. तो विदुराला म्हणाला, "मला क्षमा कर."

"वडील बंधूच्या व राजाच्या नात्याने तू मला मान्य असल्याने मी तुला क्षमा केलीच आहे," असे सद्‌गदितकंठ होऊन विदुर म्हणाला.

धर्म, न्याय, सत्य, राजकारण आणि विवेकशीलता या सर्वच बाबतींत विदुर श्रेष्ठ होता. खरे महानुभावत्व आणि सौहार्द या

सर्व दृष्टींनी महामंत्री विदुर केवळ अद्वितीय पुरुष होता. शुक्र, बृहस्पती, भीष्म यांच्या तोडीचे विदुराचे ज्ञान होते. बारा वर्षांचा वनवास आणि एक वर्षाचा अज्ञातवास संपवून पांडव परत आले. तेव्हा त्यांचे राज्य त्यांना परत द्यावयास त्याने धृतराष्ट्रास सांगितले. त्याने सामोपचाराने पांडवांशी वागावे असे पुन्हा पुन्हा धृतराष्ट्रास सांगितले. त्याने त्याला उपदेश केला. हीच विदुरनीती. तो म्हणाला,

"महाराज, जो आस्तिक आहे, गुरुवचन वेदवचन ह्यांवर ज्याचा विश्वास आहे आणि ज्याच्या विचारांना 'मी'पणाचा स्पर्श नाही तोच खरा पण्डित. शत्रूशी मैत्री आणि मित्रांचा द्वेष जो करतो त्याला शहाणे लोक मूर्खच म्हणतात. मनामध्ये कपट, वरती प्रेमभाव अशी वागणूक नसावी."

ही विदुरनीती ऐकून मान डोलवून धृतराष्ट्र म्हणाला, "विदुरा, तू म्हणतोस हे मनाला कळते रे. पण वळत नाही. पांडव साधू यशस्कर आहेत. माझे सुत असाधू अयशस्कर आहेत हे समजते मला. तुझ्या उपदेशात माझे मन रमतेही. पण पुत्रप्रेमाच्या भोवऱ्यात ते पुन्हा पुन्हा सापडते."

तेव्हा धृतराष्ट्राला अध्यात्म ऐकण्याची इच्छा आहे, हे ओळखून,

"विदुर म्हणे आर्या ! ते सांगावे ब्राह्मणे न अन्याने ।
ठावे, परि न वदावे स्वमुखे म्या शूद्रयोनिजन्याने ॥"

केवढी लीनता. सनत्कुमारांइतके अध्यात्माचे ज्ञान असूनही शूद्रयोनीत जन्मल्याने आपणांस ते सांगण्याचा अधिकार नाही, आपण शास्त्र-मर्यादा उल्लंघू इच्छीत नाही असे विनयाने विदुर धृतराष्ट्राला म्हणाला.

पांडवांच्या वतीने शिष्टाई करण्यासाठी श्रीकृष्ण हस्तिनापुरास आला. पाच भावांसाठी पाच गावे मागण्यासाठी श्रीकृष्ण आला

होता. धृतराष्ट्राने त्याच्यासाठी मोठा स्वागतसमारंभ आयोजिला. श्रीकृष्णाच्या आगमनाने आपण अतिशय आनंदित झालो आहोत, असे तो आणि त्याचा जेष्ठपुत्र दुर्योधन वारंवार बोलून दाखवीत होते. पण केवळ शब्दांच्या उच्चारावरून व हावभावांवरून कारस्थाने ओळखू शकणाऱ्या बुद्धिमान विदुराने त्या पितापुत्रांच्या अंतःकरणातील कपट केव्हाच जाणले. ज्यांना मुद्याची कोणतीच गोष्ट मान्य करावयाची नसते ते तपशिलालाच फार महत्त्व देतात. सामोपचाराने पांडवांचे राज्य कौरवांनी त्यांना परत द्यावे व कुलनाश टाळावा असा शक्य तितका प्रयत्न विदुराने केला. तो विदुराला स्पष्ट म्हणाला, "कपट मनी प्रेम वरी असे करू नका. जे शहाणे असतात ते सर्वस्व प्रभुचरणी अर्पण करतात. पाच गावे पाच पुत्रांना द्यावीत. त्यामुळे शिष्टाईला आलेले श्रीकृष्ण प्रसन्न होतील. ही महत्त्वाची गोष्ट न करता त्या विश्वनाथापुढे आपल्या वैभवाचे प्रदर्शन कशाला ? त्याला तुम्ही हय, गज, रथ, दास, दासी हे कशाला देणार महाराज,

'गुळखोबरे विलोकुनि भलत्याहि जनास बालक वळावा।
सत्य प्रेमचि दावुनि सुज्ञे तो विश्वपाळ कवळावा॥'

पण त्याचे हे प्रयत्न व्यर्थ ठरले.

निराश मनाने तो, शिष्टाईसाठी आलेल्या श्रीकृष्णाला म्हणाला सुद्धा, "आपण येथे येण्याचे श्रम व साहस व्यर्थ केले. अत्यंत दुष्टबुद्धीचे अनेक लोक भोवताली बसले असता त्यांच्यामध्ये जाणे योग्य होणार नाही. हे सर्व शत्रू आहेत. कपटी आहेत. ह्यांना शांतता, प्रेम, सहकार्य, साम ह्या सर्वच शब्दांचे वावडे आहे. सर्वज्ञा जगदीशा, आपण साम करण्यासाठी आलात. कौरवपांडवांच्यामध्ये प्रेमसुख नांदावे म्हणून प्रयत्न करण्यासाठी आपण आलात. पण प्रेम मौक्तिकाची किंमत हंसाला. कावळ्यांना मांसखण्डच प्रिय."

भगवान श्रीकृष्णसुद्धा ही गोष्ट जाणत होता. तरीही कर्तव्य-बुद्धीने कौरवेश्वराची भेट घेऊन त्याने पाच भावांसाठी पाच गावांची मागणी केली. पण उन्मत्त दुर्योधनाने, "पाच गावेच काय पण सुईच्या अग्रावर मावेल इतकी मातीही पांडवांना मिळणार नाही," असे उद्दामपणाचे उत्तर दिले. तेव्हा श्रीकृष्ण हस्तिना-पुराच्या सम्राटाच्या वैभवदर्शक पाहुणचाराचा स्वीकार न करता तिथून बाहेर पडला तो विदुराघरी आला.

योगेश्वर द्वारकाधीश पांडवसखा श्रीकृष्ण कौरवांचे थाटाचे आदरातिथ्य धिक्कारून आपल्या गरिबाघरच्या कण्या गोड करून घ्यायला आलेला पाहून विदुराला मोठी धन्यता वाटली. श्रीकृष्णाचे त्याने प्रेमाने स्वागत केले. हृदयी दाटून आलेला आनंद नयनातून ओसंडला. तो देवाला म्हणाला, "हे कमलनेत्रा, तुझ्या दर्शनामुळे मला जो आनंद झाला आहे तो मी तुला सांगितलाच पाहिजे काय? तू सर्व लोकांचा अंतरात्मा असल्यामुळे तू सर्व ओळखू शकतोस. आज माझे जीवन सार्थ झाले. प्रत्यक्ष पतितपावन परमेश्वर मज पामराच्या सदनी आला, केवढे माझे भाग्य! भक्तहृदयेश्वरा, आता माझ्या ताककण्या गोड मानून घ्या हीच माझी प्रार्थना."

महामंत्री विदुराचा हा भक्तिभाव, ही विनयशीलता पाहून श्रीकृष्ण प्रसन्न झाला. आणि त्याने त्याच्या आदरातिथ्याचा यथेच्छ स्वीकार केला. भगवंताने विदुरगृही केलेल्या या भोजनाचे कवि-वर्य मोरोपंतांनी मोठे रसाळ वर्णन केले आहे. मोरोपंत म्हणतात,

"शतसंख्य वाजवी ज्या जेववितां माय देवकी चुटक्या।
तो नित्यतृप्त भगवान् विदुरगृही भोजनात दे मिटक्या॥
आले ढेकर, दिधल्या मिटक्या, बहुसाल मारिले भुरके।
उरके सर्वांमागुनि अशन, परि न ताट चाटणे उरके॥"

श्रीकृष्णाने केलेला संधीचा प्रयत्न फसला आणि संग्रामाचे रणशिंग फुंकले गेले. धर्मक्षेत्र कुरुक्षेत्र रणक्षेत्र बनले. धृतराष्ट्र हा हस्तिनापूरचा सम्राट झाल्यापासून सतत शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारा महामंत्री विदुर मात्र ह्या प्रकाराने अशांत झाला. त्याने कुरुक्षेत्राकडे पाठ फिरविली आणि प्रभास क्षेत्राची वाट धरली. संन्यस्तवृत्तीने त्याने तीर्थयात्रा केली. उद्धवदर्शनाचा त्याला लाभ झाला आणि मैत्रेयोपदेश श्रवण करण्याचे भाग्य त्याला मिळाले. मनाची वृत्ती मूळचीच परमार्थाकडे कल असलेली, ती आता पूर्ण-मुक्त झाल्याने अध्यात्मात विशेषच रंगली.

भारतीययुद्ध संपले. कौरवांचा सर्वनाश झाला. शंभर पुत्रांचा पिता धृतराष्ट्र पुत्रमोहाने अंध झाल्याने पुत्रहीन ठरला. पुत्रमोहाने पुत्रशोक ओढवला. वैभवलालसेच्या मागे लागून वैभवाला तो परका झाला. वैभवाचे मोहोळ होते तोपर्यंत घोंगावून येणाऱ्या मधुलोलुप माशा वैभवमधूची आशा नाहीशी झाल्यावर आधारवृक्षाला सोडून गेल्या. आणि तो आधारवृक्ष विजनवासी ठरला. आणि हे वृत्त कळताच तीर्थयात्रेच्या मार्गाची वाटचाल करणारा विदुर क्षणाचाही विलंब न लावता धृतराष्ट्राच्या सेवेला धावून आला. राजाचा मंत्री म्हणून धृतराष्ट्राच्या ऐश्वर्यकाळात विदुर त्याच्याबरोबर राहिला त्याप्रमाणे नष्टपुत्र, राज्यहीन व शोकदग्ध धृतराष्ट्राच्या वाईट दिवसांतही विदुर त्याचा मंत्री म्हणून त्याच्या सहवासात राहिला. शेवटपर्यंत स्वतःचा राजा म्हणून त्याने धृतराष्ट्राची सेवा केली. अनेक वेळा सांगितलेला सुज्ञपणाचा मार्ग न स्वीकारता धृतराष्ट्राने सर्वनाश ओढवून घेतला. तरी त्याच्यावर रागवून विदुराने त्याला अंतर दिले नाही. धृतराष्ट्राने अरण्यवास स्वीकारला. विदुरही त्याच्याबरोबर वनवासी झाला. संपत्तीच्या मोहाने त्याचे मन जसे

विचलित झाले नाही तसेच ते विपत्तीतही विचलित होऊन कार्य-विन्मुख झाले नाही. हेच खरे सर्वश्रेष्ठ आत्मज्ञान, हीच सर्वश्रेष्ठ विद्या. राज्याचे अधिकारी झालेल्या पाण्डवांनी दिलेल्या सन्मानाचा परित्याग करून आणि पाण्डवांना प्रेमभराने मंगल आशीर्वाद देऊन धृतराष्ट्राचा महामंत्री विदुर आपल्या राजाबरोबर अरण्यात गेला. ही खरी विनयशीलता.

अशा ह्या विनयशील विद्वानाने अरण्यात घोर तपश्चर्या केली. युधिष्ठिर त्याच्या दर्शनास गेला असता आपलाच अंश असलेल्या युधिष्ठिराच्या तेजात आपली जीवनज्योत मिसळून टाकून विदुराने आपले इहलौकिक जीवन संपविले.





# धर्मात्मा एकनाथ

दुपारची वेळ टळून गेली होती. गावाच्या शिवाराबाहेर एका नितांत रम्य शिवालयामध्ये काही ग्रामस्थ, काही पांथस्थ विश्रान्तिसुख अनुभवीत होते. उन्हे विसावली होती आणि सावल्या लांब लांब पसरू लागल्या होत्या. दिनमणी मावळतीकडे कलू लागला होता. देवालयाच्या मागल्या अंगाला देवालयाच्या सावलीमध्ये काही गाईगुरे विसावली होती. ती आता अंगे थरारून हळूहळू उठू लागली होती. घाटाच्या बाजूने येणारे बासरीचे सूर त्यांना घाटाकडे बोलावीत होते. गोदावरी नदीच्या थंडगार पाण्यामध्ये पाय सोडून बसलेला गुराख्याचा पोर देवळाकडे पाहून बासरी वाजवीत होता. गोदावरी म्हणजे दक्षिण-गंगा. आणि तिच्या काठचे हे प्रतिष्ठान, पैठण म्हणजे दक्षिण-काशी. नदीवर मोठा विस्तृत घाट बांधला

होता आणि त्या घाटावरच ते भव्य शिवालय होते. दुपारच्या वेळी गावकरी देवळात विसावा घेत. रखरखीत उन्हात भाजून निघण्याच्या भीतीने पाखरे झाडांच्या हिरव्या पानाआड दडत. गाईगुरे देवळाच्या मागल्या बाजूला विसावा घेत. फार कशाला-वारा पडलेला असल्याने गोदावरीचे जलसुद्धा कसे निपचित पडलेले असायचे. पण आता दुपार टळून गेली होती.

वाऱ्याच्या झुळुकी थबकत थबकत जललहरींना जाग्या करू लागल्या होत्या. जललहरी खळाळत काठावर आदळत होत्या. त्यांचा गारवा घेऊन वारा लांब शिवारभर पसरला होता. त्याच्या शीतल-स्पर्शाने देवळामागली गुरे जागी होऊन घाटाकडे येऊ लागली होती. तिथे जवळच असलेल्या एका झाडाच्या ढोलीतही तो थंडगार वारा शिरला. त्या झाडावरून एक पाखरू पंख फडफडवीत बाहेर पडले व त्याने दूर गगनाकडे झेप घेतली. देऊळसुद्धा आता जागे झाले होते. त्या देवळातून एक दहाबारा वर्षांचा ब्राह्मणाचा मुलगा झपाट्याने बाहेर पडला. त्याने सरळ गावाबाहेर पडणारा रस्ता धरला.

नदीच्या पात्रामध्ये पाय सोडून बसलेल्या त्या गुराख्याच्या मुलाने त्या ब्राह्मणाच्या मुलाला पाहिले आणि तो झटकन तिथून उठला तो धावत धावत आणि एकीकडे 'नाथा, अरे नाथा' अशी हाक मारीत त्या मुलापाशी आला. त्या मुलाला गाठल्यावर त्याला थांबवून तो गुराख्याचा मुलगा त्याला म्हणाला, "अरे नाथा, तू चाललास तरी कुठे ह्या देवगडच्या रस्त्याने ?"

तो ब्राह्मणाचा मुलगा म्हणाला, "देवगडच्या रस्त्याने दुसरीकडे कुठे जाणार ? देवगडला !"

"अरे काय म्हणतोस काय नाथा ?" आश्चर्याने 'आ' वासून नाथाकडे पाहात तो मुलगा म्हणाला.

" अरे खरेच पांडू ! देवगडला जनार्दनस्वामी म्हणून आहेत. त्यांच्याकडे अध्ययनासाठी मी जात आहे." नाथा सांगू लागला. "आत्ता मी देवळात नेहमीप्रमाणे झोपलो होतो ना .. तेव्हा प्रत्यक्ष महादेव माझ्यापुढे उभे राहिले आणि मला म्हणाले, 'नाथा, जागा हो, तुझा जन्म असा व्यर्थ झोपा काढण्यासाठी नाही. देवगडला जा. तिथे जनार्दनस्वामी आहेत. त्यांच्याकडे वेदविद्या ग्रहण कर. तपश्चर्या कर. आणि प्रापंचिकांना प्रपंचात राहूनच परमार्थ कसा आचरणात आणावयाचा हे सांगायला आणि दाखवायला सिद्ध हो'... आणि मग मी जागा होऊन गाभाऱ्याकडे पाहिले ... झटकन पिंडीवरची दोनचार फुले वाऱ्याने उडून माझ्याजवळ येऊन पडली. परमेश्वराची ही आज्ञा समजून मी आता देवगडास निघालो आहे. हे बघ, तू आणि तुझी आई माझ्या घरी जा ... माझ्या आजोबांना ही गोष्ट सांगा ... त्यांची समजूत घाला वरं का तुम्ही दोघं."

" अरे, मग तू त्यांना सांगून का जात नाहीस ? " पांडूने विचारले.

" पांडू, ते मला जाऊ देणार नाहीत रे ! " नाथा सांगत होता. " त्यांचे माझ्यावर फार प्रेम आहे. माझे आईबाबा मला लवकरच सोडून गेले" .. नाथाच्या डोळ्यात अश्रू तरळत होते. तो पुढे सांगू लागला, " माझ्या आजोबांनी मला लहानाचे मोठे केले. मी त्यांचा एकुलता एक नातू ... घराण्याचा एकच एक अंकूर ... म्हणून तर माझं नाव एकनाथ ठेवलं त्यांनी ... त्यांना सांग मी अध्ययन झाल्यावर निश्चित परत येईन ... येतो मी पांडुरंगा."

पांडूचा निरोप घेऊन बारा वर्षांचा एकनाथ पैठण सोडून निघाला. वाटेत अनेक अडचणी आल्या पण इच्छा असल्याने त्यांतून मार्ग निघाला आणि एकनाथ देवगडला जनर्दनस्वामींच्या दारात उभा राहिला.

"कोण ?" देवपूजा करीत बसलेल्या जनार्दनस्वामींनी विचारले.

"मी एकनाथ! पैठणच्या चक्रपाणींचा नातू." एकनाथ म्हणाला.

"भानुदासांचा पणतू ?" कुतूहल जागृत होऊन उत्सुकतेने जनार्दनस्वामींनी विचारले, "कर्नाटकातून पांडुरंगाच्या मूर्ती पंढरीला आणणाऱ्या संत भानुदासांचा पणतू ?"

"हो!" खाली मान घालून उभा असलेला एकनाथ म्हणाला.

"ये! ये! आत ये," असे म्हणून जनार्दनस्वामींनी उठून त्याला हात धरून आत नेले आणि पुन्हा विचारले, "तू कशासाठी आलास माझ्याकडे ?"

"अध्ययनासाठी!" एकनाथाने उत्तर दिले.

"ठीक आहे!" असे म्हणून जनार्दनस्वामी देवपूजेकडे वळले.

दुसऱ्याच दिवसापासून एकनाथाचे अध्ययन सुरू झाले. सांदीपनी ऋषींजवळ राहून त्यांची सर्वप्रकारे सेवा करून श्रीकृष्णाने जसे अध्ययन केले त्याप्रमाणे एकनाथांनी जनार्दनस्वामींच्या घरी राहून त्यांची मनोभावे सेवा करून अध्ययन केले. ज्ञानेश्वरी, अमृतानुभव हे ग्रंथ त्यांनी अभ्यासिले. योगविद्येचा त्यांनी अभ्यास केला. त्यांची सेवाबुद्धी, त्यांची अलौकिक ग्रहणशक्ती पाहून जनार्दनस्वामी प्रसन्न झाले. गुरुकृपेचा लाभ नाथांना झाला. स्वामींनी नाथांना पंढरीचा सोपा मार्ग सांगितला. विठ्ठलनामाचा संजीवनी मंत्र त्यांनी एकनाथांना दिला. गुरूंच्या आज्ञेप्रमाणे एकनाथांनी देवगडच्या वायव्येस असलेल्या शूलभंजन पर्वतावर सहा वर्षे तपश्चर्या केली. तप:साधनेने मन:सामर्थ्य वाढले. विविध आणि विशाल समाजाचे जवळून दर्शन होऊन दृष्टी उदात्त होण्यासाठी गुरूंसमवेत एकनाथांनी

तीर्थयात्रा केली. ह्या तीर्थयात्रेच्या वेळी चंद्रावती नामक नगरामध्ये गुरुशिष्यांचे वास्तव्य होते. तेव्हा चंद्राभट नावाच्या पण्डिताने भागवतातील चतु:श्लोकांवर पुराण सांगितले. ते जनार्दनस्वामींना अतिशय आवडले. त्यांनी नाथांना चतु:श्लोकांवर ओवीबद्ध टीका करण्याची आज्ञा केली. गुरूची आज्ञा हाच आशीर्वाद मानून एकनाथांनी पंचवटीला मुक्काम असताना स्वामींच्या आज्ञेप्रमाणे भागवतातील चतु:श्लोकांवर ओवीबद्ध टीका लिहिली. हीच एकनाथांची पहिली मराठी काव्यरचना, 'चतु:श्लोकी भागवत'. आपल्या शिष्याची ही श्रेष्ठ काव्यरचना पाहून जनार्दनस्वामींना अतिशय धन्यता वाटली. पण स्वतः नाथ आपल्या ह्या पहिल्या वहिल्या काव्यरचनेविषयी अतिशय विनयाने म्हणतात, –

"श्री भागवत आणी भाषे मराठे । हे बोलणे नवल वाटे ॥
पूर्वी नाही ऐकिले कोठे । अभिनव मोठे धिटावा केला ॥१॥
माझे आरूषवाणे बोलणे । कलाकुसरी कौतुक नेणे ॥
जे बोलविले जनार्दने । तेचि ग्रंथकथने कथिले म्या ॥२॥"

ह्या 'चतु:श्लोकी भागवता'ची रचना करून आपण दिलेल्या विद्येचे ह्या विनयशील शिष्याने चीज केले, अशी खात्री होऊन जनार्दनस्वामींनी आपल्या ह्या विद्वान शिष्याला पैठणला परत जाण्याची अनुज्ञा केली. ती अनुज्ञा शिरसावंद्य मानून एकनाथ पैठणला परत आले.

जनार्दनस्वामींच्या सहवासात दीर्घकाल राहून व सेवाधर्म स्वीकारून ज्या जीवनाची तयारी नाथांनी देवगडास केली होती ते त्यांचे 'ईश्वर: सर्वभूतानां हृद्देशे तिष्ठति ।'– सर्व प्राणिमात्रांच्या हृदयात परमेश्वर आहे, अशा उदात्त भावनेने भारलेले समाज–जीवन पैठणास सुरू झाले. त्या वेळेस त्यांचे वय पंचवीस वर्षांचे होते.

त्यांनी विवाह केला. त्यांच्या पत्नीचे नाव गिरिजाबाई होते. प्रपंच आणि परमार्थ ह्या विरोधी गोष्टी नाहीत, ही शिकवण नाथांना समाजास द्यावयाची होती. प्रपंचाकडे पाठ फिरवून परमार्थाची वाट धरणे ही गोष्ट जशी चुकीची आहे, त्याप्रमाणेच प्रपंचात पूर्णपणे गुरफटून जाऊन परमार्थाला विसरणे हे देखील चूकच आहे. परमार्थ-बुद्धीने प्रपंच करणे हा सत्यधर्म एकनाथांना समाजाला सांगावयाचा होता. आणि 'आधी केले मग सांगितले' ह्या तत्त्वाप्रमाणे त्यांनी स्वतःचा प्रपंच परमार्थस्वरूप करून टाकला होता. आणि ह्यात त्यांना त्यांच्या पत्नीचे साहाय्यच झाले. अत्यंत यशस्वी रीतीने प्रपंच करून परमार्थ साधता येतो हे नाथांनी आपल्या उदाहरणाने दाखवून दिले. 'सर्व भूतहिते रतः।' हे तत्त्व त्यांनी आपल्या आचरणाने सर्वांना पटवून दिले. 'सर्व प्राणिमात्रांमध्ये परमेश्वर पाहावा.' ही शिकवण केवळ त्यांच्या विचारात, उच्चारात होती असे नाही तर ती त्यांच्या आचारात होती. ते तसे वागत असत. आणि हेच समाजातल्या बुरसटलेल्या विचारांच्या लोकांना खपत नसे.

एकदा असेच झाले. टळटळीत बाराची वेळ होती. नाथ नदी-वरून परत येत होते. वाळवंट इतके तापले होते, की पाय ठरत नव्हता. चटके बसत होते पायांना. अशा रखरखीत वाळवंटात एक काळेविद्रे पोर वर पाय उडवून तळतळून रडत होते. एका फाटक्याशा पटकुरात ते पोर गुंडाळलेले होते. त्याचे तोंड रडून रडून पार सुकून गेले होते. ते मूल पाहिले आणि नाथांचे हृदय द्रवले. ते झटकन खाली वाकले आणि त्यांनी ते मूल आपल्या शालजोडीत गुंडाळून घेतले, हृदयाशी कवटाळिले. डोक्यावर एरंडाचे पान थापलेल्या एका वृद्ध ब्राह्मणाने दुरूनच एक तंगडी उंचावून एकनाथांच्याकडे पाहिले. मृत्युलोक आणि पाताळ ह्यांची उलटा-

पालट झाल्यासारखे वाटून ते द्विजवर्य जवळ जवळ किंचाळलेच, "अहो नाथ, ते महारड्याचं पोर आहेऽ."

"हो, आपल्या गावच्या हरिजनाचं बालक आहे हे...अगदी व्याकुळ झाला आहे त्याचा कोमल जीव. प्राजक्ताची फुलं थोडावेळ हातात धरली तर लगेच कोमेजून जातात. हे तर ऐन वाराचं ऊन." नाथ प्रेमळपणे म्हणाले आणि घराकडे जाऊ लागले. तोच—त्यांच्या कानांवर शब्द आले,

"अगबया ! नाथ–"

त्या बावरलेल्या स्त्रीकडे पाहात नाथ म्हणाले, "पाहतीस काय बाई ?.. हे धर तुझं पाडस. असं कसं रविराजाच्या वटारलेल्या द्वादश डोळ्यांच्या वणव्यात होरपळत टाकलंस ?"

नाथांनी ते बालक त्या स्त्रीजवळ दिले आणि ते चालू लागले. ती बाईही आपल्या घराकडे जाऊ लागली. पण जाता जाता सतरा वेळा ती मागे वळून नाथांच्या पाठमोऱ्या आकृतीकडे पाहात होती.

ती हरिजन स्त्री आपल्या घरी गेली ती तशाच बावरलेल्या स्थितीत. तिची ती स्थिती पाहून तिच्या नवऱ्याला फार आश्चर्य वाटले. तो तिच्याकडे पाहातच राहिला. शेवटी न राहून त्याने तिला विचारले, "काय झालं ?"

तिने आपल्या बाळाला कोपऱ्यात अडकविलेल्या झोळीत ठेवले आणि ती चुलीपुढे बसली. जरा मन शांत झाल्यावर ती सांगू लागली, "जगाविरहितच गोष्ट. पाणी आणण्याच्या घाईत मी बाळाला वाळवंटावरच ठेवून आले होते. आम्हा महारांना, एवढी गोदावरीमाई मोकळ्या मनाने खळाळून वाहात असताना, पाणीसुद्धा तेवढं सहजासहजी मिळत नाही. सारी यातायात त्याच्यासाठी.. म्हणून मिळाले ते हंडाभर पाणी घेऊन घरी आले. बाळ

तसाच वाळवंटात रडत होता....परत लगबगीने गेले. पाहते तो काय–? ''

'' काय झालं ? सांगशील तर खरं ! '' तिच्या नवऱ्याने उतावीळपणे विचारले.

अचंब्याने तोंडाला पदर लावून ती म्हणाली, '' अव, आपल्या बाळाला नाथांनी उचलून घेतलं होतं. आणि शालजोडीमध्ये गुंडाळून कसं अलगद फुलाप्रमाणं उराशी कवटाळून धरलं होतं. इतर लोक आम्ही रस्त्यानं चाललो असलो तर आमची सावली अंगावर पडेल म्हणून दुरून चालतात. आणि माझ्या बाळाला नाथांनी आज हृदयाशी कवटाळलं. ''

'' भाग्यवान आहे आपलं पोरगं. '' तिचा नवरा बोलत होता, '' तुला ठावं नाही सारजे, पण नाथ म्हणजे आपल्या पैठणचा देव आहे. देवळामध्ये नाथांचं कीर्तन चाललं असलं म्हणजे सारं पैठण लोटतं तिथं. आपल्यासारखी गांजलेली गरीब माणसं रंगून जातात आणि क्षणभर दुःख विसरतात. नाथ सांगतात, ' देव सगळीकडे आहे. ' परवाचं त्यांचं ते कथेतील गाणं किती सुरेख आहे, काय बरं... ? हं आठवलं–''

'' कृष्णा कैसी खेळू लपंडाई । अनंत लोचन तुझे पाही ।
तेथे लपावे कवणे ठायी । तुझे देखणे लागले पाही ।। ''

''सर्वत्र देव भरून राहिला आहे असं त्यांना वाटतं. म्हणून तर त्यांनी बाळाला उचलून घेतलं...सारजे, हे तर काहीच नाही. पण नाथांची दुसरी ह्यापेक्षाही विलक्षण गोष्ट माहीत आहे तुला ? ''

'' नाही बाई, सांगा तरी. '' असे सारजा म्हणाली. तेव्हा तो सांगू लागला, '' एकदा नाथ गंगेची कावड घेऊन येत होते. रस्त्यात एक अगदी मरायला टेकलेलं गाढव पाय झाडीत पडलं होतं. उन्हाची

वेळ होती, पाण्याविना त्या गाढवाचा जीव अगदी कासावीस होत होता. नाथ थांबले तिथं. त्यांच्या मनातील प्रेमाची गंगा उचंबळून आली. काही विचार न करता त्यांनी कावडीतले गंगाजल त्या तहानेने व्याकूळ झालेल्या गाढवाला पाजले. त्याचा आत्मा संतुष्ट झाला. परमात्मा प्रसन्न झाल्याचा आनंद नाथांना झाला."

"खरोखर धन्य आहेत नाथ." असे म्हणून सारजाने अगदी भोळ्या भावाने हात जोडले आणि पुन्हा ती म्हणाली, "खरोखर आपल्या पैठणचा हा धर्मात्मा आहे. मी म्हणते, नाथ आपल्या घरी जेवायला नाही यायचे ?"

"अग, काय म्हणतेस काय ? महार आपण. नाथ बामण !" सारजेचा नवरा म्हणाला.

"पण बघा तर खरं बोलवून." सारजा नवऱ्याला आग्रहानं सांगत होती, "माझं मन सांगतय मला, नाथ नक्की येतील."

आणि मग सारजेचं मन गणूला, सारजेच्या नवऱ्याला मोडवेना. त्याने नाथांना बोलवायला जायचे ठरविले.

नाथ सारजेचे मूल सारजेच्या स्वाधीन करून घरी परतले. घरात प्रवेश करताच त्यांचा मुलगा हरिपण्डित पुढच्याच ओसरीवर येरझारा घालीत असलेला त्यांना दिसला. हरिपण्डित खरोखर पण्डित होता. वेदशास्त्रपारंगत होता. भक्तीपेक्षा ज्ञान तो श्रेष्ठ मानीत होता. तो मोठा कर्मठ होता. आणि म्हणून तो नाथांच्या आचरणाबद्दल नेहमी विरोध दर्शवीत असे. नाथांचा राग येत असे त्याला. आत्तादेखील तो रागावलेला आहे, हे त्याच्या येरझारा घालण्याच्या गतीवरून नाथांनी ओळखले.

नाथ शांतपणाने आत जाऊन हातपाय धुऊन पुन्हा बाहेर आले. ओसरीवर झोपाळा होता. त्यावर ते बसले. अंगावरची शालजोडी खाली काढून ठेवता ठेवता ते म्हणाले, "आज जरा उष्मा जास्तच होतोय नाही ?" हरिपण्डित काहीच बोलला नाही. त्याच्या येरझारा मात्र थोड्या मंदावल्या. पुन्हा नाथ शालजोडीच्या एका टोकाने वारा घेत म्हणाले, "नाही, मी हे माझ्या मनाशी बोलतो आहे. तुझी शतपावली काही उगीच थांबवू नकोस. तुला त्रास होत असला तर मी आपला देवघरात जातो."

मधेच थांबून हरिपण्डित म्हणाला, "मला त्रास होत असला तर ?...माझ्या मनाची कशाला एवढी पत्रास ?"

"म्हणजे ?...या तिरकस बोलण्याचा काही अर्थ ध्यानात येत नाही. पण्डित, तुझं मन नाराज होण्यासारखं काही अप्रिय घडलं आहे माझ्या हातून ?" नाथांनी विचारले.

"माझंच काय घेऊन बसलात !" हरिपण्डित रागाने बोलत होता, "ह्या प्रतिष्ठान नगरीतल्या किती तरी पण्डितांची मनं असंतुष्ट झाली आहेत तुमच्या वर्तणुकीनं."

"असं काय केलं मी पण्डित ?" नाथांनी प्रश्न केला.

हरिपण्डित आवेगाने म्हणाला, "केलं आहे, करीत आहात."

नाथ झटकन म्हणाले "कदाचित् माझ्या मनाने योग्य वाटलं तर मी ते पुढेही करीन. पण काय ते तर सांगशील ?"

"संस्कृत भाषेतील विचार-भाण्डार तुम्ही मराठीत आणू लागलात. गीर्वाण भाषेतील भागवतासारखा श्रेष्ठ ग्रंथ मराठी भाषेत तुम्ही आणीत अहात, देवळामधून कीर्तन, प्रवचन करताना भागवतातील श्रेष्ठ तत्त्वज्ञान तुम्ही मराठीसारख्या क्षुद्र भाषेत सांगता–" पण्डित असे म्हणताच नाथ म्हणाले, "मातृभाषा

क्षुद्र भाषा ? बहुजन समाजाची भाषा क्षुद्र भाषा आहे, असे म्हणणे ह्या लोकद्रोह आहे, समाजद्रोह आहे. लोकांशी लोकांच्या भाषेत बोललं पाहिजे. भागवतासारख्या श्रेष्ठ ग्रंथातील विचार त्यांना त्यांच्या भाषेत सांगितले पाहिजेत."

" अशा अज्ञानी लोकांना ते विचार तरी कशाला सांगायचे ? " पण्डिताने विचारले.

"ते सज्ञान व्हावेत म्हणून." नाथ गहिवरून म्हणाले, " पण्डित, ह्या लोकांना भागवत-धर्म शिकविण्यासाठीच ज्ञानदेवांनी भागवत मंदिराचा पाया घातला ना ?

" माझा मऱ्हाठाचि बोलु कवतुकें ।
परी अमृतातेहि पैजा जिंके ।
ऐसीं अक्षरें रसिकें । मेळवीन ।। "

अशी मनीषा धरून ज्ञानेश्वरांनी भगवद्गीतेतील अर्थ-भाण्डार सामान्य जनतेला दाखविण्यासाठी भावर्थ-दीपिका लिहिली ना ? "

" पण कशासाठी ही यातायात ? " हरिपण्डित त्रासून म्हणाला, " ज्यांना एवढी गीर्वाण भाषेतील तत्त्वज्ञान समजून घेण्याची इच्छा असेल त्यांनी गीर्वाण भाषा आत्मसात करावी, ते तत्त्वज्ञान समजून घ्यावे आणि फार तर गीर्वाण भाषेत विवेचन करावे. "

" अरे पण, ' गीर्वाण भाषा देवे केली ।
आणि मराठी काय चोरे आणली ? "

पण्डित, गीर्वाण भाषेतील विवेचन कोणासाठी ? ज्ञानी पण्डितांसाठी ? त्यांना त्याची जरूर नाही. ज्यांना जरूर आहे त्यांना संस्कृत येत नाही. "

" आणि म्हणून तुम्ही असंस्कृत होणार ! मघाशी गोपाळभट सांगत होते, तुम्ही महाराचे पोर उचलून कडेवर घेतले म्हणून. "

हरिपण्डिताचे हे शब्द ऐकून खेदाने नाथ म्हणाले, " हरिजनाचे मूल म्हणजे माणसाचेच मूल ना पण्डित ? माणुसकी विसरायला लावणारा हा जातिभेद मला मान्य नाही."

" पण प्रत्यक्ष भगवंतांनी सांगितलं आहे, 'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं–' पण्डिताचे विधान अर्ध्यावरच तोडीत नाथ लगेच म्हणाले, 'गुणकर्म-विभागशः।' गुण आणि कर्म यांचा विचार करून समाज धारणेसाठी चार वर्ण निर्माण झाले. त्या काळाची गरज ह्या दृष्टीने ते योग्य होते. पण आता तुम्ही जन्माने जाती ठरविण्याचा अविचार केला आणि धर्म म्हणून तो मानण्याचा आता अट्टाहास करता ? "

" प्रचलित धर्म न मानण्यापर्यंत तुमच्या विचारांची मजल गेली म्हणावयाची ! " पण्डित म्हणाला.

" रूढीला धर्म न मानण्याचा माझा विचार निश्चित आहे." शालजोडी घेऊन झोपाळ्यावरून उठत नाथ म्हणाले.

" रूढी जातिभेद मानते, म्हणजे उद्या कदाचित महाराच्या घरी जेवावयाला जाल." हरिपण्डित उद्वेगाने म्हणाला.

" काय भवितव्यता असेल ती खरी ! " नाथ म्हणाले. तोच माजघराच्या दारातून डोकावून गिरिजाबाई म्हणाल्या, " मागील दारी गणू आला आहे."

" कोण गणू ? " नाथांनी विचारले.

" महारवाड्यातला गणू महार." गिरिजाबाई म्हणाल्या.

" आलो मी ! " असे म्हणून नाथ आत गेले.

सारजेचा तर्क खरा ठरला. नाथांनी भोजनाचे आमंत्रण स्वीकारले. मागील दारी गणू महार ह्यासाठीच आला होता. त्याचा निर्मळ प्रेमळ भाव पाहून नाथांनी त्याला होकार दिला. गणूचा आनंद गगनात मावेना. आणि मग आपला आनंदाचा भार

हलका करण्यासाठी घरी जाऊन त्याने ही आनंदाची बातमी सारजेला सांगितली. पण दुसऱ्याला सांगितले असता दुःख हलके होते. सारजेला ती आनंदाची बातमी सांगताच आनंद उलटा दुणावलाच. आणि मग त्या दोन भाबड्या जीवांनी आनंदाच्या भरात दुप्पट जोमाने नाथांच्या स्वागताची तयारी केली.

दुसऱ्या दिवशी नाथ गणूच्या घरी जेवले. भगवान् श्रीकृष्णाने विदुराघरी ज्या प्रेमाने भोजन केले तोच प्रेमभाव सारजाला, गणूला नाथांच्या नयनी सामावलेला दिसला. आणि त्यांच्याही नयनांनी कृतार्थतेचा आनंद नाथांना दाखविला. भिंतीला असलेल्या कानांनी हा प्रकार ऐकला. भिंतीला असलेल्या छिद्रांनी हा प्रकार काही रिकामटेकड्या डोळ्यांना दाखविला. सूर्याकडे पाहताना सामान्य दृष्टी दिपून जाते. मानवतेचे हे अभूतपूर्व दर्शन झाल्यावर रूढिग्रस्त डोळे असेच दिपले. आणि डोळे दिपल्यावर अंधाराखेरीज, अविचाराच्या काळोखाखेरीज दुसरे काय दृष्टीस पडणार ?

आणि ह्या काळोखाने नाथांना ग्रासले, ब्रह्मवृंदाने नाथांना बहिष्कृत केले. गीर्वाण भाषेतील तत्त्वज्ञान नाथ मराठीत आणतात म्हणून ब्राह्मण पण्डित नाथांवर रुष्ट होतेच. आणि आता नाथ ब्राह्मण महार असा भेद मानत नाहीत, महाराघरी जेवायला जातात, ह्या गोष्टी तर सर्वच रूढिग्रस्तांना चेतविण्यास समर्थ ठरल्या. पण्डितांचा हा निर्णय हरिपण्डितालाही बरोबरच वाटला. वडिलांच्या वागण्याचा त्याला मनस्वी राग आला. तो वडिलांना सोडून तीर्थयात्रेला गेला. ब्राह्मण पण्डितांनी आपणांस वाळीत टाकले, हरिपण्डितही सोडून गेला. उद्विग्न मनःस्थितीत नाथ घरी आले. देवघरात गेले. देवासमोर बसले. डोळ्यातून घळघळा अश्रू येऊ लागले. देवाला उद्देशून मन आक्रंदून ओरडू लागले. पण शब्द तोंडातून बाहेर पडत नव्हते. तरी

शब्द मात्र कोठून तरी कानांवर आले. नाथांनी दृष्टी थोडी मागे वळविली. गिरिजाबाई नामदेवांचा अभंग म्हणत होत्या–

“आता माझी चिंता तुज नारायणा
रुक्मिणीरमणा वासुदेवा।
द्रौपदी संकटी वस्त्रे पुरविली
धाव त्वा घेतली गजेन्द्रासी।
उपमन्यूची त्वा आळी पुरविली
अढळपदी दिधली वसती ध्रुवा॥
नामा म्हणे करा करुणा केशवा
तू माझा विसावा पांडुरंग॥”

गिरिजाबाईंच्या गोड गळ्यातून झरणाऱ्या त्या अभंगवाणीशी नाथ समरस झाले. आणि अगदी सहज त्यांच्या अंतःकरणाची आर्तता शब्दरूपाने बाहेर पडली,

“एक तत्त्व नाम दृढ धरी मना। ते नाम सोपे रे।
रामकृष्ण गोविंद। आवडीने भावे हरिनाम घेई।
तुझी चिंता त्यासि सर्व आहे, सर्व आहेऽ॥”

“मग आपण कशाला एवढं चिंताग्रस्त व्हायचं ?’ गिरिजाबाई म्हणाल्या.

“खरंच आहे तुमचं म्हणणं ! पण क्षणिक आघाताने मन कधी कधी गोंधळतं ... आणि विनाकारण दुःखग्रस्त, भयग्रस्त, होतं. सुख-दुःखांचे रहाटगाडगे सदा फिरतच असते. चिंतेचे नाजूक सूत्र थोडेच त्याला अडवू शकणार ? ...” नाथ म्हणाले. तेव्हा प्रसन्न स्मित करून गिरिजाबाई म्हणाल्या,

“खरं ना ... मग चलावं, हातपाय धुवावे. पाटपाणी करते... मग गुरुजींच्याकडे जायचंय. उद्या मामंजींचं श्राद्ध आहे.”

"हो! विसरलोच होतो. मोहाने मन गढूळले की नित्यनैमित्तिक कर्मांचादेखील विसर पडतो. चला–" असे म्हणत नाथ परसदारी गेले. पाठोपाठ पाण्याचा तांब्या आणि पंचा घेऊन गिरिजाबाई देखील गेल्या.

दुसऱ्या दिवशी घाईगडबड यांनी नाथवाडा अगदी हसत फुलत होता. श्रीखंड्या कावडी मागून कावडी आणून चौकातला हौद भरत होता. इतर मोलकरणी, गडी माणसे आपआपली कामे अगदी समरसतेने करीत होती. स्वैपाकघरात षड्रस पाकसिद्धी चालली होती. ओसरीवर सर्व धार्मिक कार्यक्रमाची सिद्धता झालेली होती. पितळी चौफुल्यांच्या शिसवीच्या पाटांपुढे सव्वाहाती केळीची हिरवी गार पाने झळकत होती आणि गुलालाने खुलणाऱ्या नक्षीदार रांगोळ्या त्यांची शोभा खुलवीत होत्या. नाथ थोडे उदास दिसत होते. एका खिडकीपाशी ते उभे होते. आणलेली गोदावरीची घागर हौदामध्ये रिकामी करून श्रीखंड्या परत दुसरी घागर आणायला निघाला होता. नाथांनी त्याला थांबविले. नाथ त्याला म्हणाले, "श्रीखंड्या, आज पण्डित नाही."

"तो आता पण्डित झाला ना! मग अजून वडिलांचं बोट धरून कसा चालणार तो?" श्रीखंड्या घागर खाली ठेवून म्हणाला, "नाथ, पंख फुटेपर्यंत पाखरू घरट्यात राहते. एकदा त्याला त्याच्या पंखांच्या सामर्थ्याची कल्पना आली, की ते अनंत आकाशाकडे झेप घेते. घरट्याची आठवणसुद्धा बुझते."

"खरं आहे! आचार्यांनी म्हटलं आहे, 'का ते कान्ता कस्ते पुत्रः।' खरं आहे अगदी ते...श्रीखंड्या ती घागर ठेव इथंच आणि गुरुजींच्याकडे जा...भूदेव ब्राह्मण अद्याप का आले नाहीत ते पाहून ये." ह्या नाथांच्या शब्दांप्रमाणे घागर तिथेच बाजूला भिंतीशी

ठेवून आणि डोक्यावरची कानटोपी थोडीशी नीट सावरून श्रीखंड्या लगबगीने वाड्याबाहेर पडला.

खिडकीशी उभे राहिले होते नाथ. मनात काही विचारांची वर्दळ चालली होती. बाहेर रस्त्यावरदेखील आता हळूहळू वर्दळ वाढली होती. उन्हे वाढू लागली होती. त्यांचा ताप असह्य होऊ लागला होता. सावल्या पार घरांच्या आश्रयाला पळाल्या होत्या. रागीट सनातनी माणसे रस्त्याने जाऊ लागली म्हणजे हरिजनांनी जशी रस्त्याची कड धरावी त्याप्रमाणे. आत्तादेखील काही हरिजन कामगार आपले शहरसफाईचे सकाळचे काम संपवून असेच रस्त्याच्याकडेला, नाथांच्या वाड्यापाशी विसाव्याला बसले होते. बसल्या बसल्या त्यांचा सहज सुखसंवाद चालला होता.

"आज नाथांच्या घरी काही गडबड दिसते."

"पितरं आहेत जणू."

"बरोबर आहे. महारवाड्याला आवतण द्यायला श्रीखंड्या आला होता."

"तरी तिसरा प्रहर व्हायचा."

"तर! बामण जेवून गेल्याबिगार महारांना कोण बोलवणार?"

"पण बामण येणार न्हाईत असं ऐकलं–"

नाथांच्या कानावर हा संवाद जात होता. ते तिथेच खिडकी-जवळ उभे होते. मनातल्या विचारांची वर्दळ अधिक स्पष्ट झाली. "ब्राह्मण येणार नाहीत आणि ब्राह्मण जेवल्याखेरीज हरिजनांना जेवण नाही. कधी न सुटणारे कोडे ठरले हे. ज्यांना काही कमी नाही ते तृप्त आहेत. आणि म्हणून जे येणार नाहीत अशांची आर्जवे करावयाची. आणि जे अन्नब्रह्माची आर्जवे करताहेत त्यांना तसेच ताटकळत ठेवावयाचे. हा धर्म झाला का ? भुकेलेल्यांची आर्तता

ध्यानी न घेता अभिमानी रुढिग्रस्तांची मनधरणी करावयाची, ही कुठली रीत ? ह्याला जर हिंदुधर्म मानावयाचे तर हिंदुधर्म मानवता मानीत नाही असे मानावयाचे का ?...छे ! छे ! असे मुळीच नाही. असं असतं तर मंगळवेढ्याच्या दामाजीने धान्याचे कोठार दुष्काळ-ग्रस्तांकडून लुटविले नसते...ब्राह्मणांची वाट पाहण्यापेक्षा–"

इतक्यात श्रीखंड्या आत आला आणि म्हणाला, " नाथ, ब्राह्मण येत नाहीत. "

" मर्जी त्यांची...श्रीखंड्या, वाड्याबाहेर हरिजन आले आहेत. त्यांना आत बोलाव. " नाथांनी श्रीखंड्याला सांगितले. श्रीखंड्या बाहेर गेला आणि हरिजनांना घेऊन आला.

नाथ भागवतपंथाचे असले तरी वेदविद्या जाणणारे होते. सर्व श्राद्धविधी समंत्र उरकून त्यांनी उदक सोडले. हरिजन भोजनास बसले. गिरिजाबाई स्वतः वाढप करण्यास आल्या. हरिजन तृप्त झाले. भानुदास, चक्रपाणी, सूर्याजीपंत हे नाथांचे पितरदेखील का तृप्त झाले नसतील ? अतिशय नम्रतेने वाकून, प्रत्येकाला नमस्कार करून, नाथांनी त्यांना सावकाश भोजन करण्याची प्रार्थना केली.

ह्या प्रकाराने तर पैठणचा ब्रह्मवृंद जास्तच खवळला. नाथ आपणांसाठी थांबले नाहीत. श्राद्धाचे पवित्र अन्न खुशाल त्यांनी हरिजनांना वाढले. त्यांनी चालविलेला हा भ्रष्टाचार त्या प्रतिष्ठान-पण्डितांना अगदी असह्य झाला. नाथ जातगोत मानीत नाहीत, गीर्वाण भाषेतील विचार-भाण्डार खुशाल मराठीच्या वाटेने दीन-दुबळ्यांपर्यंत ते पोचवीत होते. ही नाथांची बंडखोरी खपवून घेण्यास ते आता तयार नव्हते. लोकांना सन्मार्ग दाखविण्याचे कार्य नाथांना करावयाचे असल्यामुळे त्यांनी लोकभाषेत लोकवाङ्मय रचिले. नाथांनी भागवतधर्म लोकांना सांगण्यासाठी मराठीमध्ये

'भागवत' ग्रंथ लिहिण्यास सुरुवात केली. गीर्वाण भाषेतील म्हणजेच संस्कृत भाषेतील भागवतासारखा ग्रंथ मराठी भाषेत आणण्याचे नाथांचे हे कृत्य सनातनी पण्डितांना अजिबात मानवले नाही. त्यांना संस्कृतवर होणारे हे आक्रमण आहे असे वाटले. त्यांनी टीकेची झोड उठविली–टीका केली, बहिष्कार टाकला तरी नाथ आपल्या स्वीकृत मार्गापासून बाजूला होत नाहीत असा त्यांना अनुभव आला होता. आपल्या विरोधाला नाथ दाद देत नाहीत असे पाहून पैठणच्या पण्डितांनी काशीच्या पण्डितांकडे धाव घेतली. नाथांचे हे पाखण्ड त्यांनी काशीच्या पण्डितांच्या कानांवर घातले. पण्डितांच्या मताने पाखण्ड ठरणारे आपले कृत्य कसे पाखण्ड नाही, हाच कसा परम भागवतमार्ग आहे, हे दाखविण्यासाठी, तेथील पण्डितांना पटविण्यासाठी नाथ स्वतः काशीला गेले. विरोधकांचा हल्ला जिथे अधिक प्रभावी होण्याची शक्यता होती तिथे नाथ गेले.

नाथ काशी नगरीत साडेतीन वर्षे राहिले. ज्या पुण्यनगरीमध्ये संस्कृत भाषेचे अतिरथी महारथी वास्तव्य करीत होते, त्या संस्कृत भाषेच्या विद्यापीठ नगरीमध्ये–काशीमध्ये राहून नाथ मराठी भाषेच्या श्रेष्ठ ग्रंथांपैकी एक महान ग्रंथ भागवत–तो लिहीत होते. नाथ काशीला गेले तेव्हा फक्त पाच अध्याय लिहून झाले होते. उरलेला सर्व ग्रंथ काशीच्या विद्वान पण्डितांच्या ज्ञानप्रखर टीकेला तोंड देत नाथांनी काशीक्षेत्री पूर्ण केला. भागवताचे लेखन पूर्ण होणार नाही ही प्रतिष्ठान पण्डितांची समजूत चुकीची ठरली.

काशीक्षेत्रीदेखील नाथांना सनातनी पण्डितांचा त्रास झाला नाही असे नाही. पण नाथांनी आपल्या शांतवृत्तीने आणि पराकोटीच्या सहनशीलतेने सर्वप्रकारची टीका, सर्व प्रकारचा त्रास सहन केला. तपश्चर्याच म्हणावयाची ती ! त्या तपश्चर्येचा भंग करण्याचे

नानाविध प्रयत्न झाले. ते प्रयत्न असफल झाले. तपश्चर्या असफल झाली नाही. ग्रंथलेखन पूर्ण झाले. भागवताच्या एकादश स्कंधावरील ओवीबद्ध टीका, एकनाथी भागवत, हा १८८०० ओव्यांचा महान ग्रंथ सर्व विरोधांना तोंड देऊन नाथांनी पूर्ण केला. पण केवळ ग्रंथ लिहून भागवत धर्माच्या प्रसाराचे कार्य पूर्ण होणार नव्हते. लोकांच्या वाचनात तो ग्रंथ यावयास पाहिजे होता. परंतु जिथे ग्रंथाच्या लेखनालाच विरोध झाला तिथे ग्रंथाचे वाचन कोण करणार ?

तरी नाथांनी मनकर्णिकेच्या घाटावर ब्रह्मवृंदांसमोर आपल्या ग्रंथाचे वाचन करावयाचे ठरविले. पण्डितांची मान्यता मिळेना. स्वत: नाथ ग्रंथ घेऊन काशीच्या विद्वान पण्डितांच्या घरोघर हिंडले. कोणी ऐकून घ्यायला तयार नसतानाही अतिशय विनयशीलतेने, कोणत्याही प्रकारचा अपमान न मानता, आळस न करता प्रत्येकाला ग्रंथ दाखविला, ग्रंथाचा उद्देश सांगितला, मूळ संस्कृत श्लोक दाखवून त्यांचे आपल्या ग्रंथातील शास्त्रशुद्ध विवेचन त्यांच्या लक्षात आणून दिले. एवढी सारी यातायात नाथांनी केली. नाथांचे संस्कृत श्लोकांचे यथार्थ विवेचन लक्षात आल्यावर नाथांची अतुलनीय विद्वत्ता काशीच्या विद्वान पण्डितांच्या लक्षात आली आणि त्यांनी ग्रंथ-वाचनाला अनुज्ञा दिली.

इतिहासाने पाहिलेला तो अभूतपूर्व प्रसंग होता. संस्कृत भाषेचे जे विद्यापीठ अशा काशीक्षेत्रामध्ये मराठी काव्य-ग्रंथाचे वाचन होत होते. तेही विद्वान पण्डितांच्यासमोर, मनकर्णिकेच्या प्रशांत, प्रसन्न आणि पवित्र घाटावर विस्तृत मंडप उभारला होता. सभा-मंडप लता–पल्लवांनी शृंगारला होता, नाथ गंगास्नान करून, शुचिर्भूत होऊन मृगाजिनावर बसले होते. अंगावर शालजोडी घेतली होती त्यांनी. समोर चौरंगावर स्वलिखित ग्रंथ त्यांनी ठेवलेला होता.

समोरील बाजूस काशीक्षेत्रातील प्रमुख पण्डित उच्च आसनावर विराजमान झाले होते. आणि इतरत्र काशी-नगरवासी पौरजन वसले होते. सर्व व्यवस्था पूर्ण झाली.

श्रींची अनुज्ञा घेऊन नाथांनी,

"ॐ नमो भगवते वासुदेवाय।" हा मंत्र म्हणून ग्रंथ-वाचनास आरंभ केला. मूळ ग्रंथच कथारूप असल्याने नाथांच्या निरूपणाला विशेष बहर आला. संस्कृतमधील एक एक प्रमेय नाथांच्या सुगम भाषाशैलीने उत्कृष्ट रीतीने उलगडून दाखविले जात असताना पण्डितांच्या मुखातून धन्योद्गार सततच बाहेर पडत होते. रसाळ कथन श्रवण करून माना एकसारख्या डोलवल्या जात होत्या आणि खांद्यांवरून खाली घसरणाऱ्या शालजोडचा सावरण्याखेरीज दुसरे काही काम करायला हाताला सवडच सापडत नव्हती. पण्डितांची ही स्थिती तर सामान्य आबालवृद्ध श्रोत्यांची काय! नाथांच्या मधुर रसवंतीच्या ओघात ते पूर्णपणे वाहून गेले होते.

"भक्ति म्हणजे सर्वाभूति। सप्रेम भजन युक्ति।
प्राप्ति म्हणजे अपरोक्ष स्थिति। भगवत्स्फूर्ति अनिवार॥"

असे भक्तीचे रहस्य नाथांनी सांगताच 'धन्य, धन्य' असे म्हणतच प्रमुख पण्डित आपल्या आसनावरून उठून नाथांच्याकडे आले. त्यांच्या डोळ्यांतले प्रेमाश्रू पाहिल्यावर नाथदेखील गहिवरले...ते ताबडतोब उठले आणि विनम्र भावाने पण्डितांच्या चरणावर आपले मस्तक ठेवू लागले. पण पण्डितांनी त्यांना हातांनी धरून उठविले आणि अत्यानंदाने त्यांनी नाथांना दृढालिंगन दिले आणि म्हटले, "नाथ, सहस्रशः धन्यवाद तुम्हांला. तुमच्या मुखातून मराठीच्या अमृताच्या बोलांनी सांगितले गेलेले भागवत-धर्माचे रहस्य ऐकून आज आम्ही पावन झालो, कृतकृत्य झालो."

प्रतिष्ठानाची प्रतिष्ठा काशीक्षेत्राने मान्य केली. मराठीचा झेंडा संस्कृत भाषेच्या मंदिरावर झळकला. 'गीर्वाण भाषा जरी देवे केली असली तरी मराठी काही चोरे आणली नाही.' हे गीर्वाण भाषा-पण्डितांनी मान्य केले. गौरवाच्या ओझ्याने नाथांची विनम्र मान अधिकच वाकली. नाथांच्या भागवत ग्रंथाची काशीमध्ये पालखी-मधून मिरवणूक काढण्याची आज्ञा पण्डितांनी देताच सारी काशीपुरी आनंदे नटली. सारे पण्डितसुद्धा अभिमान विसरून हर्षोत्फुल्ल झाले. अगदी हरिपण्डितसुद्धा. हरिपण्डित नाथांचे भागवत श्रवण करण्यासाठी आला होता. तीर्थयात्रा करीत करीत तो काशी क्षेत्री आला होता. तेव्हाच हा अपूर्व सोहळा पाहण्याचे भाग्य त्याला लाभले. नाथांची अमृतवाणी श्रवण करून त्याच्या डोळ्यातून गंगा-यमुना वाहू लागल्या. त्या पवित्र अश्रुजलाने त्याने नाथांचे चरण धुतले. त्याला हृदयाशी धरून नाथ म्हणाले,

"आज पण्डितांनी मला आपले म्हटले आणि माझा हरिपण्डित मला मिळाला. काशी विश्वेश्वराची कृपा." मिरवणूक मोठी थाटाची निघाली. प्रत्येकाने त्या महान ग्रंथाचे दर्शन घेतले आणि नाथांच्या चरणांना वंदन करण्याचा प्रयत्न केला, पण नाथ म्हणजे मूर्तिमंत विनयशीलता. त्यांनी कोणाला चरणस्पर्श करू दिला नाही.

ही नाथ-गौरवाची वार्ता पैठणला आली. आणि त्या वार्तेपाठोपाठ नाथही पैठणला आले. नाथभक्तांना केवढा आनंद झाला! नाथांनी लोकांना त्यांच्या भाषेत, त्यांच्या पद्धतीने परमार्थ शिकविला. भागवताखेरीज रुक्मिणी-स्वयंवर, भावार्थ रामायण, हस्तामलक, शुकाष्टक, स्वात्मसुख अशी इतर पुष्कळ ग्रंथरचना त्यांनी केली. भारूड, जोशी, जागल्या हे त्यांचे काव्यप्रकार विशेष महत्त्वाचे आहेत. लोकांच्या चालीरीतींशी समरस होऊन अध्यात्माची

शिकवण त्यांनी अत्यंत सुलभतेने लोकांना दिली. त्यांच्या ग्रंथांची एकूण ओवीसंख्या सुमारे ६०००० इतकी प्रचंड आहे. तरी विनयाने नाथ म्हणतात,

"श्रोती न मानावा खेद ।।
म्यां आपुल्या मनासि केला बोध ।।"

एकदा नाथांचा घसा दुखूं लागला. नाथ अगदी बेचैन झाले होते. रात्री काही स्वस्थ झोप येईना. थोडा डोळा लागल्याप्रमाणे वाटले. एक स्वप्न पडले. श्री ज्ञानेश्वरांनी नाथांना स्वप्नात दर्शन दिले. श्री ज्ञानेश्वर म्हणाले,

"अजान वृक्षाची मुळी कंठास लागली । येऊनि आळंदी काढ वेगी ।।"

नाथ तावडतोब आळंदीला गेले. समाधी-स्थलाची बरीच पडझड झाली होती. नाथांनी समाधीचा जीर्णोद्धार केला. ज्ञानेश्वर-दर्शनाने संतुष्ट झालेले नाथ म्हणतात,

"एका जनार्दनी पूर्व पुण्य फळले ।
श्री गुरु भेटले ज्ञानेश्वर ।। "

ज्ञानेश्वरीविषयक नाथांची कामगिरी फार महत्त्वाची आहे. ज्ञानेश्वरी हा त्यांचा आवडता ग्रंथ होता. प्रत्यक्ष ज्ञानेश्वरी ग्रंथात बरेच चुकीचे पाठ घुसले होते. नाथांनी जुन्या प्रती शोधून काढल्या व भाषा-शास्त्राच्या साह्याने ज्ञानेश्वरीची प्रत शुद्ध करून भाविकांच्या हातात दिली. 'अजान वृक्षाचे निमित्त करून ज्ञानेश्वरांनी आपणांस दर्शन दिले.' असे नाथांनी वर्णन केले आहे. एकनाथ हे एकनिष्ठ ज्ञानेश्वर-भक्त होते. ज्ञानेश्वरी प्रथम गुरुमुखाने त्यांनी ऐकली होती. तेव्हापासूनच त्यांची ज्ञानेश्वरीवर असीम निष्ठा बसली होती. ते ज्ञानेश्वरीवर नित्य प्रवचन करीत असत. तेव्हा त्यांना ज्ञानेश्वरीतील ते अपपाठ वारंवार डाचत असत. आणि म्हणूनच ज्ञानेश्वरीची शुद्ध

प्रत तयार करण्याचे महान कार्य त्यांनी पार पाडल्यावर त्यांना मोठी धन्यता वाटली. ह्या कार्याबद्दल आणि ज्ञानेश्वरीविषयीचा निर्मल भक्तिभाव व्यक्त करण्यासाठी नाथ म्हणतात,

"श्री शके पंधराशे बारोत्तरी । तारणनाम संवत्सरी ।
एका जनार्दन अत्यादरी । गीता ज्ञानेश्वरी प्रति शुद्धकेली ।।
ज्ञानेश्वरीपाठी । जो ओवी करील मऱ्हाठी ।
तेणे अमृताचे ताटी । जाण नरोटी ठेविली ।।"

नाथांची गुरुभक्ती अतिशय श्रेष्ठ दर्जाची होती. आपल्या पदामध्ये, अभंगामध्ये 'एका जनार्दनी' हे शब्द योजून नाथांनी आपले गुरू जनार्दनस्वामी यांच्याविषयीचा आदरभाव व्यक्त केला.

नाथांनी आपले सर्व उर्वरित आयुष्य कथा कीर्तन आणि प्रवचन करण्यात घालविले. कीर्तनासाठी त्यांनी ध्रुव, प्रल्हाद, उपमन्यू, सुदामा, ज्ञानदेव, नामदेव अशी रसाळ आख्याने अभंगामध्ये रचिली. त्यांच्या कीर्तनात कमालीचा रंग भरत असे. कथेच्या पूर्वरंगामध्ये ते अतिशय सोप्या शब्दात अध्यात्म सांगत असत. त्यासाठी ते भारूड, जागल्या, जोशी इत्यादी वाङ्मय प्रकारांचा चपखल उपयोग करीत असत. 'दार उघड बया, दार उघड !' असे भवानीचे भारूड ते कधी म्हणत असत. कधी त्यांचा 'जागल्या,

"उठा की जी मायबाप, कशी लागली झोप ।
हुजूर जाऊनिया येवढी चुकवा खेप ।।"

असा इशारा देत असे, षड्विकारांपासून आत्मा मुक्त व्हावा हे रूपकद्वारा अप्रतिम वर्णन करून शेवटी ते म्हणत,

"एका जनार्दनी सर्वच जाऊ दे । एकटी राहू दे मला ।।"
त्यांचा 'जोशी' तर फार उत्कृष्ट आहे.

त्यांची प्रकृती दिवसेंदिवस क्षीण होत चालली होती, तरी लोकगंगेला इष्ट वळण लावण्यासाठी अवलंबिलेल्या कीर्तनमार्गात खण्ड पडला नव्हता. फाल्गुन महिन्याचा दुसरा पंधरवडा होता. जीव अस्वस्थ करणारा रखरखीत उन्हाळा सुरू झाला होता. तरी नित्यनेमाचे कीर्तन उभे राहिले होते. पूर्वरंग अध्यात्माच्या रंगाने रंगला होता. नाथ ' जोशी ' म्हणत होते.


" आम्ही अलक्षपुरचे जोशी । शकुन सांगू निश्चयेसी ।।
तेणे चुकती चौऱ्यांशी । मी निर्गुणपुरचा जोशी ।।
होरा ऐका दादांनो । होरा ऐका दादांनो ।। ध्रृ ।।
एका जनार्दनी जोशी । सांगेल शकुन सर्वत्रासी ।
रामनाम वाचेसी । तेणे तरती विश्वासी दादांनो ।। "

आणि नाथ एकदम खालीच बसले. सर्व शरीर घामाने डंवरले आणि एकदम थंडगार पडले. भागवतधर्माचा प्रकाश महाराष्ट्राला दाखविणारी ती जीवनज्योत मालवली.






काशीच्या पंडितांपुढे एकनाथ भागवताचे वाचन करीत आहेत.



"औद्योगिक स्वातंत्र्याखेरीज खरे स्वातंत्र्य नाही." – न्यायमूर्ती रानडे

# न्यायमूर्ती रानडे



" ॐ भवति भिक्षां देहि।"

पुढच्या ओसरीवरून रोजची ठरलेली, माधुकरी मागणाऱ्या मुलाची आरोळी आली आणि आतून एक गोरटेला, भव्य कपाळाचा मुलगा माधुकरीची ताटली घेऊन बाहेर आला. शरीर थोडेसे थोराड, चेहरा भव्य, नाक आणि डोळे मात्र त्या भव्यतेच्या मानाने थोडेसे बिटके आणि बारीक. त्याला पाहताच माधुकरी मागायला आलेला मुलगा हसला आणि त्याने आपली झोळी उघडली. त्याच्या झोळीमध्ये अलगद माधुकरी टाकून तो मुलगा पाहात थोडा वेळ उभा राहिला. लंगोटी आणि गळ्यातले जानवे ह्यांखेरीज त्या माधुकरी मागणाऱ्या मुलाच्या अंगात काहीच नव्हते.

माधुकरी मागणारा तो मुलगा निघून गेला आणि अंगातल्या सदऱ्याची वरची गुंडी घाईने लावून व सदऱ्याची बाही बळेच पुढे ओढून रिकामी ताटली घेऊन तो मुलगा आत जाऊ लागला. इतक्यात बाहेरच्या दाराकडनं बायकी आवाज आला,

"अरे माधव, बघू तरी गळ्यातला गोफ आणि हातातली कडी !"

"दिसली का तुम्हांला ?" सदऱ्याची बाही जास्तच पुढे ओढून माधव म्हणाला.

"अरे, मग ती अशी लपवतोस का ?" त्या बाहेरून आलेल्या काकू म्हणाल्या.

"तुम्हांला दिसू नयेत म्हणून !" माधव रागाने म्हणाला. "का रे बाबा ?" काकूंनी विचारले.

इतक्यात माधवची आई आतून बाहेर आली आणि काकूंना म्हणाली, "अहो काकू, आमचा माधव अगदी मुलखावेगळा आहे. त्याला दागिने घालणेच अजिबात आवडत नाही. आज त्याचा वाढदिवस, म्हणून बळेच दागिने घालायला लावले तर त्याची ही तऱ्हा." "पण रोजच वाढदिवस असायचा, म्हणून दागिने कशाला घालायला हवेत ?" माधव अजून रागातच होता, "जगात काय कुणाचे वाढदिवस नसतात ? तो माधुकरी मागणारा मुलगा रोज माधुकरी मागायला येतो. त्याच्या अंगावर तर मी कधीही कसलाही दागिना पाहिला नाही. मग काय त्याचा वाढदिवसच नसतो कधी ? त्याला दागिने नसलेले चालतात, मग मलाच कशाला ?"

"नको बाबा घालूस ! जा घरात पाटपाणी केलं आहे." असे आई म्हणाली तेव्हा आत जाता जाता माधव म्हणाला, "अगोदर हे दागिन्यांचं ओझं काढून ठेवतो आणि मग जेवायला

बसतो. मग मला शाळेत जायचं आहे. दागिने घालून शाळेत जाण्याचा वेडेपणा मी मुळीच करणार नाही."

माधव आत गेला. त्याच्याकडे कौतुकाने पाहात आणि तो गेल्यावर काकूंच्याकडे वळून माधवची आई म्हणाली, "आता काय करायचं ह्या वेडेपणाला ! लोकांच्या मुलांना दागिने मिळत नाहीत. आणि ह्याला आहेत तर हौस नाही."

"तुमचा माधव आणि आमचा विनायक अगदी जोडी आहे." कीर्तन्यांच्या काकू म्हणाल्या, "त्यांना नटायला नको की सजायला नको."

"अहो कसलीच हौस नाही. दागिने-कपडयांची नाही की खाण्यापिण्याची नाही. परवा काही खाऊ त्याला दिला आणि थोडा आमच्या मोलकरणीच्या मुलाला द्यायला सांगितला. त्याने स्वतः थोडा घेतला आणि त्या मुलाला जास्त दिला. आणि विचारलं तर म्हणतो कसा, 'मला खाऊ मिळाला असेल थोडा पण त्या मुलाला खूष करण्याचा सगळा आनंद मलाच मिळाला.' असा आहे, अगदी साधा भोळा. कसली अट म्हणून नाही त्याची. हो, तेवढं भाकरीवर तापवलेलं पातळ तूप नाही मिळालं तर भाकरीचा तुकडा नाही मोडायची स्वारी...परवाचीच गोष्ट. आमचे माधवराव बसले पाटावर. ताटात भाकरी वाढली. आणि मग लक्षात आलं की आज तूप नाही घरात."

"मग काय केलत माधवच्या आई ?" काकूंनी विचारले.

"सत्त्वपरीक्षाच ती !... मग काय केलं, घरात गेले. नेहमीची तुपाची तामली घेतली. त्यात थोडं पाणी घातलं. ते कडकडून तापवलं आणि दोन चमचे भाकरीवर घातलं आणि मग आमच्या माधवाचं जेवण अगदी आनंदानं झालं. असा आमचा माधव."

"अगदी भोळा सांब!" तेवढ्यात तिथे आलेली माधवाची वहीण, ताई म्हणाली, "अहो काकू, परवा तर आमचा माधव एकटाच सारीपाट खेळत होता. प्रतिस्पर्धी कोण निवडला? तर तो माजघरातला खांब. एक हात आपला आणि एक हात खांबाचा. आणि गंमत अशी कीं खांबानं तोड केली माधवावर. पहिला खांबाचा हात निवडला तो उजवाच निवडला. पुन्हा बदल कसा तो केला नाही त्यानं आणि वर म्हणतो कसा, त्यात काय, खांबाच्या हाताला दान पडलं. खांबाची तोड झाली." अगदी 'रामशास्त्री'च जसा!

इतक्यात आतून माधवाची आरोळी आली,

"अहो आई ताई, मला तूप वाढा की...मला शाळेत जायचंय."

"माधवच्या आई जा बाई, मी जाते. विनायकलाही शाळेत जायचंय. सकाळी म्हणत होता, आज पास-नापास कळणार आहे म्हणून." असे म्हणून कीर्तन्यांच्या काकू निघून गेल्या. आणि माधवची आई व ताई स्वैपाकघराकडे वळल्या.

माधवदेखील जेवण झाल्यावर शाळेत गेला. त्यानंतर ताईही शाळेत गेली. स्वतःचे जेवण करून आणि सर्व स्वैपाकघरातलं काम आवरून माजघरामध्ये एक कांबळे टाकून माधवच्या आई थोड्याशा आडव्या झाल्या. एकटीवरच सर्व काम पडे आणि त्यामुळे शिणलेले शरीर दुपारच्या त्या शांततेत, शांत अशा माजघरात केव्हाच निद्रासखीच्या कुशीमध्ये विसावे. तरी झोप इतकी सावध असे, की स्वैपाकघरात जर काही थोडसं खडखडलं तर मांजराची लबाड हालचाल लगेच लक्षात येऊन निद्रासखीचा हात सुटायचा आणि पाय आपोआप स्वैपाकघराकडे वळायचे. आतादेखील असाच थोडा आवाज झाला. पण तो पुढच्या घरात झाला असावा, हे लक्षात येऊन फक्त कूस बदलून त्या पुन्हा झोपी गेल्या. तासभराची

विश्रांती त्यांना पुरत असे आणि ती पूर्ण झाली की शरीर उत्साही होऊन पुन्हा पुढच्या कामाला आपोआप तयार होत असे. तशी ती पुरेशी विश्रान्ती झाली आणि माधवाच्या आई उठून कांबळे घडी करून ठेवू लागल्या. इतक्यात बाहेरच्या घरातून कसला तरी आवाज आला, कोणी तरी बोलत असल्याचा. तो आवाज माजघरात आला आणि त्याबरोबर कीर्तन्यांचा विनायक आणि इतर दोनचार मुले आत आली. विनायक म्हणाला,

"अहो माधवाच्या आई, आम्हांला पेढे पाहिजेत."

माधवच्या आई आश्चर्याने आणि कौतुकाने विनायकाकडे पाहात म्हणाल्या "कसले रे बाबा ?"

"अहो, तुमच्या माधवचा पहिला नंबर आला सगळ्या मुलांत." दुसरा एक मुलगा म्हणाला.

"अहो, हेडमास्तर वर्गात आले. आम्ही सर्व पास झाल्याचे त्यांनी सांगितले आणि मग ते अभिमानाने आवाज गंभीर करून म्हणाले, "सर्व मुलांमध्ये पहिला नंबर, महादेव गोविंद रानडे." तितकाच गंभीर आवाज करून आणि तोंड फुगवून विनायक म्हणाला.

त्याच्याकडे हसत पाहात माधवच्या आईने विचारले, "अरे, पण तो अजून आलाय कुठे ?"

"म्हणजे ? अहो, शाळा तर मघाशीच सुटली !" विनायक म्हणाला.

"असं ?" माधवच्या आई म्हणाल्या. थोड्या विचाराने त्यांच्या लक्षात आलं की, थोड्या वेळापूर्वी पुढच्या घरात काही खडखडल्या-सारखं आपल्याला वाटलं तेव्हाच माधवची स्वारी आली असावी बहुतेक. त्यांनी ताईला हाक मारली,

"ताईऽ, माधव आला का ग ?"

"हो ! तो काय माडीवर कायसंसं वाचीत बसलाय." माडीवरून खाली आलेली ताई म्हणाली, "बोलावू का त्याला खाली ?" आणि मग आईने 'हो' म्हटल्यावर ताईने माधवला बोलावून-आणले. वाचन-समाधीचा भंग करून ताईने आपणांस खाली आणले, म्हणून स्वारी जराशी नाराजच दिसत होती. हातात पुस्तक मिटलेले आणि ओठही जरासे मिटलेलेच, असे माधवराव आईपुढे येऊन उभे राहिले आणि म्हणाले, " काय ? कशाला बोलावलं ? "

" अरे, आज वार्षिक परीक्षेचा निकाल लागला ना ? " आईने विचारले.

" हो ! " माधव म्हणाला.

" पास झालास ना ? " आईने पुन्हा विचारले.

" हो ! " एखाद्या कोर्टातल्या जबानीला उभा राहिल्याप्रमाणे माधव म्हणाला.

" नंबर कितवा आला ? " मोठ्या कौतुकाने आईने विचारले.

" पहिला ! " कसलाही अभिमानाचा, आनंदाचा भाव चेहऱ्यावर न दाखविता, पुन्हा माडीवर वाचायला जाण्याच्या घाईत माधव म्हणाला.

" अरे, मग तू एवढी आनंदाची बातमी मला सांगितलीदेखील नाहीस ! " आई म्हणाली.

"त्यात काय सांगायचंय ? आम्ही वर्षभर शाळेत जातो, अभ्यास करतो, तो पास होण्यासाठीच. मग त्यात एवढं पराक्रमाचा डांगोरा पिटण्यासारखं काय आहे ? पास झालो नाही तरच नवल." माधव शांतपणे म्हणाला आणि पुन्हा वर जाण्यासाठी निघाला, तेव्हा माधवच्या आई पुन्हा म्हणाल्या,

" अरे, हे तुझे मित्र पेढे मागताहेत."

"पेढे ? वेडेच आहेत." असे म्हणून माधव माडीवर गेलासुद्धा.

आणि मग ते बिचारे वेडे मित्र खाली माना घालून घरोघर निघून गेले.

पुढील शिक्षणाची समाधानकारक सोय कोल्हापूरला नव्हती. तेव्हा मुलांना शिक्षणासाठी मुंबईला पाठविण्याचा विचार गोविंदराव रानडे आणि त्यांचे शेजार-बंधू जनार्दनपंत कीर्तने ह्यांनी ठरविला. माधव आणि कीर्तन्यांचा विनायक १८५६ च्या अखेरीस मुंबईला गेले. मुंबईच्या एल्फिन्स्टन हायस्कूलमध्ये ते जाऊ लागले. चंद्राच्या कलेप्रमाणे माधवाचे वाचनाचे वेड दिवसेंदिवस वाढतच होते. इतर विद्यार्थी खेळण्यात दंग झालेले असत. गप्पा मारण्यात ते रममाण होत-किंवा चौपाटीवर सागरी हवेत डुलत. माधव मात्र 'ग्रंथ हे थोर मित्र' असा महामंत्र हृदयस्थ करून सदान्कदा वाचन-समाधीचा आनंद उपभोगीत असे. अभ्यासाची पुस्तके तर कधीच आत्मसात केली जाऊन हातावेगळी होत. आणि मग त्या त्या विषयांचे इतर जाडे जाडे ग्रंथ जिवा-भावाचे मित्र बनत. पुस्तकाशिवाय माधव हे दृश्यच कोणाच्या परिचयाचे नव्हते. आणि म्हणून क्रीडासक्त माधव-मित्र ह्या ज्ञानासक्त माधवला 'पुस्तकातील किडा' म्हणत. माधवला त्याचे काहीच वाटत नसे. त्याच्या ह्या अवांतर वाचनामुळे त्याची कोणत्याही विषयाची तयारी आमूलाग्र परिपूर्ण असे. अध्यापक त्याच्या बहुश्रुततेने भारावून जात. एल्फिन्स्टन हायस्कूलचे पार्शी मुख्याध्यापक म्हणतसुद्धा,

"हा मुलगा असामान्य कोटीतला असून भविष्यकाळी मोठा कीर्तिमान पुरुष होणार."

१८५९ मध्ये मुंबई विद्यापीठाची प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्या-वर विश्वविद्यालयीन शिक्षणाला सुरुवात झाली. तिथेही हीच

पद्धत. हाच मार्ग. कोणाशी ओळखदेख नाही. सदैव वाचनात निमग्न. ग्रंथांना थोर मित्र मानल्यामुळे इतर मित्रांची ओळख करून घ्यायला त्यांना सवडच मिळत नसे. 'परीक्षेच्या अभ्यासाबाहेरचे गिबनच्या इतिहासासारखे मोठे मोठे ग्रंथ वाचण्यात दोन दोन वाजे-पर्यंत माधवराव गुंग होत असत.' अशी त्यांची आठवण प्राच्य-विद्या-संशोधक डॉ. भांडारकर ह्यांनी सांगितली आहे. १८६२ मध्ये बी. ए. झाल्यावर पुढच्या वर्षी माधवरावांनी-ऑनर्सची परीक्षा दिली. त्यांचा व्यासंग इतका दांडगा होता की, "ऑनर्सच्या परीक्षे-साठी अंदाजे २५००० हजार पृष्ठे वाचली," असे त्यांनीच नमूद करून ठेवले आहे. नेमलेल्या विषयांसाठी नेमलेल्या पाठ्य-पुस्तकां-खेरीज इतर जास्तीतजास्त ग्रंथांचे वाचन करून, टिपणे काढून स्वतंत्रपणे अभ्यास करण्याची त्यांची वृत्ती कॉलेजमध्ये प्रकर्षाने दिसून आली. त्याप्रमाणे केवळ पुस्तकी विद्येच्या आहारी न जाता स्वतंत्रपणे विचार करण्याची आणि ते विचार व्यक्त करण्याची त्यांची वृत्ती कॉलेजमध्ये असतानाच दिसून आली. 'शिवाजी आणि इंग्रज' हा निबंध त्यांनी लिहिला होता. त्या निबंधामध्ये शिवाजी-महाराज आणि इंग्रज ह्यांची तुलना करून इंग्रजी राज्यपद्धतीवर त्यांनी खरमरीत टीका केली होती. त्याचा परिपाक त्या कायदेशीर इंग्रजीराज्यात एवढाच झाला की, माधवरावांची छात्रवृत्ती जप्त करण्यात आली. 'मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष' हा विद्वन्मान्य ग्रंथ पुढे माधवरावांनी लिहिला. त्याची नम्र सुरुवात म्हणजे माधव-रावांनी कॉलेज-जीवनामध्ये लिहिलेला हा निबंध होय.

माधवराव १८६४ मध्ये एम्. ए. झाले आणि १८६६ मध्ये एल्एल्. बी. झाले. त्यांनी मिळविलेले यश प्रथम श्रेणीतले होते. त्यांच्या अद्वितीय यशाने सर्व दिपून गेले आणि मुंबई विद्यापीठ उजळून

निघाले. प्रत्येक पदवीदान समारंभाच्या वेळेस कुलगुरूंच्या भाषणांचा एकमेव विषय म्हणजे ' माधव-स्तुती '. त्यामुळे ' पदवीधरमुकुट-मणी ' ही सार्थ पदवी सर्व विद्याप्रेमिकांनी माधवरावांना बहाल केली. कुठलाही विषय असो, त्याचा धिमेपणाने व चिकाटीने सांगो-पांग अभ्यास व्हावयाचाच. ह्या कठोर तपश्चर्येचे हे फळ होते. म्हणून लोकनेत्र दिपले, पण ह्यासाठी अति वाचनाने माधवरावांनी स्वतःचे डोळे बिघडवून घेतले.

प्रथम काही वर्षे अध्यापन-कार्य केल्यावर माधवरावांनी ओरि-एंटल ट्रान्सलेटर म्हणून काम केले. मराठी वाङमयाचे परिशीलन करून सरकार-दरबारी अभिप्राय कळविण्याचे कार्य माधवरावांनी मेहनतीने, उत्तम रीतीने बजावले. स्वीकारलेले काम त्रयस्थवृत्तीने नोकरी म्हणून न करता ते कार्य उत्तम रीतीने करणे हाच आपला श्रेष्ठ धम, अशा कळकळीने काम करणे हा माधवरावांचा विशेष स्वभाव होता. आणि कोल्हापूरला न्यायाधीश म्हणून त्यांनी आपली नवी जबाबदारी स्वीकारली, तेव्हापासून हा त्यांचा स्वभाव विशेष-त्वाने दिसून आला. मर्यादशील वागणूक, शांतगंभीर स्वभाव, भिडस्तपणा ह्या विद्यार्थिदशेतील गुणांच्या कोंदणात आता त्यांची कार्यनिष्ठा विशेष शोभून दिसत असे. त्यांच्या कार्यनिष्ठेची प्रखरता त्यांच्या वडिलांनासुद्धा जाणवल्याखेरीज राहिली नाही. कोर्टामध्ये एक खटला चालला होता. माधवराव न्यायाधीश होते. त्या खटल्या-तील प्रतिवादी माधवरावांच्या वडिलांच्या परिचयाचे कोल्हापुरा-तील एक प्रतिष्ठित गृहस्थ होते. त्यांचे खटल्याचे कागदपत्र माधवरावांनी एकदा डोळ्याखालून घालावेत अशी विनंती त्या गृहस्थांनी माधवरावांच्या वडिलांना केली. त्यांच्या विनंतीला मान देऊन गोविंदरावांनी माधवरावांना ते कागद पाहण्यास सांगितले.

वडिलांची आज्ञा म्हणून पण आपण आपल्या स्वभावाविरुद्ध काही तरी करीत आहोत ह्या जाणीवेने माधवरावांनी ते कागदपत्र बघितले. पण नंतर मात्र योग्य प्रसंग पाहून अतिशय विनयशीलतेने पण तितक्याच निश्चयदर्शक स्वरात माधवराव वडिलांना म्हणाले, "सारे कोल्हापूर आपलेच आहे. पण मी येथे जबाबदारीच्या कामावर आलो आहे. पुन्हा असा प्रकार न झालेला बरा."

वडील काय ते समजले. आणि पुन्हा असा प्रकार झाला नाही. माधवरावांची ही प्रखर कार्यनिष्ठा कोल्हापुरी जशी वडिलांच्या निदर्शनास आली त्याप्रमाणे त्यांची कमालीची सहनशीलता आणि वडिलांवरचे नितांत प्रेमही वडिलांना दिसून आले. मुंबई, पुणे ह्या ठिकाणी प्रार्थना समाज, सामाजिक परिषद अशा संस्थांमध्ये महत्त्वपूर्ण भाग घेऊन सामाजिक सुधारणेच्या प्रसाराचे काम माधवराव करीत होते. बालविवाह, पुर्नविवाह ह्या विवाद्य प्रश्नावर त्यांचे विचार त्यांच्या भाषणांमध्ये व्यक्त झाले होते. 'सुशिक्षित तरुणांनी पुर्नविवाहासारख्या सुधारणेला सक्रिय चालना द्यावी.' असे विचार त्यांनी बोलून दाखविले होते. कोल्हापुराहून प्रथम मुंबईला आणि नंतर मुंबईहून पुण्याला माधवरावांची बदली झाली होती. पुण्याला असताना माधवरावांची प्रथम पत्नी वारली. पुर्नविवाहा-सारख्या सुधारणेचे वारे महाराष्ट्रात वाहू लागले होते. आपला मुलगा ह्या वावटळीमध्ये सापडण्याची भीती माधवरावांच्या वडिलांना वाटत होती. मुंबईच्या वृत्तपत्रामधून, 'आता ह्या आलेल्या संधीचा फायदा घ्यावा आणि सुशिक्षित तरुणांना कित्ता घालून द्यावा,' अशा तऱ्हेच्या सूचना येत होत्या. माधवरावांचे वडील ताबोडतोब कोल्हापूरहून पुण्यास आले. प्रत्यक्ष माधवरावांना मुंबई-करांची पत्रे येत होती. ती अशीच काही हितोपदेशाची असणार,

असा बरोबर तर्क करून माधवरावांचे वडील ती पत्रे स्वतःच हस्तगत करीत. माधवरावांचे टपाल माधवरावांना मिळत नसे. माधवरावांचा विचारही न घेता त्यांच्या वडिलांनी मुलीही बघण्यास सुरुवात केली. माधवरावांना ही गोष्ट पसंत नव्हती. घरात बालविधवा बहीण असताना आपण जुन्या पद्धतीने पुन्हा बोहल्यावर उभे राहणे बरोबर नाही, असा आपला विचार त्यांनी बोलूनही दाखविला. पण कर्मठ वडील आपला विचार सोडीनात. 'अशुभस्य कालहरणम्।' ह्या न्यायाने विलायतेस जाण्याचे निमित्त पुढे करून 'सहा महिने लग्न लांबणीवर टाकण्याची' भाषा करून पाहिली, पण मग वडिलांनी तर जमदग्नीचा अवतार धारण केला. अतिशय रागावले ते. माधवरावांनी वडिलांच्या हट्टापुढे मान तुकविली. सामाजिक सुधारणेच्या तत्त्वप्रेमाचे कोडकौतुक करण्यासाठी वडिलांचे मन दुखवून कौटुंबिक शांतता नष्ट करणे बरोबर नाही. असे माधवरावांचे विचारी मन म्हणू लागले. वडिलांना होकार मिळाला. अकरा वर्षांच्या रमाबाई माधवरावांच्या द्वितीय पत्नी म्हणून रानड्यांच्या घरात आल्या. 'तत्त्वद्रोहाचे पातक करणारे हे बोलघेवडे सुधारक कसली सुधारणा करणार ? ह्यांनी कर्तृत्वाला हरताळ फासला.' असे टीकेचे पडसाद वर्तमानपत्रात उमटले. पण वडिलांच्या शब्दाला नम्रतेने मान देऊन स्वार्थत्यागाचा व मनाच्या मोठेपणाचा आदर्शच माधवरावांनी इतरांपुढे ठेवला.

त्यांचे हे पितृप्रेम अशाच आणखी एका प्रसंगी वडिलांच्या निदर्शनास आले. माधवरावांचे स्नेही विष्णुशास्त्री पण्डित यांनी पुनर्विवाह केला होता. त्या दोघा पति-पत्नींना माधवरावांनी जेवायास बोलाविले होते, ही गोष्ट माधवरावांच्या कर्मठ वडिलांना अजिबात आवडली नाही. ते फार रागावले. त्यांनी बाळंभटांना

बैलगाड्या ठरवून आणण्यास सांगितले. तावडतोब कोल्हापुरास निघून जाण्याचा बेत त्यांनी ठरविला. माधवराव अतिशय अस्वस्थ झाले. त्यांना रात्रभर चैन पडले नाही. सकाळीच वडील निघणार होते. सारी तयारी झाली होती. माधवराव वडिलांसमोर येऊन उभे राहिले. वडिलांनी खाली बसण्यास सांगितले. पण खाली न बसता माधवराव म्हणाले,

" आपण करवीरास जाण्याचा बेत रहीत केला असे म्हटले म्हणजे मी खाली बसेन. आपण सर्वजण करवीरास जात असाल तर माझे तरी येथे काय आहे ? मीही आपल्याबरोबर येतो. कालच्या गोष्टी-बद्दल इतका राग येईल असे मला वाटले नाही. तसे असते तर ही भानगडच केली नसती. "

माधवरावांचे हे बोलणे ऐकूनही माधवरावांचे करारी वडील काही बोलले नाहीत. उलट त्या वेळेसच बाळंभटांनी येऊन सांगितले, " गाड्या ठरविल्या आहेत. आता येतील. " माधवरावांना वाईट वाटले. ते अतिशय खिन्नतेने म्हणाले, " शेवटी जाण्याचा बेत ठरला ना ? मला येथे ठेवून सर्व मंडळी जाणार ? ...माझी आई गेली त्याच दिवशी मी पोरका झालो आहे. " शोकावेग असह्य होऊन माधवराव माडीवर गेले. माधवरावांचे वडील लोडाला टेकून गंभीर-पणे बसले होते. सर्व वातावरणच अतिशय अबोल झाले होते. इतक्यात घरातील सर्व किरकोळ काम करणारा शिवा माडीवरून खाली आला व त्याने, ' कोल्हापुरास जाण्याचा बेत रहीत करीत नसाल तर मीही राजीनामा लिहिणार आहे. ' हा माधवरावांचा निरोप भीत भीत त्यांच्या वडिलांना सांगितला.

लोडाला टेकून बसलेले माधवरावांचे वडील गोविंदराव ताडकन जागचे उठले. पाठीवर हात ठेवून ते ओसरीवर आवेगाने येरझारा

घालू लागले. त्यांची हालचाल, त्यांच्या चेहऱ्यावरील भाव त्यांच्या मनातील तुफान दाखवीत होती. इतक्यात बाहेरच्या दाराची दिण्डी उघडून आत येत बाळंभट म्हणाले " गाड्या आल्या आहेत. "

" गाड्या परत पाठवा. " येरझारा घालता घालता झटकन मागे वळून गोविंदराव म्हणाले, " माडीवर जाऊन माधवरावास सांगा, मी कोल्हापुरास जात नाही; बेत रहीत केला आहे; तर आता स्नानास उठावे. कोर्टाची वेळ झाली, असे वर जाऊन सांगा. "

पुन्हा वादळी थैमान माधवरावांच्या शांतवृत्तीमुळे आणि कुटुंब-सुखासाठी स्वतःच्या तत्त्वनिष्ठेला मुरड घालण्याच्या स्वभावामुळे घरात निर्माण झाले नाही. कुटुंबाच्या स्वास्थ्याला माधवराव जसे जपत, तसेच सामाजिक सुधारणेचे किंवा राष्ट्रीय विकासाचे कार्य करणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांतील एकोपा निकोप ठेवण्याचाही माधवराव प्रयत्न करीत. सामाजिक, राजकीय, औद्योगिक अशा सर्व क्षेत्रांमध्ये माधवरावांनी आपल्या प्रचंड कार्यशक्तीने नवे चैतन्य निर्माण केले. कोणाचे मन न दुखविता, प्रसंगी कार्याच्या सफलते-साठी तात्त्विक माघार घेऊनसुद्धा त्यांनी नम्रतेने सार्वजनिक काका जोशी, गोपाळ कृष्ण गोखले असे सहकारी हाताशी धरून अनेक नवे उपक्रम सुरू केले आणि यशस्वीही केले. क्षमा हे शूरांचे भूषण आहे. त्याप्रमाणेच विनयशीलता हे विद्वानांचे भूषण. माधवरावांची विद्वत्ता अद्वितीय होती. म्हणून तर 'सर्वज्ञः स हि माधवः' अशा सार्थ शब्दांनी लोकमान्यांनी त्यांचा गौरव केला आहे. त्यांच्या ह्या विद्वत्तेला विनयशीलतेची, सहनशीलतेची अपूर्व जोड लाभली होती. म्हणूनच अजोड विद्वत्तेच्या सामर्थ्यावर देशहिताच्या कार्याची नवी नवी प्रचंड क्षेत्रे ते निर्माण करू शकले आणि टीकाशस्त्रांचे प्रहार

सहन करणाऱ्या दुर्दम्य सहनशक्तीमुळे ती नवी क्षेत्रे यशाच्या फळा-फुलांनी ते समृद्ध करू शकले.

कौटुंबिक स्वास्थ्यासाठी ज्याप्रमाणे स्वतःच्या प्रिय तत्त्वांना मुरड घालण्याचे प्रसंग त्यांच्यावर आले, त्याचप्रमाणे बाहेरही समाजकारणात आणि राजकारणात प्रगतीचा गाडा पुढे ढकलण्या-साठी त्यांना आपल्या तत्त्वाची प्रतिष्ठा डावलावी लागली. पुण्या-तील प्लेग–प्रकरणाच्या वेळी, पुण्यात झालेल्या अत्याचारांविषयी नामदार गोखल्यांनी मँचेस्टर गार्डीयन पत्राला मुलाखत दिली होती. ज्यांनी तक्रारीची पत्रे गोखल्यांना लिहिली होती ते ऐन वेळेस साक्षी-पुरावा देण्यास तयार होईनात. गोखल्यांच्यावर क्षमा मागण्याचा प्रसंग आला. तेव्हा "जे साक्षी-पुराव्याने आपण शाबीत करू शकत नाही ते असत्यच. आणि ह्या असत्य निवेदनाबद्दल क्षमा मागून तुम्ही आपल्या कार्याला मोकळे व्हा." असा सल्ला माधव-रावांनी गोखल्यांना दिला. स्वतःच्या प्रतिष्ठेपेक्षा कार्याची प्रतिष्ठा ते अधिक महत्त्वाची मानीत असत. लोकजागृतीचे अनेक मार्ग माधवरावांनी लोकांना दाखविले. ह्या कार्याचाच एक भाग म्हणून स्थानिक स्वराज्य निवडणुकीत भाग घेण्यास माधवरावांनी लोकांना उत्तेजन दिले. त्यांचे स्नेही कै. महादेव मोरेश्वर कुंटे ह्यांनी ह्या वेळेस प्रतिस्पर्ध्याची भूमिका स्वीकारली. कुंटयांची भाषणे म्हणजे तोफेचा भडीमारच. माधवरावांच्या विरुद्ध प्रचाराची भाषणे करण्याचा कुंटयांनी अगदी चंग बांधला. पेठा-पेठांतून भाषणांचा अगदी धुमधडाका सुरू केला कुंटयांनी. एकदा रास्ता-पेठेत कुंटयांचे व्याख्यान होते. माधवराव रानडे मुद्दाम व्याख्यानास हजर राहिले होते. रानडयांना पाहताच कुंटयांनी तोंड वळविले. श्रोत्यांकडे पाठ करून त्यांनी आपले भाषण पूर्ण केले. सभा संपल्यावर

माधवराव मुद्दाम व्यासपीठावर जाऊन कुंटयांना भेटले आणि आपल्या गाडीतून चलण्याविषयी त्यांना आग्रह करू लागले. पण माधवरावांच्या विनंतीला मान न देता कुंटे आपल्या गाडीकडे गेले. माधवराव त्यांच्या मागोमाग त्यांच्या गाडीकडे गेले आणि म्हणाले, " तुम्ही नाही आमच्या गाडीतून येत तर आम्ही तुमच्या गाडीतून फिरायला येतो." कुंटे काही न बोलताच गाडीत शिरले. माधवरावही बोलत बोलत त्यांच्या गाडीत बसले. गाडी सुरू झाली. माधवरावांचे बोलणे चाललेच होते. माधवरावांनी काय जादू केली कोणास ठाऊक, पण थोडया वेळातच गप्पा रंगात आल्या. हास्यविनोदात कुंटेही सामील झाले. ह्यानंतर कुंटयांची विरोधाची एकही सभा झाली नाही.

विरोधासाठी विरोध ही भूमिकाच त्यांना मान्य नव्हती. संमतिवयाचा कायदा होण्याच्या वेळेस काही प्रकरण निर्माण झाले होते. सनातनी-सुधारक असा वाद रंगला होता, सनातन्यांचे पाठीराखे लोकमान्य टिळक होते. टिळकांना खरमरीत उत्तर दिले पाहिजे असे म्हणणाऱ्यांना टिळकांची योग्यता जाणणारे रानडे म्हणाले, " उगीच काय उत्तर देणार ! आपल्यांपैकी एकाला तरी टिळकांच्या सारखे मुद्देसूद आणि बोचक लिहिता येते का ? अगोदर त्यांची अचूक लिहिण्याची शैली साध्य करा व मग उत्तर देण्याच्या गोष्टी बोला." माधवरावांनी १८५० मध्ये औद्योगिक परिषद सुरू केली. " देशातील यांत्रिक सामर्थ्य वाढविल्याखेरीज स्वदेशीचे व्रत योग्य रीतीने पाळले जाणार नाही." असे त्यांनी एका व्याख्यानात सांगितले होते. आणि ही गोष्ट शक्य करण्यासाठी परदेशी भांडवल देशामध्ये खेळू देण्याविषयी त्यांनी अनुकूलता व्यक्त केली होती. पण " परदेशी भांडवलाचे गोडवे गाणारे माधवराव देशद्रोही आहेत "

अशा तऱ्हेचे टीकेचे सूर निघू लागलेले पाहून परिषदेमध्ये फूट पडू नये एवढ्याच एका हेतूने परदेशी भांडवलाविषयीची आपली अनुकूल भूमिका त्यांनी सोडली. ह्या वैशिष्ट्यपूर्ण वृत्तीमुळेच सरकारी नोकरी सांभाळून राष्ट्रोन्नतीची अनेक कार्ये त्यांनी यशस्वी केली.

कोल्हापुराहून पुण्याला बदली झाली तेव्हापासून माधवरावांच्या कार्याचा हा व्याप सुरू झाला. १८६७ मध्ये स्थापन झालेल्या प्रार्थना समाजाचे माधवराव एक मोठे आधारस्तम्भ होते. सामाजिक परिषद, सार्वजनिक परिषद सार्वजनिक सभा, काँग्रेस, औद्योगिक परिषद अशा अनेक संस्थांना जन्म देण्यात, त्यांच्या कार्याला हिरीरीने चालना देण्यात, माधवराव प्रमुख होते. अनेक प्रकारच्या कार्यांचे जिवंत प्रवाह राष्ट्रात खळाळत वाहते ठेवून माधवरावांनी राष्ट्र चैतन्यमय केले. पुण्याला येऊन माधवरावांनी हे नवे कार्यांचे व्याप सुरू केले. त्या वेळचा महाराष्ट्र ‘ थंड गोळा होऊन पडला होता ’ असे लोकमान्यांनी वर्णन केले आहे. ह्या थंडगोळ्याला प्राणमय करण्याचे महान कार्य माधवरावांनी केले. त्यांनी आपल्या सव्यसाचित्वाने अनेक मार्गांनी जागृती केली. त्यांच्यामुळे चैतन्य नष्ट झालेल्या पुण्यात सार्वजनिक चळवळींचे व राजकारणाचे नवे वारे वाहू लागले. १८८५ मध्ये स्थापन झालेल्या काँग्रेसच्या बाबतीतदेखील माधवरावांचे श्रम आणि नेतृत्व बऱ्याच अंशी कारण झाले.

प्रथम माधवरावांनी स्वदेशीच्या प्रसाराचे कार्य हाती घेतले. स्वदेशीच्या प्रसाराखेरीज देशी भांडवलाचा परदेशाकडे जाणारा ओघ थांबणार नाही, सांपत्तिक सामर्थ्य वाढले पाहिजे, त्यासाठी औद्योगिक विकास व्हावयास पाहिजे, अशी त्यांच्या विचारांची तर्कशुद्ध मांडणी होती. त्यांनी आपल्या विद्वत्तापूर्ण भाषणांनी लोकांना स्वदेशीचे महत्त्व पटवून दिले.

"कच्चा माल परदेशी जातो व त्या मानाने फारच कमी किमतीचा पक्का माल देशात येतो. त्यामुळे हिंदी कारागिरांच्या कलाकौशल्याचा क्षय होत असून सर्वांची प्रवृत्ती विलायती जिनसांकडे वाढत आहे. स्वदेशीय वस्तूंचा खप कमी आहे. 'ज्या देशाच्या व्यापारात मालाची आयात-निर्यात सारख्या प्रमाणावर असते, त्या देशाचा व्यापार उत्कृष्ट,' असा अर्थशास्त्राचा सिद्धांत आहे. हिंदी व्यापाराची स्थिती शोचनीय आहे. व्यापार आणि राजकारण ही दोन्ही साधने परक्यांचे तावडीत. कारखाने वाढवून विलायती मालाच्या खपाची पिछेहाट करणे हे एक साधन आपल्या हातात आहे."

राष्ट्राच्या सर्वांगीण विकासाच्या त्यांच्या ह्या विद्वत्ताप्रचुर विचारांनी लोक भारावले व त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचे सुकाणू माधवरावांच्या हाती दिले. लोकांनी ही गोष्ट योग्य अशीच केली, असे माधवरावांनी आपल्या कामगिरीने दाखवून दिले. त्यांच्याच प्रेरणेने सार्वजनिक सभेने देशाच्या आर्थिक पाहणीचे फार महत्त्वाचे काम केले. शेतकऱ्याच्या हलाखीला सरकारी धोरणच सर्वस्वी कारण आहे, असे स्पष्टपणे ह्या पाहणीच्या अहवालात नमूद करण्यात आले. आणि त्यावरून निष्कर्ष काढून, 'सरकारच्या ओंजळीने पाणी न पिता आपल्या दुःखाचा विचार करून त्यावर उपाययोजना करण्याचा प्रयत्न केला पाहिजे,' ही गोष्ट सार्वजनिक सभेमार्फत माधवरावांनीच राष्ट्राला शिकविली. लोकांना स्वतःच्या पायावर खंबीर उभे राहण्याची शिकवण माधवरावांनी दिली, तशीच त्या वेळी 'जबाबदार राज्यपद्धती'ची मागणीही त्यांनी केली. अखिल भारतीय ऐक्याची कल्पना साकार होण्यासाठी

काँग्रेसच्या स्थापनेच्या विचाराला त्यांनी चालना दिली. सहा वर्षांमध्ये पुण्याचे राजकीय जीवन पार बदलून गेले. ह्या मागली स्फूर्ति-देवता माधवरावच, हे सरकारने ओळखले आणि पुण्याहून पुण्याचा स्फूर्तिदाता सरकारने नाशिकला नेला. पण आपल्या विशाल व्यक्तिमत्वाने नाशिकही माधवरावांनी जिंकले. मराठी ग्रंथोत्तेजक मंडळी, वसंत व्याख्यानमाला, वक्तृत्वोत्तेजक सभा इत्यादी संस्थांमध्ये माधवरावांची व्याख्याने होत आणि त्या ज्ञानगंगेमध्ये नाशिककर अक्षरशः न्हाऊन निघत. महाराष्ट्रामध्ये राजकारणाचे जे नवे वारे सुरू झाले होते त्यामागे माधवरावांची प्रेरणा असली पाहिजे हे सरकार जाणून होते. त्यामुळे ज्या बिनसनदशीर गोष्टी महाराष्ट्रात घडल्या त्यांचेही उगमस्थान माधवरावांच्यापाशी शोधण्याचा सरकारने प्रयत्न केला. पुण्याला बुधवारवाडा आणि विश्रामबागवाडा हे दोन पेशवेकालीन वाडे अग्नीच्या भक्ष्यस्थानी पडले. प्राथमिक तपासणीत रानडे ह्या आडनावासंबंधी काही धागा-दोरा पोलिसांच्या हाती आला. सरकारची संशयी नजर माधव-रावांच्याकडे वळली. पण हा नुसता आडनावाचा सारखेपणा आहे हे नंतर सरकारच्या लक्षात आले. रानडे नावाच्या दुसऱ्याच कोणी एका माणसाने काही अफरातफरीचे कागद नष्ट करण्यासाठी वाड्यांना आगी लावल्या, असे नंतर उघडकीस आले.

या वेळेस वासुदेव बळवंत फडके यांचे बंड महाराष्ट्रात गाजले होते. त्या बंडाचे माधवराव रानडे मदतनीस असावेत असे सरकारी गोटात बोलले जाऊ लागले. धुळ्याला फर्स्टक्लास सब-जज्जच्या जागेवर माधवराव रुजू झाले. तेथेही त्यांच्या मागचा हा पोलिसी ससेमिरा सुटेना. त्यांची पत्रे सेन्सॉर होऊन, प्रथम सरकारकडून बघितली जाऊन, मग त्यांना मिळत असत. राष्ट्राला संजीवन देण्याचे

माधवरावांचे जे मार्ग होते, ते सर्व सनदशीर, उजळ माथ्याचे होते. नवे नवे कार्यांचे व्याप वाढवून त्यामध्ये लोकांना गुंतवून राष्ट्रोद्धाराचा महान प्रकल्प त्यांनी उभा केला होता. त्यामध्ये राजद्रोहाचा वास देखील सरकारला येण्याचे काही कारण नव्हते. सरकारी नोकरी सांभाळून त्यांना ह्या सर्व गोष्टी करावयाच्या होत्या. त्यामुळे बिन-सनदशीर अराजक कृत्ये त्यांना मुळातच मान्य नव्हती. ही त्यांची वृत्ती असल्याने सरकारी संशयी नजर आपल्याकडे वळल्याचे त्यांना विशेषसे वैषम्य वाटले नाही. त्यांना येणारी दरोडेखोरांची पत्रे त्यांनी आपणहून पोलिसांच्या हवाली केली. कालांतराने सरकारची खात्री पटली. सतत संशयी वातावरण ठेवल्याबद्दल धुळे येथील कलेक्टरांनी माधवरावांची क्षमा मागितली. अशा रीतीने सरकारच्या ह्या संशयाच्या अग्निदिव्यामधून माधवरावांचे चारित्र्य तावून सुलाखून निघाले.

सरकारने माधवरावांना नामदारकी बहाल केली. लोक म्हणत, "माधवरावांना कौन्सिलची नामदारी दिल्याने माधवरावांचा बहुमान झाला असे नसून माधवरावांच्यासारखा अष्टपैलू बुद्धिमत्तेचा थोर पुरुष कौन्सिलला लाभला हा कौन्सिलचाच बहुमान झाला आहे." सरकारी फायनॅन्स कमिटीतही त्यांचा समावेश झाला. त्या कामासाठी १८८६ चा बहुतेक सर्व काळ त्यांनी त्या कामात खर्च केला.

अंगी घेतलेले प्रत्येक काम पूर्ण सामर्थ्यानिशी यशस्वी करण्याची अपूर्व हातोटी माधवरावांना साधली होती. ते आपल्या चतुरस्र बुद्धिमत्तेच्या साहाय्याने प्रत्येक प्रमेयाचे मूलग्राही विवेचन करून मार्गाची उत्कृष्ट आखणी करीत. आणि गुणांची पारख करून हाती धरलेल्या कार्यकर्त्याकडून ती गोष्ट घडवून आणीत. ह्या त्यांच्या

अतुलनीय सामर्थ्याबद्दल सर्वांना मोठा आदर आणि भक्तिभाव वाटे. काँग्रेसच्या संस्थापकांपैकी एक प्रमुख व्यक्ती-सर ह्यूम ह्यांचा पुण्यामध्ये हिराबागेत सत्कार करण्यात आला होता. त्या सत्कार-समारंभाच्या वेळी प्रथम प्रवेशद्वारावर स्वयंसेवकाकडे माधव-रावांच्याविषयी चौकशी करताना सर ह्यूम ह्यांनी स्वयंसेवकाला विचारले, 'Where is our God Mahadeo ?' स्वयंसेवक गोंधळात पडला. तेव्हा खुलासा करताना सर ह्यूम म्हणाले, "आमचा देव माहीत नाही ? आमचा देव, महादेव गोविंद रानडे." १८९२ मध्ये 'हिन्दी अर्थशास्त्र' हा निबंध वाचून माधवरावांनी हिन्दी अर्थ-शास्त्रातील नव्या युगाची सुरुवात केली. प्रत्येक राष्ट्राचे स्वतंत्र अर्थशास्त्र असते, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न करून हिन्दुस्थानला स्वतंत्र अर्थशास्त्र असावे असे त्यांनी सांगितले. अर्थशास्त्राच्या उत्पत्तिविकासाचे आणि मूल तत्त्वांचे ऐतिहासिक पद्धतीने आमूलाग्र विवेचन माधवरावांनी केले होते. राजकारण, सामाजिक सुधारणा, उद्योग, व्यापार, अर्थशास्त्र ह्या सर्व बाबतींत देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या मार्गावर नेण्याचा प्रचंड प्रयत्न माधवरावांनी केला. ह्या सर्व मार्गांची रूपरेखा आखण्यात कमालीची तर्कशुद्धता होती आणि ज्ञानाचा भक्कम आधार होता. माधवरावांच्या विद्वत्तेचे श्रेष्टत्व हेच.

ही विद्वत्ता देशाच्या उद्धारासाठी उपयोगी पडली हे देशाचे भाग्य. जनसेवा ही ईश्वरसेवा मानणाऱ्या माधवरावांना व्यावहारिक मान-सन्मानांना आणि वैभवाला महत्त्व देणाऱ्या काही लोकांनी 'लोकसेवा सोडा बढती मिळेल' असा उपदेश केला. जनसेवेचे व्रत घेणाऱ्या माधवरावांना हा उपदेश कधी मान्य होण्यासारखा नव्हता.

ह्याविषयी आपले मनोगत व्यक्त करताना ते विष्णू मोरेश्वर महाजनी ह्यांच्यापाशी म्हणाले,

" लिहू नका असे सांगणे म्हणजे वाचू नका–मरा–असेच सांगणे होय. ते कसे पत्करेल ? ज्या भावनेने मी लिहीत आहे ती जिवात जीव आहे तोपर्यंत कायम राहील. बढती न मिळाली तर न मिळो."

बढतीचे प्रयत्न जरी माधवरावांनी केले नाहीत, तरी ती बढतीच अखेर वाट पाहून दमली आणि ती आपणहून माधवरावांच्या चरणापाशी आली. न्यायमूर्ती तेलंगांच्या मृत्यूनंतर माधवराव रानडे न्यायमूर्ती झाले. पुण्यातील लोकांना एवढा आनंद झाला, की त्यांनी पुण्यात आठवडाभर महादेवोत्सव केला. पण ' सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ।' ही ज्या कर्मयोग्याची वागणूक त्या माधवरावांच्या चेहऱ्यावर मात्र ह्या आनंदाचा मागमूसही नव्हता. १८९३ मध्ये त्यांनी न्यायमूर्तींची जागा स्वीकारली.

औद्योगिक विकासाचा मार्ग माधवरावांनी राष्ट्राला दाखविला होता. तो विकास आपल्या पश्चात खंडित होऊ नये अशी त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी पंचवीस हजार रुपयांचा ट्रस्ट करून ठेवला. त्यामधून औद्योगिक संस्थांना देणग्या देण्याची व्यवस्था त्यांनी केली. त्यांनी देशामध्ये प्रज्वलित केलेल्या ज्ञानप्रकाशाचा दीप हातात घेऊन नामदार गोपाळ कृष्ण गोखले राजकारणाची नवी नवी दालने प्रकाशित करीत चाललेले त्यांनी पाहिले आणि जीवनाचे सार्थक झाल्याप्रमाणे त्यांना वाटले.

त्यांचे हे समाधान काळाने हेरले. काळाने त्यांना मानाचे आमंत्रण दिले. १६ जानेवारी १९०१ ह्या दिवशी महाराष्ट्राच्या ह्या न्यायमूर्तीने त्या आमंत्रणाचा स्वीकार केला. नित्याप्रमाणे काही तरी

वाचन चालले होते, वाचता वाचता छातीमध्ये जोराची कळ आली. ती अखेरची ठरली. आणि ‘साधी राहणी उच्च विचार सरणी’ हा आदर्श आपल्या वागणुकीने लोकांपुढे ठेवणाऱ्या महाराष्ट्राच्या या विनयशील विद्वान न्यायमूर्तीने महाराष्ट्राचा निरोप घेतला.



# आचार्य प्रफुल्लचंद्र




बंगालमधील एक छोटेसे गाव. राढूली कतियापारा हे त्याचे नाव. कपोताक्ष नदीच्या काठावर ते मोठ्या डौलाने वसले आहे. गावाकडची वाट अवखळपणे उतरत उतरत नदीच्या कुशीत विसावली आहे. आणि त्याठिकाणी त्या गाववाटेच्या दोन्ही बाजूंना सुरेखसा घाट बांधला आहे. नदीच्या पात्राच्या बाजूने घाटाला पायऱ्या आहेत दोन दोन. त्या पायऱ्यांना वारंवार न्हाऊ घालून ते कपोताक्ष नदीचे जल अवखळपणे खिदळत असते नेहमी. गावकरी कधी कधी विसाव्याला ह्या घाटावर येऊन बसतात. थंडगार पाण्याचा स्पर्श पायांना झाला म्हणजे दिवसभराच्या श्रमाचा शीण नाहीसा होतो आणि सांध्यतेजाने नदीचे पात्र जसजसे रंगत जाते तसतशा त्यांच्या मोकळ्या मनाच्या गप्पा रंगत जातात.

आता असेच दोन गावकरी त्या घाटावर बसले होते. मोठ्या रंगात आल्या होत्या त्यांच्या गप्पा. पण मौजेची गोष्ट अशी की सुखसंवादामध्ये तल्लीन झालेले ते दोघे जण समवयस्क मात्र नव्हते. त्यातले एक जण होते त्या गावचे एक सुशिक्षित प्रतिष्ठित गृहस्थ हरीशबाबू. आणि दुसरा होता त्यांचा मुलगा प्रफुल्लचंद्र. प्रफुल्लचंद्र मोठा चौकस मुलगा. अनेक प्रश्न तो वडिलांना विचारी आणि हरीशबाबूदेखील त्याला समर्पक उत्तरे देऊन त्याचे समाधान करण्यात धन्यता मानीत. ते मोठे विद्याप्रेमी होते. त्यांनी स्वतः त्या गावात एक छोटीशी शाळा काढली होती. प्रफुल्लचे प्राथमिक शिक्षण त्याच शाळेत सुरू झाले होते. आता आपल्या एका शाळूसोबत्याबद्दलच तो आपल्या वडिलांशी बोलत होता.

तो म्हणाला, "बाबूजी, त्या किरणचे वडील निळीच्या कारखान्यात कामाला होते ना, ते आजारी पडले म्हणून घरी आले आहेत. किरण म्हणाला, त्यांना फार थंडी वाजते म्हणून...बाबूजी त्यांना बरे वाटावे म्हणून एक मनुष्य त्याच्या वडिलांच्या पायांना, लोखंडी सळई तापवून चटाचट चटके देतो ..बाबूजी, अशाने बरे होतील किरणचे वडील ?"

"तुला काय वाटतं ?" त्याच्याकडे हसत पाहात हरीशबाबू म्हणाले.

"बरे कसे होतील ? उलट पायांना भाजले तर तेच नवे दुखणे व्हायचे." प्रफुल्ल म्हणाला.

"अगदी बरोबर, पण आपल्या लोकांच्या ह्या खुळचा समजुती कधी जायच्या नाहीत. हे हिवतापाचे दुखणे. ह्यावर क्विनाइन घ्यायचे सोडून हे लोक असले अघोरी उपाय करतात." हरीशबाबू म्हणाले.

त्यावर प्रफुल्लने विचारले, " क्विनाइन म्हणजे ? "

हरीशबाबू रंगात येऊन सांगू लागले, " ते हिवतापावरचे परदेशी औषध आहे...ते मोठे हुषार लोक आहेत. रॉबर्ट कॉक नावाच्या माणसाने संशोधन करून डासामुळे हा हिवतापाचा आजार होतो, हे शोधून काढले आणि वनस्पतीपासून हे क्विनाइन औषध त्या लोकांनी शोधून काढले."

" आपल्याकडे अशा वनस्पती नाहीत ? " प्रफुल्लने विचारले.

" आपल्याकडे तर औषधी वनस्पतींचे भाण्डार आहे. " हरीशबाबू सांगत होते, " पूर्वी ऋषिमुनींनी वनस्पतींचा औषधी उपयोग केलाही. पण आता लोक क्रियाशून्य झाले आहेत. शिकलेले लोक गुलामी वृत्तीने परदेशी औषधे घेतात आणि न शिकलेले खेडवळ असे जादुटोण्याचे उपाय खरे मानतात. "

" मग बाबूजी, आपल्या ऋषिमुनींनी कोणती औषधे तयार केली होती, ह्याची माहिती मी मिळवीन आणि तशी औषधेही तयार करीन मी. " प्रफुल्ल मोठ्या ऐटीने म्हणाला.

त्याचा तो आविर्भाव पाहून अभिमानाने हसत हरीशबाबू म्हणाले, " पण त्यासाठी पुष्कळ शिकले पाहिजे. ह्या अशा खेड्यातल्या शाळेत जाऊन काय उपयोग ? "

" मग कलकत्त्याला जाऊ. " प्रफुल्लने विचाले.

मुलाच्या इच्छेला मान देऊन हरीशबाबू खरोखरीच कलकत्त्याला आपले बिऱ्हाड घेऊन गेले. वास्तविक पाहता आर्थिक दृष्टीने ते त्यांना झेपण्यासारखे नव्हते. समाजसेवेचे व्रत खऱ्या निष्ठेने घेणाऱ्याच्या नशिबी जी लक्ष्मीची अवकृपा येते ती त्यांच्याही नशिबी आली होती. आणि त्यामुळेच की काय, सरस्वतीचा मनमोकळा विलास त्यांच्या घरात होत होता. ह्या तिच्या मुक्त

विहाराला प्रफुल्लच्या दृष्टीने आपले खेड्यातील घर अपुरे पडते आहे, असे पाहून हरीशबाबू परिस्थितीचा आणि परिणामाचा काडी-मात्र विचार न करता कलकत्त्याला आले. त्या वत्सल पितृहृदयात एकच तळमळ होती, प्रफुल्ल, प्रफुल्ल व्हावा ! कलकत्त्यामधील शालेय शिक्षणास सुरुवात झाल्यावर आपली कलेकलेने होणारी प्रगती दाखवून प्रफुल्लचंद्राने पित्याचे मन आनंदित केले. कलकत्ता म्हणजे राजकारण, समाजकारण, कला, विद्या यांचे एक सर्वश्रेष्ठ विद्यापीठच. तशा त्या उत्साही वातावरणात राहिल्यावर ज्ञानपिपासू मनाचा विकास झाला नाही तरच नवल. सुरेंद्रनाथ बानर्जी, आनंद-मोहन बसू अशा थोर देशभक्तांच्या व्याख्यानांनी प्रफुल्लचंद्रांच्या मनोभूमीमध्ये देशभक्तीचे बीजारोपण केले. देशाचे राजकारण समाजापासून अलग राहू शकत नाही. त्यासाठी समाजही सुधारला पाहिजे. प्रगत विचारांच्या भरभक्कम पायावर त्याची नव-उभारणी झाली पाहिजे, असे सुधारक विचार केशवचंद्र सेन ह्यांच्या ब्राह्मो समाजातील भाषणांनी त्यांना दिले. ह्या सर्व विचारांची उजळणी घरी आल्यावर हरीशबाबूंच्यापाशी होई आणि त्या विचारांना पक्के स्वरूप प्राप्त होई. आणि त्यांनी प्रफुल्लचंद्राचे मन घडविले जाई.

आजदेखील प्रफुल्लचंद्र कोणाच्या तरी व्याख्यानावरून घरी आला. अगदी थकलेला दिसत होता. हरीशबाबूंनी त्याच्या कपाळाला हात लावून पाहिला. चटकाच बसला त्यांच्या हाताला. चांगलेच तापले होते डोके. बिछान्याची व्यवस्था झाली. डॉक्टर येऊन काही औषध देऊन गेले. दीड दोन वर्षे ह्या दुखण्याने पाठपुरावा केला प्रफुल्लचंद्रांचा. परंतु हा आजार म्हणजे एक प्रकारची इष्टापत्तीच ठरली. गॅलिलिओ, न्यूटन अशा थोर शास्त्रज्ञांची चरित्रे प्रफुल्ल-चंद्रांनी वाचली. बेंजामिन फ्रॅंकलिन यांच्या चरित्राची तर त्यांनी

पारायणे केली. विज्ञानावर अधिष्ठित असा सत्याच्या उपासनेचा मार्ग या शास्त्रज्ञांच्या चरित्रांनी त्यांना दाखविला.

दुखण्याने दिलेली दीड दोन वर्षांची विश्रांती संपली आणि खंडित झालेले शिक्षण पुढे चालू झाले. १८७९ मध्ये प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षणास प्रफुल्लचंद्रांनी प्रारंभ केला. बंगालमधील थोर समाजसेवक पण्डित ईश्वरचंद्र विद्यासागर हरीश-बाबूंचे सहाध्यायी होते. त्यांच्याच प्रेरणेने हरीशबाबूंनी आपल्या गावामध्ये शाळा स्थापन केली होती. आता प्रफुल्लचंद्र जेव्हा प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाले तेव्हा पुढील अभ्यासासाठी ते ईश्वरचंद्रांच्या शिक्षण संस्थेत दाखल झाले. शिवाय ते प्रेसिडेन्सी कॉलेजमधील विज्ञानावरची व रसायनावरची व्याख्याने ऐकण्यास नियमित जात असत. तेथील प्राध्यापक सर अलेक्झांडर पेडलर यांच्या विषयाच्या ज्ञानाने, त्या ज्ञानाच्या मांडणीने आणि प्रयोगातील कौशल्याने ते तर अगदी भारावून गेले. परदेशात जावे आणि विज्ञानाचा अधिक अभ्यास करावा असे त्यांच्या मनाने घेतले. हरीशबाबूंनीदेखील प्रफुल्लचंद्रांना परदेशी पाठविण्याची आपली मनीषा अनेक वेळा बोलून दाखविली होती. प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये विद्यार्थी अनेक वेळा बोलत असत ह्या विषयावर. प्रफुल्लचंद्रांची प्रगती पाहून प्राध्यापक सुद्धा परदेश-गमनासाठी त्यांना प्रोत्साहन देत असत. एकदा ह्याच विचारांनी मन भारले असता विचार करीत करीतच प्रफुल्लचंद्र घरी आले. घरात ते पाऊल टाकणार तोच पुढील संवाद त्यांच्या कानावर आला.

“ हरीशबाबू, चार महिने झाले, तुम्ही व्याजाचेही पैसे दिले नाहीत...मग मुद्दलाला हात तरी कधी घालणार तुम्ही ? ” एक अपरिचित आवाज होता हा.

"शरदबाबू, थोडी कळ काढा." हा हरीशबाबूंचा आवाज होता. ते पुढे म्हणाले, "तुमचे मोठे उपकार आहेत माझ्यावर शरदबाबू. तुम्ही मदतीचा हात पुढे केलात म्हणून तर माझा प्रफुल्ल कॉलेज-शिक्षण घेतो आहे. तुम्ही काही काळजी करू नका. तुमची सारी रक्कम मी सव्याज परत करीन."

"ह्या अशा पोकळ आशीर्वादांनी पैसा थोडाच निर्माण होतो, हरीशबाबू ?" शरदबाबू म्हणाले.

"अशी निराशेची भाषा करू नका शरदबाबू. थोडा वेळ लागेल खरा, पण मी तुमचे पैसे बुडवणार नाही." हरीशबाबू बोलत होते, "आता तुम्ही जा. प्रफुल्ल यायची वेळ झाली आहे. त्याच्या कानांवर ही गोष्ट जायला नको."

आपल्या डोळ्यांवरून रुमाल फिरवून प्रफुल्लचंद्र हलक्या पावलांनी बाहेर पडले. आणि जरा बाहेर आडोशाला उभे राहिले. अंगावरची शाल सावरून शरदबाबू लगबगीने बाहेर पडले. फाटकातून ते बाहेर गेले असे पाहून त्यांना पोहचविण्यासाठी बाहेर आलेले हरीशबाबू आत गेले. आणि मग थोडा वेळ जाऊ देऊन प्रफुल्लचंद्र आत गेले. आपल्या चेहऱ्यावर हास्य दाखविण्याचा त्यांनी निष्फळ प्रयत्न केला. जे मनातले विचार मोठ्या उत्सुकतेने ते सांगण्यासाठी आले होते, त्या विचारांना शब्दरूप त्यांनी दिले नाही. ही सारी मनाची धडपड प्रयत्न करूनही मुखावर दिसल्याखेरीज राहिली नाही. हरीशबाबूंनी त्यामुळेच त्यांना विचारले, "काय रे प्रफुल्ल ?"

"काही नाही !" प्रफुल्लचंद्र म्हणाले.

"मग असा काळजीत असल्यासारखा, गडबडीत असल्यासारखा दिसतोस तो ?" हरीशबाबूंनी विचारले.

" काळजी नाही तर काय ? आता हे पदवीपरीक्षेचे वर्ष आहे. अभ्यास केला पाहिजे फार. " असे म्हणून प्रफुल्लचंद्र आत गेले.

त्या दिवसापासून खरोखरच प्रफुल्लचंद्रांचे घाई-गडवडीचे जीवन सुरू झाले. कधीमधी हरीशबाबू त्यांना विचारीत. आणि ' जादा तास आहे ', ' मित्राच्या घरी अभ्यासाला जातो ', ' कॉलेजच्या ग्रंथालयात अभ्यासाला जायचंय, ' ही प्रफुल्लचंद्रांची उत्तरे त्यांना अगदी पाठ झाली होती. घरीदेखील मध्यरात्रीपर्यंत त्यांचा अभ्यास चाललेला असे. अशा ह्या व्यग्र जीवनात वर्ष कधी निसटून गेले हेही कोणाच्या ध्यानी आले नाही. परीक्षा होऊनही काही दिवस झाले.

एके दिवशी बाहेरच्या खोलीमध्ये आरामखुर्चीवर पडून हरीशबाबू काही वाचन करत होते. इतक्यात बाहेरचे फाटक कोणीतरी लोटल्याचा, स्प्रिंगचा आवाज झाला. पुस्तकातून वर डोके काढून त्यांनी आपली नजर फाटकाकडे टाकली. त्यांच्या चेहऱ्यावर प्रसन्न–आनंद झळकला आणि तिपाईवर पुस्तक ठेवून उठून ते दाराकडे गेले. आणि मोठ्या प्रेमाने पुढे होऊन " या या ईश्वरबाबू ! फार दिवसांनी गरिबाच्या घरी पायधूळ झाडलीत. " असे म्हणून हात धरून हरीशबाबूंनी ईश्वरबाबूंना खुर्चीवर बसविले.

खुर्चीवर बसत आणि खुर्चीच्या पाठीवर अंगावरची खादीची शाल टाकीत पण्डित ईश्वरचंद्र विद्यासागर म्हणाले, " बाबूजी, अगोदर पेढे काढा ! "

" कशाबद्दल पंडितजी ? " हरीशबाबूंनी विचारले.

" सांग बाबा प्रफुल्ल, तुझ्या बाबूजींना. " पण्डित ईश्वरचंद्र आपल्या मागोमाग आत आलेल्या प्रफुल्लचंद्रांना म्हणाले.

अतिशय नम्रतेने खाली वाकून हरीशबाबूंना नमस्कार करून प्रफुल्लचंद्र म्हणाले, " बाबूजी, मी पास झालो. "

" पदवीपरीक्षा ? " हर्षातिशयाने हरीशबाबू म्हणाले.

" नुसती पदवीपरीक्षा नाही बाबूजी ! " गालातल्या गालात हसत प्रफुल्लचंद्रांच्याकडे अभिमानाने पाहात ईश्वरचंद्र बोलत होते, " ह्या शनिवारच्या बोटीने प्रफुल्ल एडिंबरोला पुढच्या शिक्षणासाठी जाणार."

" पण पैशाची सोय ? " हा प्रश्न विचारताना हरीशबाबूंच्या नजरेत अश्रू तरळत होते.

त्यांच्या खांद्यावर हात ठेवून ईश्वरचंद्र म्हणाले, " त्याने मिळविले आहेत पैसे बाबूजी. पदवीपरीक्षेच्या अभ्यासाबरोबर प्रफुल्लने ' गिल्ड्ख्रिस्ट ' स्कॉलरशिपच्या परीक्षेचा अभ्यास केला. सर्व विद्यार्थ्यांत तो पहिला आला, म्हणून त्याला ती स्कॉलरशिप मिळाली. आता एडिंबरो विद्यापीठामधून ' डॉक्टर ऑफ सायन्स ' होऊन येणार तुमचा प्रफुल्लचंद्र."

नेत्रांतून आनंदाश्रू झरत होते. ते शालीने टिपीत हरीशबाबू म्हणाले, " आणि ह्यातले एक अक्षरही मला माहीत नाही."

खाली मान घालून भिंतीशी उभ्या असलेल्या प्रफुल्लचंद्रांच्याकडे पाहात पण्डित ईश्वरचंद्र विद्यासागर म्हणाले,

" बाबूजी, खऱ्या श्रेष्ठ विद्येची सखी शोभणारी विनयशीलता अशी अबोलच असते."

आणि मग काही क्षण अबोल आनंदात गेले. ते पेढ्यापेक्षाही गोड मानून ईश्वरचंद्रांनी हरीशबाबूंचा निरोप घेतला.

त्या दोघा सहाध्यायी बंधूंचा निरोप घेऊन प्रफुल्लचंद्र रॉय १८८२ मध्ये इंग्लंडला गेले. स्कॉटलंडमधील एडिंबरो विद्यापीठामध्ये ते दाखल झाले. पदार्थविज्ञान, रसायन, प्राणी आणि जीवशास्त्र ह्या विषयांचा त्यांनी तिथे अभ्यास केला. ' बंडापूर्वीचा व नंतरचा

भारत ' हा ग्रंथ त्यांनी तेथील आपल्या विद्यार्थि-जीवनात लिहिला. ह्या ग्रंथाचे इंग्लंडमध्ये पुष्कळ कौतुक झाले. भारतीय लोकांविषयीचा इंग्लिश लोकांचा गैरसमज ह्या ग्रंथाने नाहीसा केला आणि खऱ्या भारतीयांचे त्यांना दर्शन घडविले. इंग्लंडमध्ये विद्यार्जनासाठी प्रफुल्लचंद्र गेले असता त्यांची मातृभूमीविषयीची ही दृष्टी विशेष उल्लेखनीय आहे. त्यांचा अभ्यास जीवनापासून तुटक असा नव्हताच मुळी. आणि म्हणूनच आपल्या देशाविषयीच्या कर्तव्यबुद्धीनेच, आपल्या देशामध्ये रसायनशास्त्राची मोठी गरज आहे, रसायना-मध्ये संशोधनाला फार मोठा वाव आहे, असे पाहून त्यांनी रसा-यनशास्त्र हा आपल्या अभ्यासाचा मुख्य विषय ठरविला. ह्या विद्या-पीठातील साध्या जीवनाचा त्यांच्यावर मोठा परिणाम झाला. अतिशय साधी राहणी स्वीकारून त्यांनी ज्ञानोपासना केली. भावी जीवनाची खरीखुरी तयारी ह्या विद्यापीठातील विद्यार्थी करू शकत असत. प्रफुल्लचंद्रांच्या चारित्र्य–विकासाला हे वातावरण उप-कारकच ठरले. १८८५ मध्ये ते बी.एस्सी. झाले आणि १८८७ मध्ये डी.एस्सी. झाले. त्यांनी ह्या परीक्षांमध्ये अतिशय उज्ज्वल यश मिळविले. मानाची पदके मिळविली. रसायन परिषदेचे ते उपाध्यक्ष झाले. होम प्राइझ स्कॉलर म्हणून एडिंबरो विद्यापीठा-मध्ये त्यांनी अधिक संशोधनही केले. पण त्यांची आणि त्यांच्या संशोधनाची अधिक गरज होती त्यांच्या देशाला, भारताला. आणि म्हणून १८८८ मध्ये ते स्वदेशी परतले.

कलकत्त्याला आल्यावर मोठ्या पगाराची सरकारी नोकरी मिळविण्याचा प्रफुल्लचंद्रांनी प्रथम प्रयत्न केला. परंतु त्यांनी लिहिलेल्या, ' बंडापूर्वीचा आणि नंतरचा भारत ' ह्या पुस्तका-मुळे इंग्रज अधिकारी त्यांच्यावर रुष्टच होते. त्यामुळे त्यांचा हा

प्रयत्न असफल झाला. अधिकारी उपरोधिकपणे म्हणत, 'एवढे मोठे रसायनशास्त्रज्ञ म्हणवता, संशोधक अहात. मग नोकरी कशाला मागता ? धंदा का काढीत नाही ? ' अधिकाऱ्यांचे हे उपरोधिक शब्द एका अर्थाने प्रफुल्लचंद्रांच्या बाबतीत स्फूर्तिप्रदच ठरले म्हणावयाचे. सरकारी नोकरीचा नाद सोडून प्रेसिडेन्सी कॉलेज-मध्ये दुय्यम प्राध्यापक म्हणून ते काम करू लागले. त्यांच्या स्वभावाला योग्य असे हे कार्यक्षेत्र त्यांना मिळाले. ध्येयवादी दृष्टीने प्राध्यापकाची भूमिका ते पार पाडीत असत. विद्यार्थ्यांना ते अतिशय तन्मयतेने शिकवीत असत. 'माझे विद्यार्थी हीच माझी सारी धन-दौलत आहे' असे ते म्हणत. तरुण विद्यार्थ्यांत संशोधनवृत्ती निर्माण करण्याचा त्यांनी सतत प्रयत्न केला. त्यामागील प्रेरणा 'एकोऽहम् बहुस्याम्' 'माझ्याप्रमाणे अनेक संशोधक निर्माण व्हावेत,' हीच होती. ते म्हणत असत, 'माणसाने सर्व विजय मिळविण्याची अपेक्षा करावी. पण शिष्यापासून मात्र त्याने सतत पराजयाची अपेक्षा करावी.' ह्या वृत्तीने कॉलेजमध्ये अध्यापन करून नंतरच्या वेळा-मध्ये सहा सात तास संशोधन कार्यात ते घालवीत असत. त्या वेळेसही विद्यार्थ्यांचा मेळावा त्यांच्या भोवती असे. 'विज्ञानाच्या उपासनेमुळे सत्याचा शोध लागेल आणि रूढीची बंधने गळून पडतील', ही त्यांच्या वडिलांची शिकवण ते कधीच विसरले नाहीत. त्याप्रमाणेच देशाच्या स्वातंत्र्याचा प्रश्न डोक्यात घोळू लागला. म्हणजे विज्ञान-विकासामुळे आर्थिक सामर्थ्य वाढेल आणि त्यामुळे देशाचे स्वातंत्र्य जवळ येईल, असे गणित त्यांचे मन मांडी. म्हणून देशभक्तीने प्रेरित होऊन स्वकर्तव्य म्हणून त्यांनी स्वतःला संशोधन-कार्याला वाहून घेतले होते. त्यांनी आपल्या घराचीच

प्रयोगशाळा बनविली होती. शक्य तितका स्वतःचा खर्च कमी करून पगाराचा मोठा हिस्सा ते प्रयोगकार्यासाठी खर्च करीत असत.

हवेमध्ये ४/५ भाग नायट्रोजन आहे. हा नायट्रोजन वनस्पतींच्या मार्फत मनुष्याला मिळू शकतो. जीवाच्या घटक द्रव्यांपैकी नायट्रोजन हे महत्त्वाचे घटक द्रव्य असल्याने मनुष्यास नायट्रोजन अत्यावश्यक आहे. म्हणून नायट्रोजनयुक्त पदार्थ तयार करण्याचे रसायनशास्त्रज्ञांचे प्रयोग चालू होते. नायट्रोजन रासायनिक प्रक्रियेत मिसळत नसल्याने स्थिर असे संयुक्त करण्याचे प्रयोग यशस्वी होत नव्हते. पारा आणि नायट्रोजन यांचे संयुक्त करण्याचे प्रयत्न चालले होते. हे शास्त्रज्ञांचे प्रयत्न पंधराव्या शतकापासून चालले होते. शेवटी हे संयुक्त, मर्क्युरस नायट्रेट्स, तयार करण्यात प्रफुल्लचंद्रांना यश मिळाले. त्यांनी भारताचे नाव उज्ज्वल केले. सगळीकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव झाला. पारा व नायट्रोजन यांचे संयुक्त करण्याच्या निरनिराळ्या दहा पद्धती त्यांनी शोधून काढल्या. युरोपीय शास्त्रज्ञांनी तर 'मास्टर ऑफ नायट्रेट्स' ह्या नावाने त्यांचा गौरव केला.

अशा रीतीने भारतीय रसायनशास्त्राचे जनकत्व ह्या शोधामुळे प्रफुल्लचंद्रांच्याकडे आले. पण हे जनकत्व आपले नाही असे विनम्रभावाने प्रफुल्लचंद्र मानीत होते, भारतीय वैद्यक शास्त्र प्राचीन काळी पुष्कळ प्रगत होते. अशी माहिती हरीशबाबूंशी बोलताना त्यांना मिळालेली होती. भारतामध्ये पुरातन कालामध्ये रसायनामध्ये पुष्कळ प्रगती झालेली होती. वेगवेगळ्या धातूंच्या शुद्धीकरणाच्या पद्धती हिंदूंना माहीत होत्या. पण त्याविषयीचे सर्व वाङ्मय संस्कृत भाषेमध्ये असल्याने जगाला त्याची काहीच माहिती

नव्हती. जगालाच काय, पण खुद्द भारतीयांनासुद्धा ह्या किमया-शास्त्राची किमया अज्ञात होती. प्राचीन भारताचा हा ठेवा नव-भारताच्या स्वाधीन केला तर तरुणांचा स्वाभिमान जागृत करण्याची किमया आपण करू शकू असा विश्वास प्रफुल्लचंद्रांना वाटू लागला. ' ल आलकेमिस्ट्स् ग्रीस ' हा ग्रीक रसायनशास्त्राचा इतिहास-ग्रंथ प्रफुल्लचंद्रांच्या वाचनात आला होता. त्या ग्रंथाचे लेखक बर्थेलॉट ह्या सुप्रसिद्ध फ्रेंच संशोधकांनी प्रफुल्लचंद्रांना भारतीय रसायनाचा इतिहास लिहिण्यासाठी विशेष प्रोत्साहन दिले. अनेक संदर्भ-ग्रंथ प्रफुल्लचंद्रांनी जमा केले. संस्कृत ग्रंथांतील उतारे घेण्यासाठी पण्डित नभकान्त कविभूषण यांची त्यांना फार मदत झाली. सर्व प्रकारची पूर्ण तयारी करून प्रफुल्लचंद्रांनी सखोल अभ्यास केला. आणि १९०२ मध्ये ' हिंदु-रसायनाचा इतिहास ' ( History of Hindu Chemistry ) ह्या ग्रंथाचा पहिला भाग त्यांनी प्रसिद्ध केला. इंग्रज, फ्रेंच, जर्मन ह्या शास्त्रज्ञांच्या अक्षरशः उड्या पडल्या ह्या ग्रंथावर. १९०७ मध्ये दुसरा भाग प्रसिद्ध झाला. हा ग्रंथ विद्वन्मान्य आणि जगन्मान्य झाला. स्वतः प्रफुल्लचंद्र ह्या ग्रंथामुळे सरकारमान्य होऊन त्यांना सरकारकडून ' सर ' ही पदवी मिळाली. पण प्रफुल्लचंद्रांच्या मते सरकारच्या ह्या ' सर ' पदवीला विद्यार्थ्यांनी प्रेमाने दिलेल्या ' आचार्य ' ह्या पदवीची सर कधीच येणार नव्हती. आणि म्हणूनच प्रफुल्लचंद्र रॉय भारताला परिचित आहेत ते ' आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय ' म्हणूनच.

आचार्यांनी विज्ञानाची जी उपासना केली, त्या उपासनेमागील त्यांचा निर्मल हेतू देशाचे सामाजिक आणि आर्थिक पारतंत्र्य नष्ट करावे हाच होता. आर्थिक पारतंत्र्य नाहीसे करण्याचा हेतू साध्य करण्यासाठी त्यांनी ' बेंगॉल केमिकल अ‍ॅण्ड फार्मास्युटिकल वर्क्स '

हा कारखाना उभारला. अतिशय साधेपणाने आणि काटकसरीने राहून जी काही रक्कम ते शिलकीत टाकू शकले त्या रकमेच्या अल्प-भांडवलावर त्यांनी हा कारखाना काढला. देशाचे आर्थिक परावलंबित्व नष्ट होण्यासाठी कारखाने, उद्योगधंदे, यांची वाढ होणे आवश्यक आहे, असे त्यांना वाटत होते. ह्या त्यांच्या तळमळी-मुळेच छोटयाशा भांडवलावर छोटयाशा घरात ह्या कारखान्याचा जन्म झाला. आरंभी पुष्कळ कष्ट, त्रास सहन करावा लागला. लोकांचा देशी औषधांवर विश्वास बसेना. आचार्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रयत्नांची शिकस्त करून आपल्या कारखान्याची औषधे परदेशी औषधांच्या तोडीची बनविण्यात यश मिळविले. सरकारने त्यांना काही विद्यार्थ्यांसमवेत युरोपमधील प्रयोगशाळांची पाहणी करण्यासाठी पाठविले होते. ह्या दौऱ्याचा त्यांना त्यांच्या औषधांच्या कारखान्यासाठी फार मोठा उपयोग झाला. डॉ. अवमूल्यचरण बोस, सतीशचंद्र सिन्हा ह्या सहकाऱ्यांनी त्यांना मोलाचे सहकार्य केले. सतीशचंद्र सिन्हा हे त्यांचे मेहुणे होते. ते कारखान्यात काम करीत असता ॲसिडमुळे विषबाधा होऊन मरण पावले. आपल्या ह्या एकनिष्ट सहकाऱ्याविषयी आचार्य आपल्या आत्मवृत्तात लिहितात, "सतीश मला देवानेच मिळवून दिला होता...त्याने तो परत नेला. देवा, तुझी लीला अगाध आहे." अशा त्यागी सहकाऱ्यांच्या साहाय्याने अवघ्या दोन चारशे रुपयांत एका खोपटात सुरू झालेला हा कारखाना आज आशियातील एक श्रेष्ठ प्रतीचा कारखाना ठरलेला आहे. स्वतःच्या वैयक्तिक मिळकतीतून आचार्य प्रफुल्लचंद्रांनी हा कारखाना काढला आणि तो पुढे त्यांनी लिमिटेड केला, आपल्या शेअरच्या नफ्यातून त्यांनी शाळा, कॉलेज व इतर सार्वजनिक कार्ये यांसाठी अनेक देणग्या दिल्या.

दीन-दलितांना ते वत्सल पित्याप्रमाणे वाटत. त्यांनी लावलेले शोध, प्रसिद्ध केलेल्या संशोधन-पत्रिका आणि विदेशी औषधांशी स्पर्धा करणारी त्यांच्या कारखान्यात तयार होणारी औषधे ह्या त्यांच्या कर्तबगारीमुळे सर्वत्र त्यांचा नावलौकिक झाला. १९०४ मध्ये परदेश-दौऱ्यावर ते गेले असता जेथे जेथे ते गेले तेथे तेथे त्यांचा सन्मान झाला. डरहॅम विश्वविद्यालयाने त्यांना 'डॉक्टर ऑफ् सायन्स' ही पदवी दिली. सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली होती. पण त्या उपाधींची बाधा त्यांना कधी झाली नाही. त्यांचे जीवन संन्यस्त-वृत्तीच्या कर्मयोग्याचे होते. कॉलेजमधून ते निवृत्त झाल्यानंतरही त्यांच्या ज्ञानाचा फायदा मिळावा म्हणून कलकत्ता विद्यापीठाने त्यांना डायरेक्टर म्हणून काम करण्याची विनंती केली. ते निर्वेतन डायरेक्टर म्हणून काम पाहात होते. ते कॉलेजमधून निवृत्त झाले तरी आपल्या जीवनकार्यातून कधीच निवृत्त झाले नाहीत. १९२० मध्ये भरलेल्या विज्ञान परिषदेच्या अध्यक्षपदावरून बोलताना ते म्हणाले,

"आपल्याकडे पुस्तकी प्रामाण्याने बुद्धी कुंठित झाली आहे. विज्ञानभक्ती जर आपणांत निर्माण झाली तर खऱ्या अर्थाने आपण सत्यसंशोधनाला सुरुवात करू शकू. या नवभक्तीनेच आपली बुद्धी मोकळी होऊ शकेल."

ह्या उच्च विचारसरणीला साजेशी त्यांची राहणी अतिशय साधी अशी होती. खादीचे धोतर, अंगामध्ये खादीचा सदरा, त्यावर पांघरलेली खादीची शाल, वाढलेले केस आणि दाढी असा हा आंतरराष्ट्रीय कीर्तीचा भारतीय शास्त्रज्ञ एखाद्या ऋषिमुनी-प्रमाणे दिसत असे. इतका विद्वान रसायनवेत्ता पण सर्वांत मिळून मिसळून वागण्याइतका विनयशील आणि साधा. विद्यार्थ्यांना ते

C६६७१५ ...
क्रमांक ३६०२१ ... ८।३।७१


आपल्यापैकीच एक वाटत, इतके ते त्यांच्याशी समरस होत. अनेक विद्यार्थी त्यांनी तयार केले. त्यांची आचार्यांवर नितांत श्रद्धा होती, भक्ती होती. आणि म्हणूनच खुलना जिल्ह्यात दुष्काळ पडला असता दुष्काळ-ग्रस्तांच्या मदतीसाठी धावून गेलेल्या आचार्यांनी जेव्हा मदतीची हाक दिली तेव्हा त्यांचे सारे विद्यार्थी दुष्काळ-पीडितांच्या सेवेला ताबडतोब धावून आले.

लोकांची मोठी केविलवाणी स्थिती झालेली होती. गरीब लोकांची अन्नान्नदशा झाली होती. त्यांच्या सेवेला आचार्य तेथे जाऊन उभे राहिले. आपल्या शेकडो विद्यार्थ्यांच्या सहकार्याने त्यांनी तेथे मदतकेंद्र चालविले. प्रसंगी चिंचोके भाजून खावेत, प्रसंगी मिळेल तो पाला उकडून खावा. दरिद्री खेडुतांच्या अन्नान्न-दशेला अंत नव्हता. भारतासारख्या सुवर्णभूमीच्या सुपुत्रांवर आलेला हा दारुण प्रसंग पाहून आचार्यांचे कारुण्याने विरघळलेले हृदय नेत्रातून पाझरू लागले. साऱ्या जगाने गौरविलेल्या ह्या महान शास्त्रज्ञाने आपल्या ह्या देशबांधवांना वाचविण्यासाठी स्वत: हातात भिक्षेची झोळी घेतली. त्यांच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या ह्या कृत्याचे मोठे आश्चर्य वाटले. आचार्य त्यांना म्हणत,

“आत्ताच्या प्रसंगी हीच गोष्ट आवश्यक आहे. आणि योग्य वेळी जर योग्य गोष्ट मनुष्य करील तर त्याला तो करतो त्याच्या दहा पट कार्य करता येईल.”

आचार्यांनी आपल्या प्रयोग-शाळेत आपल्या विद्यार्थ्यांना विज्ञान रसायन शास्त्रातील प्रमेये सोडून दाखविली असली तर ह्या सेवा-शिबिरात त्यांनी अनेक वेळा आपल्या विद्यार्थ्यांना जीवनातील प्रमेये सोडवून दाखविली, जीवनसूत्रे सांगितली.

पैशाकडे लक्ष न देता जगाच्या ज्ञानराशीमध्ये भर घालण्याचे ध्येय डोळ्यापुढे ठेवण्यास ते नेहमीच आपल्या शिष्यांना सांगत. आणि हे ध्येय साध्य करण्यासाठी—

" दिवस उगवताच मी आज काय सत्कृत्य करू शकेन असा प्रश्न स्वत:ला विचारावा. दिवसभर हीच भावना मनात बाळगावी. आणि संध्याकाळी मी आज काय सत्कृत्य केले याचा विचार करावा. या प्रश्नाचे समाधानकारक उत्तर मिळाल्यावाचून झोप येता कामा नये." हे त्यांचे जीवनसूत्र सतत ते आपल्या विद्यार्थ्यांपुढे ठेवीत असत.

खुलना जिल्ह्यातील दुष्काळाच्या संकटाला कुठे यशस्वी तोंड दिले जात होते तोच उत्तर बंगालवर अतिवृष्टीचे संकट कोसळले. १८०० चौरस मैलांचा टापू जलमय झाला. आचार्य आपल्या विद्यार्थ्यांसह पूरग्रस्तांच्या साहाय्याला धावून गेले. त्यांनी दुष्काळ-निवारण फंड उभारला. वर्तमान पत्रद्वारे त्यांनी जनतेला आवाहन केले. मदतीचा पाऊस पडला. सरकारला जमले नाही ते आचार्यांनी करून दाखविले. सहा लाख रुपये त्यांनी गोळा केले. पण पीडितांच्या मानाने हे सहा लाख काहीच नव्हते. खरे हे कर्तव्य सरकारचे. पण सरकार करू शकत नव्हते. ह्याचा अर्थ सरकार करू इच्छीत नव्हते. ह्यासाठी सरकार आपले हवे. ह्याचा अर्थ इतकाच की सर्व प्रकारच्या दु:खातून मुक्त होऊन विकसनाच्या मार्गाकडे जाण्यासाठी स्वातंत्र्यच आवश्यक आहे, हा विचार आचार्यांच्या मनात पक्का बिंबला. ते म्हणत, " संशोधन थांबू शकेल, उद्योगधंदे थांबविता येतील, पण स्वराज्य थांबणार नाही."

खुलना जिल्ह्यातील दुष्काळ आणि उत्तर बंगालमधील अतिवृष्टी ह्या दोन्ही प्रसंगी होरपळल्या गेलेल्या आणि झोडपून निघालेल्या शेतकऱ्याचे करुण चित्र त्यांनी पाहिले होते. बळीराजा राजबळी

झालेला त्यांनी बघितला होता. दुसरीकडून आणलेले
भाकरी-तुकडा नसतानाही शेतकरी घेऊ शकत
त्याच्याजवळ त्यासाठी पैसा नव्हता. तो दरि
कंगाल झाला होता. दुसऱ्याच्या दानाने हा प्रश्न
नव्हता. त्यासाठी त्यांना दुसरा रोजगार मिळ
होते, असे आचार्यांना वाटले आणि महान
असलेली श्रीकृष्णाच्या सुदर्शन चक्रा
निदर्शनास आली. स्वत: चरख्याचे सुद
महत्त्व इतरांना सांगू लागले. ते
म्हणजे चरखा.'

असे होते ह्या कर्मयोगी
दलित देशबांधवांविषयी जि
सत्याचा शोध घेण्याची त
इतके आपल्या व्यवसा
ज्ञानसाधनेसाठी चा
आल्या म्हणजे '
समाधान वाटते


१९४२ मध
त्यांच्या अंथरु
अंगी नसला

"जगाम
प्रेरणा मिट
शिवाय नि


हे सम
समाधाना

ध्ये आचार्य प्रफुल्लचंद्रांनी आत्मचरित्र प्रसिद्ध केले.
यांनी त्या आत्मचरित्राचे परीक्षण लिहिले होते.
पुढील काही ओळी आचार्यांचे प्रभावी व्यक्तिमत्व
ने लक्षात घेण्याजोग्या आहेत.

जीवनाइतके वैशिष्ट्यपूर्ण जीवन क्वचितच
चार्यांच्या जीवनाचे विविध पैलू आचार्यांचे
शास्त्रप्रयोगांच्या साहाय्याने सत्याचा
च्या साधनेने राष्ट्रसेवा करावयाची,
ट्रकल्याणासाठी जाणीवपूर्वक अखंड
जीवनापासून आपणास मिळतो."



आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय विद्यार्थ्यांना प्रयोग करून दाखवीत आहेत.



ताश्कंद करार : आयूबखान, कोसिजिन् व शास्त्रीजी

# प्रधानमंत्री शास्त्रीजी



मुगलसराई-गंगाकाठचे एक लहानसे खेडेगाव. विश्वेश्वराच्या काशीचे उपनगर वाटावे इतके काशीक्षेत्राला बिलगून जवळच वसलेले हे छोटेसे गाव आहे. यात्रेला, देवदर्शनाला जाणाऱ्या भाविकांना आपल्या कडे-खांद्यावर खेळवीत आणि गंगालहरींवर हिंदकळत नावा नेहमी जात येत असताना दिसायच्या. उगवत्या सूर्याचा निरोप घेऊन नावा वाराणशीकडे जात. आणि मावळत्या सूर्याच्या साक्षीने त्या परतत गावाकडे.

आज तर वाराणशीला यात्राच होती. पुष्कळ गावकरी यात्रेला गेले होते. आणि आता मावळत्या रविराजाने आकाशामध्ये तेजाची रंगपंचमी सुरू केली. तेव्हा नावा गावाकडे परतू लागल्या होत्या. तेजाळलेले पाणी वल्ह्यांनी इकडे तिकडे उडवीत नावा भराभर

किनारीच्या वाळवंटात घुसत होत्या आणि गावकरी नावेतून लगबगीने उड्या घेऊन घर गाठण्यासाठी पायांना गती देत होते. हळूहळू वेळ निघून जात होता. तेजाळलेले गंगाजळ आता काळवंडू लागले होते. जशी निराशेने, चिंतेने मने काळवंडतात त्याप्रमाणे. गंगाकाठावर एक तरुण स्त्री केव्हाची येऊन उभी राहिली होती. ती आली होती तेव्हा केवढा उल्हास, केवढी उत्सुकता तिच्या मुखावर दिसत होती. आता त्या उत्सुकतेला चिंतेने खो दिला होता. आता नावांची रहदारी कमी झाली. अंधारल्यानंतर वाहतूक बंद होत असे. इतक्यात पाणी खळाळल्याचा आवाज झाला. त्या स्त्रीने उत्सुकतेने, काहीशा आनंदाने वर पाहिले, कुतूहलाची नजर दूरवर टाकली. एकुलती एक नाव झपाझप पाणी तोडून काठाकडे येत होती. केवढा जिवात जीव आला त्या स्त्रीच्या. अगदी मनाच्या गतीने ती तीराकडे गेली.

तोंड वळवून नाव थांवली. भराभर नावेतले लोक खाली उतरले. शेवटची खेप झाली म्हणून नावाडी नाव वाळवंटावर ओढून घेत होते. नावेतून उतरलेल्या उतारूंमध्ये काही स्त्री-पुरुष होते, दोन चार मुले होती. पण त्या स्त्रीच्या मुखावर चिंतेचा कशिदाच अधिक दाट विणला गेला. इतक्यात त्या नावेतून उतरलेल्या मुलांची नजर त्या स्त्रीकडे गेली. त्याबरोबर ते तिच्याकडे आले. त्यांतला एक धीट मुलगा पुढे होऊन म्हणाला, " लालच्या आई, आम्ही लालची किती तरी वाट पाहिली. यात्रेतून परतताना त्याची आमची चुकामूक झाली. तो पुन्हा आम्हांला दिसलाच नाही...नदी-तीरावर नावांच्या पाच सहा खेपा होईपर्यंत आम्ही थांबलो त्याच्यासाठी."

" पण अगदी शेवटची नाव निघाली. तेव्हा मात्र आमचा नाइलाज झाला...आणि आम्ही आलो." दुसरा एक मुलगा म्हणाला.

" म्हणजे माझा लाल चुकला तर नाही ? " व्याकुळ स्वराने ती स्त्री म्हणाली.

" तुझा लाल कधी चुकेल का मा ? " हे शब्द ऐकताच सर्वांनी दचकून मागे पाहिले. अंधाराने सारा नदीकाठ झाकून टाकायला सुरुवात केली होती. तशा त्या अंधारातून एक छोटी आकृती धावत आली आणि त्या स्त्रीपुढे उभी राहिली. डोक्यावर कपड्यांचे गाठोडे होते. सारे अंग निथळत होते. त्या छोट्या आकृतीला पाहून त्या स्त्रीच्या डोळ्यातून आनंदाश्रू निथळले आणि ती म्हणाली, " नाही चुकायचा. दुसऱ्याला मात्र चुकचुक करायला लावायचा... पण लाल, ह्या तुझ्या मित्रांना गुंगारा का दिलास ? "असे म्हणून तिने लालला जवळ घेतले आणि ती आपल्या पातळाने त्याचे अंग कोरडे करू लागली. तिच्या पातळामध्ये डोके घुसळले जात असतानाच लाल म्हणाला,

" मा, ते भित्र्या भागुबाईसारखे नावेत बसून आले, नुसते दिसायला मोठे. मी कसा पोहून आलो. "

"मोठा बहादूर की नाही ! " लालची आई म्हणाली.

"मग माझं नावच आहे ना लालबहादूर ! "

ह्या लालच्या बोलण्याने अधिकच आनंदून लालची आई म्हणाली " बरं चल आता घरी...जा बाबा तुम्ही आपापल्या घरी. तुमचे आई-वडील वाट पाहात असतील. "

लालच्या आईच्या सांगण्याप्रमाणे ती मुले घरोघर गेली. लाल आणि त्याची आई आपल्या घराकडे वळले. घराकडे जाता जाता दोघेजण बोलत होते. लालची आई म्हणाली, " लाल, काळोखाच्या वेळी अशी गंगेमधे उडी टाकणं चांगलं नाही. "

"मा, शूर लोक संकटामधेसुद्धा बेदरकारपणे उडी घेतात, त्याशिवाय संकटातून तरूनच जाता येत नाही. मग ही तर गंगामाई. तिच्या कुशीमधे उडी घ्यायला कशाला भ्यायचं ?" लाल म्हणाला.

"असा आडदांडपणा चांगला नाही लाल." आई जरा रागाच्या स्वरात म्हणाली, "त्या दिवशीचे माळीबाबाचे शब्द विसरलास वाटतं ?"

"नाही मा !" हलकेच गहिवरल्या कंठाने लाल म्हणाला. "मी विसरलो नाही...मला पिताजी नाहीत. मी...मी फार चांगलं वागायला हवं...आणि म्हणूनच मा, मी पोहून आलो."

"म्हणजे ?" आईने आश्चर्याने विचारले.

लाल म्हणाला, "परत येताना नावेसाठी पैसे नव्हते माझ्या-जवळ...त्या मुलांना हे कसं सांगायचं ? त्यांच्या जवळ पैसे कसे मागायचे ?"

लालचे हे दोन शब्द ऐकताच त्या मातेला भडभडून आले. तिने लालला पोटाशी घेतले. तिच्या तोंडातून दोनच शब्द बाहेर पडले, "माझा लाल !"

"आला का तुमचा लाल रामदुलारीदेवी ?" अंधारातून कोणाचे तरी शब्द आले.

बोलता बोलता घर कधी आले हेदेखील त्या मायलेकरांच्या लक्षात आले नाही. अंधारातून आलेल्या त्या प्रश्नाला "होय !" असे उत्तर देऊन रामदुलारीदेवींनी दाराची कडी काढली आणि ती मायलेकरे घरकुलात गेली.

रामदुलारीदेवींनी काड्याची पेटी धुंडून काढली आणि देवा-जवळचा नंदादीप लावला. मनोभावे त्यांनी हात जोडले. डोळे मिटले. क्षणभरात पूर्वायुष्याचा चित्रपट डोळ्यापुढून झळकून गेला.

शारदाप्रसाद श्रीवास्तव हे एक सालस शिक्षक होते. गरिबीचा संसार, पण रामदुलारीदेवींच्या सहवासात शारदाप्रसादांना तो कधीच असार वाटला नाही. परमेश्वराने थोडीशी सुखाची झलक दाखविली पति-पत्नींना. शारदाप्रसादांना सरकारी नोकरी लागली. चंचल लक्ष्मीने थोडेसे कृपेच्या दृष्टीने पाहिले. तशातच लालचा जन्म झाला. दुधात साखर पडली. पण हे साखर-दूध लालच्या नशिबी नव्हते. त्याच्या नशिबी अश्वत्थाम्याचे पीठपाणीच होते. लालच्या पालन-पोषणाची जबाबदारी रामदुलारीदेवींवर टाकून शारदाप्रसादांनी इहलोकीची यात्रा संपविली. लाल तेव्हा अवघा दीड वर्षाचा होता. तेव्हापासून ह्या स्वाभिमानी मातेने काबाडकष्ट करून आपल्या लालचे लालनपालन केले होते. आज लाल दहा वर्षांचा होता. शाळेत जात होता. इंग्रजी शिकत होता. किती अभिमान वाटत होता त्या मातेला. पित्याचे छत्र गेले होते. पण मातेच्या पदराखाली त्याचा विकास होत होता.

इतक्यात लाल आला आणि आईच्या मांडीवर डोके ठेवून आडवा झाला. तो आईला म्हणाला, "मा, माझ्या अंगावर तुझा पदर घाल. थंडी वाजत आहे, सदरा वाळत घातला आहे, उद्याला पाहिजे ना ? "

तो भूतकाळचा चित्रपट तुटला आणि ही वर्तमानकाळची जबाबदारी अंगावर येऊन पडली. ती पदराखाली घेऊन ती माउलीही जराशी चटईवर कलंडली.

लाल बहादूरचे शिक्षण बनारस येथील हरिश्चंद्र हायस्कूलमध्ये चालले होते. नावेने रोज जा ये करावी लागत असे. आरंभी वर्णन केल्यासारखे पोहून येण्याचे प्रसंग अनेक वेळा येत. लाल शिक्षकांचा मोठा आवडता विद्यार्थी होता. वृत्तीने शांत, विनम्र पण निश्चयाने

तितकाच खंबीर. स्वत:चे शहाणपण मिरविण्यासाठी, लुब्रेपणाने उत्तर देण्यासाठी लालचा हात कधी पुढे पुढे व्हायचा नाही. पण शिक्षकांनी लालला प्रश्न विचारला तर लालकडून असे समर्पक उत्तर मिळत असे, की शिक्षक अगदी प्रसन्नमन होत. आता सोळा वर्षांचा लाल मॅट्रिकच्या वर्गात होता. गौरीशंकरच्या अलीकडचे शिखर गाठल्याचा आनंद रामदुलारीदेवींच्या हृदयात उचंबळत होता. पतीच्या पश्चात प्रिय पतीची ही परमप्रिय ठेव सांभाळली, वाढविली. केवढा कृत-कृत्यतेचा सात्त्विक आनंद त्या माउलीला होत असे. लाल मॅट्रिक होईल जीवनपथाचा यात्रेकरी म्हणून लवकरच तो उत्तम रीतीने वाटचाल करू लागेल. काशी विश्वेश्वराच्या सेवेला आपले जीवित समर्पित करायला मग आपण मोकळ्या होऊ, असे आता रामदुलारी-देवींना वाटू लागले होते. तसे त्या सांगतही इतरांना. लाललादेखील तसे त्या नेहमी सुचवीत आणि अभ्यास कसोशीने करायला सांगत.

शाळेमधून आज जेव्हा लाल घरी परत आला तेव्हा तो जरा विमनस्क मन:स्थितीतच दिसत होता. आईशी काही बोलला नाही तो. हातपाय धुऊन दशमी खाऊन घेतली त्याने. आणि बाहेर जाऊन ओटयावर तुळशीवृंदावनाशेजारी तो बसून राहिला. डोके दुखत असेल, म्हणून बोलला नसेल, असे मानून रामदुलारीदेवीदेखील काही बोलल्या नाहीत. पण तिन्ही सांजा झाल्या तरी बाहेर अंधारात लाल बसून राहिला होता. तशी त्यांच्या मनाची चलबिचल झाली. तुळशीवृंदावनामध्ये ठेवण्यासाठी म्हणून हातात पणती घेऊन त्या बाहेर गेल्या. पणती ठेवता ठेवता त्या म्हणाल्या, " लाल, किती वेळ बाहेर बसला आहेस ? आणि अंधार नाही का पडला ? "

" सगळीकडे अंधारच आहे मा, पारतंत्र्याचा." लाल म्हणाला. तो काय म्हणतो आहे, हे काही रामदुलारीदेवींना नीटसे उमगले

नाही. पणतीमधली वात जरा तडतडली म्हणून ती नीट करीत त्या म्हणाल्या, "अरे अभ्यास नाही का करायचा ?"

"नाही !" झटकन तुटकपणाने लाल म्हणाला.

त्या पणतीची वात मागेपुढे करता करता विझली. एकदम लालच्या उत्तराने आश्चर्यचकित झालेल्या रामदुलारीदेवी म्हणाल्या "म्हणजे ?"

"शाळा कॉलेज सोडा, असा महात्माजींनी संदेश दिला आहे. कितीतरी तरुण देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्राणधनसुद्धा अर्पण करायला तयार झाले आहेत. लाल निश्चयाच्या स्वरात म्हणाला.

"पण माझा लाल...?" भांबावलेल्या त्या मातेला काय बोलावे हेसुद्धा सुचेना. काही शब्द तिला नकळतच तिच्या तोंडून निसटले. त्यावर लाल तिथून उठत विनम्रपणे एवढेच म्हणाला, "मा, तुझा लाल देशाच्या चरणी जरूर तर आपले प्राणसुद्धा अर्पण करील." लाल घरात गेला. मनात परमेश्वराची प्रार्थना करीत रामदुलारी देवीसुद्धा आत गेल्या.

लालबहादूरने महात्माजींची आज्ञा प्रमाण मानून वयाच्या सोळाव्या वर्षी, मॅट्रिकचे वर्ष असतानाही शाळा सोडली. एकवीस सालच्या असहकाराच्या चळवळीमध्ये त्याने उडी घेतली. शालेय शिक्षण अर्धवटच राहिले. मातेचे स्वप्न अधुरे राहिले. थोडीशी मामुली शिक्षा होऊन लालबहादूर मुक्त झाला. पण हायस्कूलचे दार त्याला बंद झाले. मग त्याने काशी विद्यापीठामध्ये आपले नाव नोंदविले. तिथे त्याने चार वर्षे अध्ययन केले. 'शास्त्री' ही अंतिम परीक्षा त्याने दिली. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होऊन लालबहादूर श्रीवास्तव लालबहादूरशास्त्री झाले. ह्या विद्यापीठामध्ये असतांनाच शास्त्रीजींना आचार्य नरेन्द्रदेव, पुरुषोत्तमदास टंडनजी,

डॉक्टर भगवानदास ह्या थोर देशभक्तांचा विचारवंतांचा सहवास लाभला. आणि म्हणूनच आपले जीवन लोकसेवेच्या मार्गाने नेण्यासाठी पंजाबचे लाल, कै. देशभक्त लाला लजपतराय यांनी संस्थापिलेल्या लोकसेवक मंडळात ते दाखल झाले. नैतिकमूल्यांनी युक्त वैयक्तिक जीवन, साधी विनम्र राहणी, मातृभूमीचे प्रेम आणि त्यासाठी सर्वस्व समर्पण करण्याची वृत्ती, हे शास्त्री-व्यक्तिमत्वाचे पैलू ह्या मंडळामध्ये घडले गेले. शास्त्रीजींनीच म्हटले आहे, ' मी आज जो कोणी आहे, त्याच्या मुळाशी ही संस्था आहे. ' लोकसेवक मंडळाचे कार्य हीच शास्त्रीजींची जीवनवृत्ती ठरली, हाच शास्त्रीजींचा जीवन-व्यवसाय ठरला.

ह्या मंडळाचे अध्यक्ष पुरुषोत्तमदास टंडन हे प्रथम होते. टंडनजी नंतर शास्त्रीजी अध्यक्ष झाले. ह्याच सुमारास ते अलाहाबाद काँग्रेस समितीचे चिटणीस म्हणून काम पाहात होते. पण्डितजी अध्यक्ष होते ह्या समितीचे. ह्या वेळेपासून पण्डितजींच्या सहवासाचा, मार्गदर्शनाचा शास्त्रीजींना फायदा मिळाला. काँग्रेस--कार्यकर्ते म्हणून शास्त्रीजींना अनेक वेळा तुरुंगवास भोगावा लागला. हा तुरुंगवास म्हणजे शास्त्रीजींची एक महान तपश्चर्याच होती. तुरुंगाच्या ज्ञान-मंदिरामध्ये वाचन, मनन आणि लेखन ह्या मार्गांनी त्यांनी अखंड ज्ञानसाधना केली. हेगेल, रसेल, हक्स्ले, मार्क्स, लेनिन अशा विचारवंतांचे साहित्य वाचून त्यांचे तत्त्वज्ञान त्यांनी आत्मसात केले. पुढील राजकीय जीवनाची बैठकच जणू ह्या कारागृहवासात त्यांनी तयार केली. १९३५ च्या सुधारणा कायद्याप्रमाणे प्रांतिक स्वायत्तता मिळावयाचे ठरले. त्या पहिल्या वहिल्या निवडणुकीच्या वेळी उत्तर-प्रदेशाची सर्व जबाबदारी पण्डितजींनी शास्त्रीजींच्यावर सोपविली. अगदी सामान्यातला सामान्य मतदारसुद्धा शास्त्रीजींची भेट घेऊ

शकत असे, विचारांची देवाण-घेवाण करू शकत असे. ही विनम्रता लोकांना लाख मोलाची वाटली आणि लोकांनी काँग्रेसला लाखांनी मते दिली. प्रांतिक मंत्रीमंडळे स्थापन झाली. तशीच ती दुसऱ्या महायुद्धाची ठिणगी पडल्याने लवकरच विसर्जितही झाली. युद्ध-प्रश्नावरून सरकार-काँग्रेस मतभेद विकोपास गेला आणि १ ऑगस्ट १९४२ ह्या दिवशी महात्माजींनी 'चले जाव'ची घोषणा केली. ज्येष्ठ कार्यकर्ते तुरुंगात गेले आणि तरुण कार्यकर्ते भूमिगत झाले. अलाहा-बादमध्ये शास्त्रीजी भूमिगत राहून कार्य करीत होते.

काही व्यक्तींचा जीवनपथ नेहमीच कंटकयुक्त असतो जणू काही. शास्त्रीजींची माता रामदुलारीदेवी ह्या अशा व्यक्तींपैकीच एक होत. पतीच्या पश्चात आपला लाल त्या अभागी मातेने दुसऱ्याचे मिंधे-पण स्वीकारून, नानाप्रकारचे कष्ट उपसून वाढविला. त्याने जाणून-बुजून देशभक्तीचे–सतीचे वाण घेतले. सुखाच्या साउलीची अपेक्षा करावी आणि दुःखाचे वैराण वाळवंट तुडविण्याचे नशिबी यावे, तशी गत झाली. त्यातल्यात्यात थोडा सुटकेचा निःश्वास टाकण्यासारखी गोष्ट म्हणजे रामदुलारीदेवींना मिळालेली त्यांच्या सुनेची जोड. शास्त्रीजींच्या शांत निश्चयी स्वभावाला साजेसाच ललितागौरींचा स्वभाव होता. शास्त्रीजी तुरुंगात असताना, भूमिगत असताना जमतील ते कष्ट करून ललितागौरी संसाराला हातभार लावीत. दोघी सासूसुना वीरमाता, वीरपत्नी होत्या. त्यामुळे शास्त्रीजी आपले जीवनपुष्प मातृभूमीच्या चरणी अर्पण करायला स्वतंत्र होते.

अलाहाबादमध्ये भूमिगत राहून शास्त्रीजी प्रचारकार्य करीत होते. एका तिमजली इमारतीमध्ये त्यांच्या गुप्तसंघटनेचे कार्यालय

होते. तिसऱ्या मजल्यावर एका खोलीमध्ये स्वतः शास्त्रीजी सायक्लोस्टाईल पत्रिका तयार करीत. तिथून त्या पत्रिका स्वयंसेवकांमार्फत शहरामध्ये घरोघर वाटल्या जात. स्वातंत्र्ययुद्धाचे पेटलेले रणकुंड धगधगते ठेवण्याचे कार्य ह्या पत्रिका करीत होत्या. सरकारला हा सुगावा लागला. पोलिसांनी काही पत्रिका जप्त केल्या. पण ह्या पत्रिकांचे उगमस्थान त्यांच्या आढळात येईना. काही दिवस गेले आणि शास्त्रीजींच्या ह्या निवासस्थानाचा पोलिसांना वास आला. त्यांची धाड आली ह्या इमारतीवर. खालच्याच मजल्यावर पण्डितजींच्या भगिनी विजयालक्ष्मी पण्डित ह्यांनी त्या पोलिसांचे सहास्य स्वागत केले. त्या हास्याची योग्य ती सूचना घेऊन कोपऱ्यामध्ये बसलेल्या एका चलाख मुलाने तिसऱ्या मजल्यावर जाऊन खालच्या मजल्यावरच्या संकटाची कल्पना शास्त्रीजींना दिली. त्या सायक्लोस्टाईल मशीनसह सर्व गोष्टी ताबडतोब अदृश्य झाल्या. स्वतः शास्त्रीजी शेजारच्या एका बिऱ्हाडामध्ये जाऊन लहान मुलांच्या गप्पांमध्ये रंगून गेले. विजयालक्ष्मींशी चाललेल्या सुखसंवादाच्या मोहातून सुटायला एवढा वेळ निश्चितच गेला आणि मग त्या पोलीस अधिकाऱ्यांनी त्या इमारतीची पाहणी केली. संशयास्पद असे काही आढळले नाही बिचाऱ्यांना. परत जाता जाता त्या शेजारच्या बिऱ्हाडातल्या मुलांशी खेळण्यात रमलेल्या शास्त्रीजींच्याकडे हास्यवदनाने पाहात निघून गेले बिचारे.

दडपशाही दमली आणि लोकशाहीला शरण गेली. तुरुंगातील राजबंदी मुक्त झाले आणि भूमिगत प्रगट झाले. राष्ट्राने स्वातंत्र्यसूर्याचा उदय पाहिला. भारताचे भाग्यविधाते पण्डित जवाहरलाल नेहरू भारताचे पंतप्रधान झाले. प्रांताप्रांतांमध्ये कॉंग्रेस मंत्रीमंडळे

राज्यकारभार करू लागली. उत्तर प्रदेशामध्ये शास्त्रीजींच्या संघटन-कुशलतेमुळे काँग्रेस प्रचण्ड बहुमताने निवडून आली. पण्डित गोविंद-वल्लभ पंत उत्तरप्रदेशाचे पंतप्रधान होते. कार्यक्षमता, कार्यनिष्ठा, नम्रता आणि निर्णायक विचारपद्धती हे गुण पाहून पण्डित पंतांनी उत्तरप्रदेशचे गृहमंत्री म्हणून शास्त्रीजींची नेमणूक केली. उत्तर-प्रदेशचे गृहमंत्री शास्त्रीजी एकदा आग्ऱ्याला गेले होते. गाडी वेगाने स्टेशनात घुसल्याने शास्त्रीजींचा डबा नियोजित स्थलापासून जरा पुढे गेला. शास्त्रीजी तिसऱ्या वर्गाच्या फाटकाकडे गेले. यांचे साधे सुधे जाडे-भरडे खादीचे कपडे आणि ठेंगणेपण पाहून हे गृहमंत्री असावेत असे पोलिसांना वाटेना. त्यांनी शास्त्रीजींना अडविले. मग इतर अधिकारी शोधाशोध धावाधाव करीत तेथे आले. तेव्हा खुलासा झाला. शास्त्रीजींनी त्या पोलिसाला मोठ्या मनाने क्षमा केली.

इ. सन १९५० मध्ये भारतीय संघराज्याची स्थापना झाली. आणि पुढच्याच वर्षी संघराज्यातील पहिल्या वहिल्या निवडणुका झाल्या. कार्यनिष्ठा, गोडवाणी, विनम्रस्वभाव आणि संघटनाचातुर्य हे गुण-विशेष लक्षात घेऊन पण्डितजींनी शास्त्रीजींना आपल्या मंत्रीमंडळा-मध्ये समाविष्ट करून घेतले. रेल्वे व वाहतूक-खात्याची जबाब-दारी त्यांच्यावर सोपविण्यात आली. रेल्वे व वाहतूकमंत्री शास्त्रीजींनी सामान्य लोकांच्या दृष्टीने पुष्कळ सुखसोयी रेल्वे-खात्यात घडवून आणल्या. प्रवासी लोकांच्या सुरक्षिततेसाठी रेल्वे-सुरक्षादलाची त्यांनी स्थापना केली. रेल्वेची कार्यक्षमता वाढावी यासाठी चित्तरंजन येथे यांत्रिक आणि रासायनिक संशोधनाची त्यांनी व्यवस्था केली. पण भवितव्यतेने काही निराळीच आखणी केली होती. दक्षिण भारतातील अरियालूर या ठिकाणी भीषण रेल्वे-अपघात झाला. दीडशे लोक जागच्या जागी ठार झाले आणि असंख्य

लोक जखमी झाले. याच्या अगोदर नुकताच मेहबूबनगर ह्या ठिकाणी असाच भयानक अपघात झाला होता. त्या दुर्घटनेची ही पुनरावृत्ती होती. ह्या दु:खजनक प्रकाराला आपण सर्वस्वी जबाबदार आहोत असा निर्णय शास्त्रीजींच्या मनोदेवतेने देऊन टाकला. त्या मनोदेवतेचा निर्णय शिरसावंद्य मानून शास्त्रीजींनी मंत्रीपदाचे त्यागपत्र लोकसभेला सादर केले. अनेकांनी त्यागपत्र मागे घेण्याची त्यांना विनवणी केली. पण त्यांचा निश्चय अटळ होता. त्यांच्या त्यागपत्राचा मोठ्या खेदाने स्वीकार करताना पण्डितजीसुद्धा म्हणाले,

"शास्त्रीजींचा सहवास आणि साहाय्य मला मिळाले, हे माझे सद्भाग्य. त्यांची कार्यावरील अनन्यसाधारण निष्ठा, सिद्धांतप्रियता सदसद्विवेकबुद्धी, हसतमुखाने कष्ट करण्याची तयारी, आश्चर्यकारक दूरदृष्टी, माणूस पारखण्याची अजब शक्ती, निस्सीम देशभक्ती, उच्च आदर्शाची प्रशंसनीय धडपड आणि ह्या सर्व सद्गुणांचे सौंदर्य प्रकर्षाने वाढविणारी विनम्रता या सर्वच गोष्टी स्तुत्य आणि कौतुकास्पद आहेत. त्यांचे साहाय्य आम्हांला आणखी लाभले असते तर हवे होते."

पण शास्त्रीजींचा निश्चय म्हणजे पोलादी निश्चय होता.

"मी शारीरिकदृष्टचा ताकदवान नसलो तरी मानसिक आणि आध्यात्मिकदृष्टचा मी दुर्बल किंवा कमकुवत खासच नाही. शरीरबलापेक्षा माझ्या अंत:करणाची शक्ती–मनोबल–खासच अधिक आहे." ह्या शब्दांनी शास्त्रीजींनी आपले कणखर अंत:करण सर्वांच्या प्रत्ययास आणले.

ह्यानंतरच्या निवडणुकीमध्ये शास्त्रीजी पुन्हा निवडून आले आणि वाणिज्य व उद्योगमंत्री म्हणून केंद्रमंत्रीमंडळात त्यांची

नियुक्ती झाली. पण्डित गोविंद वल्लभ पंत हे गृहमंत्री होते. दुर्दैवाने त्यांचे देहावसान झाले आणि गृहमंत्रीपदाची वस्त्रे शास्त्रीजींनी धारण केली. त्यांच्या पोलादी मनोवृत्तीचे ह्या वेळेस पदोपदी दर्शन झाले. नानाविध गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण झाले. प्रत्येक वेळेस समतोल वृत्तीने विचार विनिमय करून, समजूतदारपणाच्या भावनेने पूर्वग्रहांचे निरसन करून ते निर्णय घेत आणि निर्णय देत. सर्वांशी आपलेपणाने विचारविनिमय करताना फुलासारख्या कोमल वृत्तीचे असलेले शास्त्रीजी निर्णय देताना आणि तो अमलात आणताना वज्रापेक्षाही कठोर वृत्तीचे होत. शक्य तो शांततेचा स्वर्ग भूवर नांदावा ह्या सदिच्छेच्या पोटी त्यांच्या नम्रवृत्तीचा जन्म झालेला होता. दुर्बलता ही त्यांच्या नम्रतेची माता नव्हती. आणि म्हणून कोणतेही प्रचण्ड व्यक्तिमत्व त्यांच्या निर्णयाला बदलवू शकत नव्हते.
'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास। परी कठिण वज्राते भेदू ऐसे।।'
असे ब्रीद असणाऱ्या संतश्रेष्ठ तुकाराममहाराजांनी म्हटल्याप्रमाणे

'नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता।'

अशी समर्थ नम्रता होती शास्त्रीजींची. ह्या खंबीर वृत्तीच्या जोरावर पंजाब सुभ्याच्या वेळी त्यांनी तारासिंगांशी यशस्वी सामना दिला. विलक्षण दूरदर्शित्व आणि समयसूचकता ह्या गुणांच्या जोरावर कृष्णमेननसारख्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या व्यक्तीचा राजीनामा स्वीकारण्याचा सल्ला शास्त्रीजींनी पण्डितजींना दिला. कोणत्या वेळी कसे वागले असता राष्ट्रातील शांतता अबाधित राहील हे ते उत्तम जाणत असत. आणि म्हणूनच समजूतदारपणाच्या भावनेने वागणारे आणि बोलणारे शास्त्रीजी राष्ट्रीय शांततेला कोणी बाध

आणीत आहे असे पाहिल्यावर लगेच जमदग्नीचा अवतार धारण करीत. अण्णादुराई प्रकरणाबाबत ते म्हणाले, ' छोटे मोठे प्रश्न पुढे करून जे विघातक कार्ये करतात त्यांच्या विरुद्ध कडक इलाज करण्यास सरकार मागे पुढे पाहणार नाही. ' असे अनेक प्रकारे पण्डितजींना शास्त्रीजींचे बहुमोल साहाय्य झाले. म्हणून कामराज-योजनेप्रमाणे आपण होऊन शास्त्रीजींनी मंत्रीपदाचा राजीनामा दिला असतानाही पण्डितजींनी ' बिनखात्याचे मंत्री ' म्हणून पुन्हा शास्त्रीजींची मंत्रीमंडळात नियुक्ती केली. त्या वेळेस शास्त्रीजी सहज पण्डितजींना म्हणाले, ' मी कोणते काम करू ? ' पण्डितजींनी सांगितले, ' तुम्ही माझे काम करा. '

पण्डितजींची ती भविष्यवाणीच ठरली. शास्त्रीजींचे अनेक सुप्त गुण पण्डितजींनी ओळखले होते. आणि म्हणूनच भुवनेश्वर येथे आकस्मिक तब्येत बिघडल्यावर त्यांना प्रथम शास्त्रीजींची आठवण झाली. दिनांक २७ मे १९६४ रोजी दुपारी एक वाजता पण्डितजींनी इहलोकीची यात्रा संपविली. सर्व थोर मुत्सद्यांनी एकमताने राष्ट्र-नेतृत्वाची जबाबदारी शास्त्रीजींवर सोपविली. ९ जून १९६४ रोजी शास्त्रीजींनी प्रधानमंत्रीपदाची सूत्रे हाती घेतली. लोकांना त्यांच्या विद्वत्तेबद्दल, कार्यक्षमतेबद्दल विश्वास वाटत होता. आणि त्यांनी तितक्याच विनम्रतेने ही जबाबदारी स्वीकारली. अधिकारग्रहण करताना ते अतिशय विनयशीलतेने म्हणाले, " पण्डितजींच्या सारखे व्यक्तित्व शतकातून एखादेच निर्माण होते. मी पण्डितजींचा अनुयायी आहे. त्यांच्या सहवासातून जो काही अनुभव संग्रहित केला, विचारधन गोळा केले, तेवढेच माझे संचित आहे. या संचिताचा आपल्या परीने राष्ट्रहितासाठी उपयोग करणे हेच माझे जीवनातले

उद्दिष्ट आहे. म्हणून मला तुम्हा-सगळ्यांच्या सहयोगाची आणि सहकार्याची गरज आहे."

ह्या विनयशीलतेला साजेसा शास्त्रीजींच्या वागण्यातला साधेपणा होता. 'त्यांनी स्वतःसाठी दोन सदरे, दोन धोतरे आणि एक टोपी याशिवाय जास्त कपडे कधीच वापरले नाहीत.' अशी त्यांच्या भगिनीने आठवण सांगितली आहे. हे सर्व कपडे खादीचे असत. सोळा अठरा तास ते काम करीत असत. कामात ते कितीही व्यग्र असले तरी ठरलेली कामे त्यांच्या बरोबर लक्षात असत. स्वभाव अतिशय शांत. शपथविधीला जायचे होते. शास्त्रीजी शांतपणे कामकाज पाहात होते. शात्रीजींच्या लक्षात आहे की नाही अशी शंका वाटून विचाऱ्या सेक्रेटरीची मात्र सारखी चुळबूळ चालली होती. धिम्या स्वभावाच्या शास्त्रीजींच्या चेहऱ्यावर मात्र अजिबात काही भावदर्शन नव्हते. ठरलेली वेळ होताच हातातले काम एखाद्या यंत्राप्रमाणे थांबले. शास्त्रीजी जागचे उठले, बाहेर पडले आणि राष्ट्रपतिभवनाकडे शपथविधीसाठी निघाले चालत! असे शांत आणि वक्तशीर वागणारे शास्त्रीजी होते.

शास्त्रीजींनी प्रधानपदाची जबाबदारी स्वीकारली तेव्हा राष्ट्राची परिस्थिती मोठी नाजूक होती. नाना प्रकारच्या समस्या राष्ट्रापुढे उभ्या होत्या. राष्ट्राच्या स्वास्थ्याला आणि सुरक्षिततेला घरातल्या आणि बाहेरच्या शत्रूंचे सारखेच भय निर्माण झाले होते. अतिशय खंबीरपणाच्या धोरणाची ह्या वेळेस आवश्यकता होती. पत्रकारांनी त्यांची मुलाखत घेताना त्यांना विचारले सुद्धा, 'तुम्ही खंबीर राहू शकाल काय?' शास्त्रीजींनी त्यांना ताबडतोब उत्तर दिले, 'अर्थातच, तेवढा बळकट आणि खंबीर मी राहीनच. नाहीतर या जागेवर मी राहीन कशाला?'

राष्ट्रातील अंतर्गत व्यवस्था उत्तम रीतीने लावण्यामध्ये शास्त्रीजींची ही खंबीर-वृत्ती आणि समयसूचकता अनेक वेळा दृष्टोत्पत्तीस आली. कुठलाही प्रश्न त्यांनी भिजत ठेवला नाही. ते प्रत्येक निर्णय ताबडतोब घेत. त्यांनी गोव्याचा प्रश्न लगेच गृहमंत्र्याकडे सोपवून टाकला. काश्मीरचे भूतपूर्व मंत्री शेख अब्दुल्ला परदेशामध्ये भारताविरुद्ध काही वक्तव्य करतात असे पाहताच त्यांचा पासपोर्ट रद्द होईल, अशी त्यांना तातडीची पूर्वसूचना देऊन, त्यांनी स्वदेशभूमीवर पाऊल ठेवताच त्यांना ताबडतोब स्थानबद्ध करण्याचा हुकूम शास्त्रीजींनी दिला. ओरिसा मंत्रीमंडळामध्ये काही गैरप्रकार झालेले कळताच त्वरित चौकशी करून विरेन मित्र, विजू पटनाईक ह्या मंत्र्यांना राजीनामे द्यायला त्यांनी लावले. अंतर्गत शुद्धिकरणाचे हे कार्य शास्त्रीजींनी खंबीरपणे, पूर्ण विचारान्ती आणि शीघ्र गतीने केले, तसेच 'जीवनावश्यक वस्तू सर्वसामान्य जनतेला स्वस्त मिळण्याची व्यवस्था होईल' अशी घोषणा करून त्याप्रमाणे त्यांनी योजनाही आखली. ह्या सर्व गोष्टींमुळे त्यांनी जनतेचा विश्वास संपादन केला. तरी पण अहंकाराचा स्पर्श मात्र त्यांच्या मनाला कधीच झाला नाही. ठिकठिकाणी त्यांच्या कार्यक्षमतेचा गौरव झाला, सत्कार झाला. त्या वैभवशाली सत्कार समारंभाच्या सोहळ्यामध्ये मध्यवर्ती, नखशिखान्त खादी धारण केलेली शास्त्रीजींची वामनमूर्ती पाहणे म्हणजे मूर्तिमंत विनयशीलतेचेच दर्शन घेणे होते. ते स्वतःच म्हणत,

"मी शरीराने एवढा छोटा आहे, की मोठ्या माणसांना माझ्याशी खेळायला आवडत नाही; म्हणून मी लहान मुलांशी खेळतो." लहान मुलांच्या संमेलनाला एकदा ते उपस्थित राहिले होते. तेव्हा

सुद्धा आपल्या छोटेपणाचा उल्लेख करून ते विनोदाने म्हणाले, "ह्या लहान मुलांच्या संमेलनाला बहुतेक माझी आकृती पाहून मला बोलावले असेल."

एकदा एका समारंभाच्या वेळी शास्त्रीजींचा परिचय करून देताना एक वक्ते म्हणाले, 'शास्त्रीजी अजातशत्रू आहेत.' त्या वेळेस शास्त्रीजी म्हणाले, "माझ्यासारख्या एका छोटया माणसाला कोणाचेही शत्रुत्व पत्करणे हे कसे काय परवडेल?"

पण प्रत्यक्ष प्रसंगच आला तेव्हा त्यांच्या ह्या नम्रतेत खडकाचा कठोरपणा आहे, हेच जगाच्या निदर्शनास आले. 'भारत आपल्या शांततेच्या धोरणाबद्दलच्या मूलभूत सिद्धांतापासून कधी हलणार नाही.' असे आपले धोरण त्यांनी प्रथमच जाहीर केले. भारत-पाकिस्तान यांच्यामध्ये सलोखा स्थापन करण्याची त्यांची इच्छा होती. त्यांनी तसा सतत प्रयत्नही केला. मात्र स्वाभिमान त्यांनी कधीच सोडला नाही. ते म्हणत, "भारत आणि पाकिस्तान यांच्यात शांतता प्रस्थापित होण्याची संधी येईल, तेव्हा आपण ती डावलता कामा नये. तथापि एक गोष्ट निश्चित आहे की, ही शांतता सन्माननीय असली पाहिजे." ह्या धोरणाप्रमाणेच शास्त्रीजींनी आपली पावले टाकली. शांततेचे आवाहन त्यांनी केले पण त्याला न जुमानता अमेरिकेच्या शस्त्र-सामर्थ्याची उसनी शिदोरी पाठीला बांधून पाकिस्तानने युद्धाचे शिंग फुंकताच पाकिस्तानची तीही हौस पुरविण्याचे शास्त्रीजींनी ठरविले.

शस्त्राला शस्त्राने उत्तर देण्याची घोषणा भारताच्या प्रधान-मंत्र्यांनी केली. सर्व राष्ट्र चैतन्यमय झाले. 'जय जवान जय किसान' ह्या नव्या स्फूर्तिमंत्राने सर्व जनता भारली गेली, राष्ट्रात नवजीवन

खळाळू लागले. शांततेच्या वाटाघाटींना शास्त्रीजींनी दार कधीच बंद केलेले नव्हते. पण त्या उघडया दाराने अशांतता, अन्याय ही दुष्ट जोडगोळी येऊ लागलेली पाहताच अतुलनीय खंबीरपणाने त्या अन्यायाला तोंड देण्याची त्यांनी तयारी केली. शत्रूचा अंदाज चुकला. सर्व आघाडयांवर यशस्वी प्रतिकार भारतीय जवान करू लागले. त्यांचा दुर्दम्य उत्साह दुणावला होता. ते जाणत होते की त्यांच्या पाठीमागे एक खंबीर निर्णयशक्ती उभी होती. इंग्लंड, अमेरिका ही राष्ट्रे पाकिस्तानकडे झुकलेली पाहूनही ती शक्ती इकडे तिकडे झुकली नाही. शास्त्रीजी शांत होते, निश्चल होते. रात्री एक वाजे-पर्यंत ते काम करीत. पहाटे पुन्हा पाच वाजता उठत. अविरत कामामध्ये ते व्यग्र असत. राष्ट्रचिंता हा एकमेव विषय होता त्या व्यग्रतेचा ! आणि ' मैं लालबहादूरसे चाहती हूँ, जान भी जाये मगर देश बना रहे ।' हे मातेचे शब्द त्यामागली प्रेरणा होती.

हे मातेचे शब्द खरे ठरावयाचे होते. तसे कठोर विधिलिखित भारताच्या भाळी लिहिले होते. राष्ट्राचे स्वातंत्र्य सुरक्षित राखण्या-साठी ज्या दृढनिश्चयाने शास्त्रीजींनी शस्त्राला शस्त्राने उत्तर देण्याचे ठरविले होते त्याच दृढनिश्चयाने शांततेचे स्वागत करण्याचे त्यांनी ठरविले होते. म्हणूनच रशियाचे पंतप्रधान श्री. कोसिजीन ह्यांच्या शांतता-रक्षणाच्या आवाहनाचा त्यांनी मान राखला आणि युद्ध-पर्व संपवून शांति-पर्व सुरू करण्यासाठी ते ताश्कंदला गेले. विजयी भारताचे पंतप्रधान म्हणून ते गेले होते, पण त्या अतुल विजयामुळे अहंकाराचा स्पर्शही त्यांच्या साधेपणाला झाला नाही. अहंकाराला त्यांच्या मनामध्ये प्रवेश मिळाला नाही ह्याचा अर्थ तिथे स्वाभिमान नव्हता, असा नाही. त्यांचा मूळचा पिण्डच स्वाभिमानाचा होता. 'पाकिस्तानशी सन्मान्य तडजोड करण्यासाठी काश्मीरवरील भारतीय

सार्वभौमत्वाचा सौदा करायला आपण कदापि तयार होणार नाही.' अशी त्यांची कणखर भूमिका होती. आणि ताश्कंद कराराच्या वेळेस ह्या त्यांच्या भूमिकेचा विजयच झाला. 'भारत आणि पाकिस्तान यांनी आपसातील कोठलेही वाद मिटविण्यासाठी यापुढे बळाचा वापर करू नये.' हे ह्या कराराचे पहिलेच कलम शास्त्रीजींचे राजकारण-चातुर्य दाखविते. त्याप्रमाणेच त्यांची शांतता-प्रियताही त्यावरून आपणांस दिसून येते.

कौरव-पांडवांचा वैराग्नी शमवून शांतता प्रस्थापित करू पाहणारी महामंत्री विदुराची नीती आणि पाकिस्तान-भारतामध्ये समझोता करू पाहणारी महामंत्री शास्त्रीजींची ही नीती म्हणजे भारतीय संस्कृतीचीच दोन उज्ज्वल स्वरूपे. तीच विद्वत्ता, तीच विनयशीलता आणि तीच समर्पणाची तयारी.

१९६६ च्या १० जानेवारीला ताश्कंद करारावर, त्या महान ऐतिहासिक करारावर दोन्ही नेत्यांच्या सह्या झाल्या. भारत-पाक मैत्रीमध्ये नव सामर्थ्य निर्माण झाले. शास्त्रीजी आपल्या निवासस्थानी परतले. त्यांनी आपले कुशल फोनवरून ललितागौरींना कळविले. काळाने कृपावंत होऊन त्यांना एवढीच सवड दिली. ती रात्र काळरात्र ठरली. शास्त्रीजींना खोकल्याची उबळ आली. हृदयविकाराचा तिसरा झटका होता तो ! डॉक्टरांचे भगिरथ प्रयत्न काळाला परतवू शकले नाहीत. शास्त्रीजींनी शांततेच्या वेदीवर बलिदान केले. परदेशामध्ये, माता जवळ नाही, पत्नी जवळ नाही. कोणीही मायेचे माणूस त्यांच्या जवळ नाही, अशा एकाकी स्थितीत शास्त्रीजींना मृत्यू आला. आणि भारताच्या प्राणाचे हे निष्प्राण शरीर विमानाने दिल्लीला आले !

आपल्या प्राणपतीचे ते निष्प्राण शरीर पाहून त्या थोर साध्वी ललितागौरीने किती तरी वेळ मूकरुदन केले. ती साध्वी म्हणाली, "अगर मैं आपके साथ होती तो! मैं आपको कभी जाने नहीं देती! मेरा भगवान् कभी ऐसा न होने देता! नाथ आखरी समय, मैं आपके साथ न थी!"

जिने आपल्या पतीच्या पश्चात आपला लाल आपल्या प्रेमामृताने वाढविला त्या मातेने तर हंबरडा फोडला, "मेरा लाल मर नहीं सकता! मेरा लाल नहीं मर सकता!"

आणि हे त्या मातेचे शब्द खोटे कसे म्हणावयाचे? शांततेच्या वेदीवर ज्याने बलिदान केले तो मार्कंडेयाप्रमाणे काळाला जिंकून चिरंजीवच झाला आहे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शा.
दा. क्र. ९१.६८८ नों. दि
वि. ...



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. वाचनालय शाखा.
अनुक्रम ...... वि......
क्रमांक ......नोंद दि......

विद्या ... शोभते

IRBK-0111988